मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

नवभारत

वर्ष १७ वे]   मे १९६४   [अंक ८

वार्षिक वर्गणी ९ रु.]   [किरकोळ अंक १ रु.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

“ नवभारत ” मासिक

जाहिरातीचे दर

सबंध पान	अर्धें पान	पाव पान
रु. ६०	रु. ३५	रु. २०

१. कव्हर पेजसाठीं २५ टक्के अधिक आकार.

२. घावत्या मजकुराबरोबर द्यावयाच्या जाहिरातीस १० टक्के अधिक आकार.

३. वर्षांतील किमान सहा अंकांत जाहिरात दिल्यास १० टक्के सवलत. संपूर्ण वर्षभर जाहिरात दिल्यास २० टक्के सवलत.

४. जाहिरातीच्या आकारावर व्यावसायिक प्रथेनुसार कमिशन देण्यात येईल.

५. जाहिरातीसंबंधीं अधिक चौकशी व पत्रव्यवहार :

व्यवस्थापक “ नवभारत ” मासिक
प्राज्ञ प्रेस, वाई जि० सातारा

❀ मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारें महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणें, हें या मासिकाचें ध्येय व उद्दिष्ट आहे.

❀ या मासिकांत येणाऱ्या लेखांत कोणत्याहि विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतु नाहीं.

❀ मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणांत सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष सतरावे

अंक आठवा

नवभारत

मे

१९६४

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. वेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक

वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. वेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,
'गणेश भुवन' २७६, तेलंग रोड, माटुंगा–मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमरावबाडी, मुंबई २
फोन नं. २३५५४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला

		किंमत
(१)	धर्मकोश– व्यवहारकाण्ड भाग १ ते ३	
	साधी बांधणी	८०·००
	कापडी बांधणी	१०४·००
(२)	धर्मकोश - उपनिषत्काण्ड भाग १ ते ४	
	साधी बांधणी	१५०·००
	कापडी बांधणी	१८२·००
(३)	धर्मकोश– संस्कारकाण्ड भाग १ ला	४५·००
	कापडी बांधणी	५३·००
(४)	मीमांसादर्शन	३०·००
(५)	मीमांसाकोश ... भाग १ ते ६	२३०·००
(६)	कौषीतकिब्राह्मणारण्यकविषयकोश	६·००
(७)	बौद्धागमार्थसंग्रहः	२०·००
(८)	हिंदुधर्माची समीक्षा (लक्ष्मणशास्त्री जोशी) ...	५·००
(९)	वैदिक संस्कृतीचा विकास	६·००
(१०)	नवमानवतावाद	२·५०
(११)	मानवाचा आदर्श	३·००
(१२)	चार्वाक– इतिहास आणि तत्त्वज्ञान (प्रा. सदाशिव आठवले) ...	३·००
(१३)	गीता-प्रवेश (डॉ. गो. वि. देवस्थळी) ...	२·५०
(१४)	महाराष्ट्रांतील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना (श्री. चा. अ. दाभोलकर)	२·००

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्रा. स. रा. गाडगीळ

प्राचीन भारतातील भौतिकवाद[१] : ४ :

" The Sankhya System possesses a unique interest in the history of thought as embodying the earliest clear and comprehensive account of the process of Cosmic evolution, viewed not as a mere metaphysical speculation but as a positive principle based on the conservation, the transformation and the dissipation of energy[२]."

— Seal

सांख्यदर्शन हा विश्वविकासाची भौतिक दृष्टिकोनातून मीमांसा करण्याचा पहिलाच भव्य आणि तर्कनिष्ठ असा प्रयत्न होय. तत्पूर्वी शेकडो वर्षे लोकजीवनामध्ये प्रचलित असलेल्या स्थूल आणि ग्राम्य इहलोकवादाला शास्त्रीय चिंतनाची बैठक देऊन सांख्यांनी एक सुसंगत आणि युक्तिसिद्ध असे जीवनदर्शन निर्माण केले. स्त्रीला निर्मितिकेंद्र कल्पून तांत्रिकांनी आपली विश्वनिर्मितिविषयक[३] उपपत्ति मांडली होती. यातूनच सांख्यांचा प्रकृति-पुरुष विचार उद्भवला. अर्थात् सांख्य म्हणजे तंत्रसाधना नव्हे. तांत्रिकांच्या वामाचारादि मंत्रतंत्रात्मक कर्मकांडातून बाहेर पडून सांख्यांनी प्रकृतिपुरुष विचाराला तत्त्वचिंतनाच्या पातळीवर आणून सोडिले. प्राचीन परंपरेप्रमाणे सांख्याला प्रारंभी 'तंत्र' या नावानेच संबोधीत असावेत. शंकराचार्यांनी सांख्याचा 'कपिलस्य तंत्र', 'तंत्राख्य' (तंत्र नावाने ओळखले जाणारे) असाच उल्लेख केला आहे. हा उल्लेख आज अनुपलब्ध असलेल्या 'षष्ठीतंत्र' या ग्रंथाचाच असावा असे समजण्याला काहीही आधार नाही. विशेषतः 'तंत्राख्य' या शब्दाने एका विशिष्ट दर्शनाचाच निर्देश त्यांना करावयाचा होता हे स्पष्ट दिसते. स्वतः सांख्यकारिकाकर्त्यानेही आपल्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख 'तंत्र[४]' याच शब्दाने केला आहे. तेव्हा सांख्य आणि तंत्र यांचा संबंध त्या काळात सर्वमान्य असावा. सांख्यांनी तांत्रिकांचा प्रकृति–पुरुष विचार घेऊन त्यांतून आपला सुप्रसिद्ध **अचेतनप्रधान कारणवादाचा** सिद्धांत मांडला. अर्थात् त्यांचा हा प्रकृतिकारणवादाचा सिद्धांत उत्तर कालात मूळ शुद्ध स्वरूपात टिकला नाही हे सत्य आहे. त्यांच्या तर्कशुद्ध विचारांना विज्ञानाची जोड मिळण्यापूर्वीच त्याचे वेदांतात विलिनीकरण झाले. प्रस्तुत लेखात मूळ सांख्य तत्त्वज्ञानाचे स्वरूप पूर्णपणे जडवादी, वेदविरोधी अथवा वेदबाह्य कसे होते, त्याचा उगम कोणत्या सामाजिक अवस्थेत झाला असावा आणि शेवटी भारतीय जीवनातील या दोन भिन्न विचारप्रवाहामधील संघर्षाचा शेवट कसा झाला याचा विचार करावयाचा आहे.

रूढ सांख्यमत

रूढ परंपरेप्रमाणे सांख्य मताचे महत्त्वाचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील : (१) प्रकृति आणि पुरुष ही दोन स्वतंत्र, अनादि तत्त्वे आहेत. (२) प्रकृति ही जड असून सत्व, रज, तम या गुणांनी युक्त आहे. (३) या व्यक्त विश्वपसाऱ्याचे एकमेव कारण प्रकृतिच आहे. (४) विश्वातील कोणतेही कार्य कारणाहून मूलतः भिन्न नाही. कार्याचे गुण कारणात अव्यक्त रूपाने असतातच. हाच सत्कार्यवाद होय. (५) पुरुष सचेतन असून निर्गुण, अविकारी आणि अक्रिय आहे. विश्वसर्गाशी त्याचा केवळ पाहण्याखेरीज (जाणणे) कोणताही संबंध नाही. तो केवळ

---

१. नवभारत जाने. फेब्रु. मार्च १९६४ पाहा.

२. Positive Sciences of Ancient Hindus : B. N. Seal.

३. 'नवभारत' जाने. आणि मार्च १९६४ पाहा.

४. सां. का. ७०.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

साक्षीभूत आहे. (६) पुरुष अनेक आहेत. (७) प्रकृतीचा हा विश्वपसारा पुरुषाच्या उपभोगासाठी आणि मोक्षासाठी आहे. (८) आपण प्रकृतीहून वेगळे आहोत याचे पुरुषाला ज्ञान होणे हाच पुरुषाचा मोक्ष होय.

सांख्यांच्या या रूढ मतात निरीश्वरवादी, अचेतन-प्रधानकारणवाद आणि वेदांत्यांचा सचेतन ब्रह्मकारण-वाद यांचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. निर्गुण, अविकारी, आणि अक्रिय पुरुष मानल्यावर सांख्यविचार वेदांताला जवळचा वाटावा हे स्वाभाविक होते. शंकराचार्यांनी एवढ्यापुरते सांख्यांना प्रशस्तीपत्रही दिले आहे[५]. परंतु एकदा असा हा 'पुरुष' मानला की परिणामवाद अथवा सत्कार्यवादाचा त्याग करून विवर्तवादावर येण्याशिवाय गत्यंतरच उरत नाही हे आचार्यांना माहीत होते, आणि त्यांनी आपल्या प्रखर युक्तिवादाने सांख्यांना याच भूमिकेवर खेचून आणिले आहे. शंकराचार्यांच्या पूर्वीच ईश्वरकृष्णाने जवळ जवळ वेदांताचीच भूमिका घेतली आहे. उत्तर कालात सांख्यसूत्रकारांनी हीच प्रक्रिया पूर्णतेला नेली. परंतु हे करीत असता सांख्यांनी आपली अचेतनप्रधान कारणवादी भूमिका कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सांभाळून ठेवली. यामुळेच ब्रह्मसूत्रकारांनी आणि भाष्यकारांनी सांख्यांना प्रधान-मल्ल[६] मानून त्यांच्या वेदविरोधी जडवादी भूमिकेवर प्रहार केला.

वेदान्तविरोधी प्रधान मल्ल

ब्रह्मसूत्रकार आणि शंकराचार्य या दोघांनीही सांख्यांना आपले प्रमुख प्रतिस्पर्धी कल्पिले आहे. सांख्यांच्या खंडनात इतर विरोधकांचे खंडन येऊन जाते असे ते मानतात. त्यांच्या युक्तिवादाचा रोख पाहता त्या काळात तरी निदान सांख्यदर्शन हे वेद-विरोधी, निरीश्वरवादी, आणि अचेतनप्रधानकारणवादी मानले जात होते याविषयी शंकाच उरत नाही. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की ब्रह्मसूत्रकारांनी एकाही सूत्रात देहात्मवादी तांत्रिकांचा अगर लोकाय-तिकांचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. सांख्यांची म्हणून जी जी मते त्यांनी खंडन केली आहेत ती सर्व मते तांत्रिकांची आणि लोकायतिकांची आहेत. लोकायत मताचा गेल्या तीन लेखात जो आपण परिचय करून घेतला आहे त्यावरून असे म्हणावयास हरकत नाही की ब्रह्मसूत्रकारांच्या दृष्टीने निरीश्वरवादी–अचे-तनप्रधानकारणवादी सांख्य म्हणजे लोकायतिकांचे नास्तिक मतच होय. शीलांक हा जैन भाष्यकार सांख्य आणि लोकायतिक यामध्ये भेदच करीत नाही. स्वतः शंकराचार्यांनीही सांख्यांच्या तोंडी लोकायतिकांचे आधार घातले आहेत. ब्रह्मसूत्रकारांनी आपल्या एकूण ५५५ सूत्रांपैकी विरोधकांचे खंडन करण्यासाठी १०३ सूत्रे खर्चिली आहेत. यांपैकी ६० सूत्रे केवळ सांख्य-खंडनासाठी आली आहेत. यावरून लोकायतिकांच्या निरीश्वरवादी–वेदांतविरोधी मताचा त्यावेळी किती प्रभाव होता हे दिसून येते. उत्तरकालात वेदांतामध्ये विलीन झालेल्या सांख्यांचे स्वरूप मूळ सांख्यांहून अगदी भिन्न असले पाहिजे हेही यावरून स्पष्ट व्हावे.

मूळ सांख्याचा शोध

सांख्यकारिका आणि सांख्यसूत्रे हे दोनच सांख्यग्रंथ आज उपलब्ध आहेत. या दोनीही ग्रंथात वेदांताची फार मोठ्या प्रमाणावर भेसळ झाली आहे. या उपलब्ध वाङ्मयावरील भाष्ये वेदांतविचाराच्या पंडितांनी लिहिली असल्यामुळे त्यांचाही आपणास फारसा उपयोग नाही. 'षष्ठीतंत्र' नावाचा मूळ सांख्यग्रंथ उपलब्ध नाही. गुणरत्नाने 'माठरभाष्य' आणि 'आत्रेयतंत्र' यांचा उल्लेख केला आहे. पण हे ग्रंथही उपलब्ध झालेले नाहीत. डॉ. दासगुप्तांच्या मते 'चरकसंहिता' म्हणजेच आत्रेयतंत्र असावे. महा-भारतात काही ठिकाणी सांख्याचे जे वर्णन आले आहे ते चरकसंहितेशी जुळणारे असल्याने मूळ सांख्याचा शोध घेताना या संहितेचा काही उपयोग होण्याची शक्यता आहे. परंतु या सर्वांहून ब्रह्मसूत्रकारांनी

५. ब्र. सूत्र II. १·३ वरील आचार्यभाष्य.

६. ब्र. सू. I. १·१२ आचार्य भाष्य: प्रधानमल्लनिबर्हणन्यायाने सांख्यखंडनात अन्य विरोधकांचे खंडन येते.

७. ब्र. सू. कारांनी सांख्यांचे पुढील सूत्रांत खंडन केले आहे. I. १·५–११, I. ४·१–२८, II. १. १–११, II. २·१–१०.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

खंडन केलेले सांख्यमत अधिक महत्त्वाचे मानले पाहिजे. ब्रह्मसूत्रकार हे काही अस्तित्वात नसलेल्या, काल्पनिक मतांचे खंडण करीत नव्हते. त्यांच्यापुढे वैदिक परंपरेला अत्यंत विरोधी, प्रखर तर्कवादी, आणि लोकमनाला भुरळ घालणारा असा सांख्यविचार प्रधानमल्लाच्या रूपाने उभा होता. तेव्हा प्रामुख्याने ब्रह्मसूत्रांच्याच आधारे मूळ सांख्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू. अर्थात् सूत्रकारांचा युक्तिवाद समजण्यासाठी 'भाष्य-कारात वाट पुसत'च जाणे भाग आहे.

सांख्याचा प्रधानकारणवाद

'ईक्षतेर्नाशब्दम्[८]' या सूत्रात सूत्रकारानी सांख्यांच्या जडवादाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. विश्वाची उत्पत्ति ईक्षणक्रियेने झाली असे श्रुति सांगतात. आणि सांख्यांचे 'प्रधान' अथवा 'प्रकृति' जड असल्याने त्याच्याबाबतीत 'ईक्षण' शक्य नाही. तेव्हा अचेतन असे प्रधान विश्वाचे उत्पत्तिकारण संभवत नाही. (१.१.५ या सूत्राचा मथितार्थ) पुन्हा अ. २ पा. २ सूत्रें १ ते १० मध्ये सूत्रकारांनी सांख्यांच्या जडवादाचे आणि स्वभाववादाचे खंडन केले आहे. गौडपादांनी तर सांख्यांना स्पष्टच 'स्वभाववादी' म्हटले आहे. या प्रश्नाचा नंतर स्वतंत्र विचार करूच; पण सध्या एक गोष्ट स्पष्ट व्हावी की सूत्रकार आणि भाष्यकार—दोघांचाही सांख्यांना जो प्रखर विरोध आहे तो त्यांच्या अचेतन कारणवादासाठी. ब्रह्मसूत्रकारांचा चेतनकारणवाद आणि सांख्यांचा अचेतनकारण यामधील मूलभूत असा हा संघर्ष आहे.

सांख्यांचा वेदविरोध[१०]

ब्रह्मसूत्राच्या काळात सांख्यांच्या प्रधानकारण-वादाचे समर्थन श्रुतींच्या आधारे करण्याचा प्रयत्न होत असावा. सूत्रकारांनी याही प्रयत्नाला प्रखर विरोध केला आहे. सांख्यतत्त्व केवळ वेदबाह्य न असे नव्हे, तर ते वेदविरोधीही आहे असे सूत्रकारांनी आणि आचार्यांनी स्पष्ट सांगितले आहे. सांख्यविरोधी ६० सूत्रांपैकी निदान ३७ सूत्रे तरी सांख्याचे श्रुतिविरोधित्व सिद्ध करण्यासाठी खर्च केली आहेत. I. 1. 5 या सूत्रावरील आचार्यभाष्य पाहा: "It is impossible to find room in The Vedant Texts for the *non-intelligent Pradhan*, the fiction of the sankhyas; because it is not founded on Scriptures ..." श्रुतींच्या खालोखाल स्मृतींचा अधिकार आहे असे म्हणून जर सांख्य कपिलस्मृतीचा[११] आधार घेऊं पाहतील तर तेही सूत्रकारांना आणि आचार्यांना मान्य नाही. 'ज्या स्मृति श्रुतिविरोधी जातात त्या स्मृति त्याज्य होत, मग त्या कपिलासारख्या सर्वमान्य ऋषीने केलेल्या असल्या तरी त्याज्यच होत.' शंकराचार्य एक पाऊल पुढे जाऊन म्हणतात की 'सांख्य तत्त्वज्ञानाचे जनक कपिलमुनि आणि सगरपुत्रांचे भस्म करणारे वासुदेव कपिल हे भिन्न असण्याची शक्यता आहे. ज्याअर्थी सांख्य कपिल हे श्रुतिविरोधी जातात त्या अर्थी ते अस्वीकार्य होत. मनु हा सर्वश्रेष्ठ स्मृतिकार होय. श्रुतीनीच त्याची थोरवी वर्णिली[१२] आहे. कपिलमत

८. ब्र. सू. I. १–५.

९. सां. का. २७ वरील भाष्य.

१०. सांख्य तत्त्वज्ञानाला श्रुतींचा आधार आहे असे मत त्यावेळी सांख्यांच्या पुरस्कर्त्यांकडून मांडले जात असावे. आजही सांख्याचा उगम उपनिषदातून झाला असे मानणारे पंडित आहेत. कठोपनिषद्: I. ३.१०–११, II. ३. ७–८, श्वेता. उप. I. ८, १०, III. १२, IV. १०, V. २, ७, ८, VI. १०, १३, १६ इ. प्रश्नो. IV. ८ या उताऱ्यात सांख्यांचा उगम सांपडू शकेल असे यांचे म्हणणे. या उताऱ्यात सांख्यांची परिभाषा आली असली तरी सांख्यप्रतिपादनाहून येथील प्रतिपादन मूलतः भिन्न आहे. सांख्यखंडनासाठी ही परिभाषा आली असण्याची शक्यता आहे. कठोपनिषदांतील वचन सर्वांत अधिक महत्त्वाचे आहे. पण तेथे प्रधानकारणवादाचे खंडन आहे.

११. ब्र. सू. II १.१ वरील आचार्यभाष्य.

१२. Whatever Manu said is medicine (तै. सं.) सांख्यमत वेदविरुद्ध तर आहेच; शिवाय ते 'वेदानुसारी मनुवचनविरुद्ध' आहे. (ब्र. सू. भाष्य II १.१–२).

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

मनुविरोधी जाते तेव्हा ते त्याज्यच याप्रमाणे सूत्रकारांनी आणि आचार्यांनी सांख्यांचे वेदविरोधित्व अनेक ठिकाणी स्पष्ट शब्दात मांडले आहे. जिज्ञासूंनी ते मुळातूनच पाहावे[13].

सांख्यकारिका आणि सांख्यसूत्रे यांनी वेदांताशी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असूनही त्यांचा वेद-विरोध पूर्ण लोपलेला नाही हे लक्षात ठेवावयास हवे. 'दुःखपरिहाराचे वेदोक्त उपायसुद्धा दृष्ट उपायासारखेच अशाश्वत आहेत असे सांख्यकारिका सांगते. (का. २) सांख्यसूत्रातही हीच भूमिका आढळते. (सां. सू. १·६; १·८२) यावरून गार्बेने पुढील निष्कर्ष काढला आहे: "originally the Sankhya must have taken up a position of direct opposition to the doctrines of the Brahmanas ..."

सांख्यांच्या वेदबाह्यतेचा परिस्थितिजन्य पुरावा

महाभारतातील[14] सांख्यपरंपरेचा एक उल्लेख लक्षणीय आहे. सांख्य तत्त्वज्ञानाचा आद्यप्रवर्तक कपिलमुनि (पुरुष) नसून 'कपिला' नामक स्त्री असावी अशा अर्थाचा हा उल्लेख आहे. सांख्यकारिकेने[15] आपल्या तत्त्वज्ञानाची जी परंपरा दिली आहे तीच परंपरा वरील लिंगभेदाने महाभारतात आली आहे. कपिल–आसुरी–पंचशिख अशी कारिकेची परंपरा आहे. महाभारतात ही परंपरा पुढीलप्रमाणे आहे: "कपिला ही आसुरीची पत्नी. पंचशिख जेव्हा आसुरीकडे ज्ञानार्जनासाठी राहिला होता तेव्हा कपिलेने आपले स्तन्य पाजून त्याची जोपासना केली. यास्तव तो कापिल अथवा कापिलेय अथवा कपिलापुत्र या नावाने ओळखला जातो. प्रौढ विद्यार्थ्याला स्तन्य पाजण्याची कल्पना चमत्कारिक आहे. हे स्तन्य म्हणजे सांख्यतत्त्व असणे शक्य आहे. पंचशिखानी सांख्यतत्त्व कपिलेपासून घेतले असा याचा अर्थ होऊ शकेल. स्त्रीने गुरु बनून ज्ञानदान करण्याची ही कल्पना तंत्र–लोकायतपरंपरेतच होती. महाभारतातील हा उल्लेख सहजासहजी फेटाळून लावण्याजोगा नाही. सांख्याच्या अतिप्राचीन परंपरेचा हा उल्लेख असण्याची शक्यता आहे.

गार्बे आणि म. म. हरप्रसादशास्त्री यांनी आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आपले लक्ष वेधले आहे. सांख्यतत्त्वज्ञानाचा विकास प्रारंभी पूर्व आणि ईशान्य भारतात झाला (बंगाल, आणि नजिकचा प्रदेश: The Vangas the Vagadhas and the Ceras) गंगासागर-मार्गावर कपिलाश्रम वसलेला आहे. कपिलांचे वास्तव्यही याच प्रदेशात असल्याचे परंपरा सांगते. वेदविरोधी बौद्धांचा उदयही याच भागात झाला हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. आणि हा सर्व प्रदेश तंत्रसाधनेचा प्रदेश आहे हेही महत्त्वाचे आहे. ब्रह्मसूत्रकार आणि भाष्यकार सांख्याना आग्रहाने वेद-बाह्य–वेदविरोधी मानतात या बरोबरच वरील घटना लक्षात घेतल्यास सांख्य हे वेदविरोधी होते या भूमिकेला अधिक बळकटी येते.

सांख्यामधील अंतर्गत विरोध

सांख्य तत्त्वज्ञानाने प्रकृति हे विश्वाचे आदिकरण मानले असले तरी 'पुरुष' हेही स्वतंत्र, चेतन तत्त्व मानले असल्याने सांख्य तत्त्वज्ञान जडवादी मानतां येणार नाही असे काही अभ्यासक मानतात. उत्तर-कालीन सांख्याप्रमाणेच ब्रह्मसूत्रकारांनी खंडण केलेल्या सांख्यमतातही 'पुरुष' आहेच. तेव्हा हा केवळ उत्तरकालीन प्रक्षेप आहे असे म्हणूनही चालणार नाही. सांख्य तत्त्वज्ञानाच्या चौकटीत पुरुषाचे स्थान कोणते, आणि 'पुरुष' शब्दाचा मूळ अर्थ काय असावा याचा विचार करावयास हवा.

सांख्याच्या मूलभूत तत्त्वांप्रमाणे विश्वसर्ग प्रकृति करते. पुरुष अक्रिय, उदासीन, निर्गुण आहे. साहजिकच पुरुषाला विश्वनिर्मितीच्या या कार्यात कोणतेही स्थान नसताना त्याचे अस्तित्व गृहीत धरण्याची आवश्य-कताच काय असा प्रश्न निर्माण होतो. सांख्यांनी अशा प्रकारचा शुद्ध, निष्कल, अक्रिय पुरुष मान्य केल्यामुळे शंकराचार्यांनी[16] तेवढ्यापुरती सांख्याना मान्यता दिली आहे. परंतु अचेतनप्रधानकारणवाद मानणाऱ्या

१३. ब्र. सू. भा. I. १. ५–११, I. ४. १–२८, II. १. १ ते २.

१४. शांतिपर्व. अ. २१८.

१५. सां. का. ७०.

१६. ब्र. सू. भाष्य II. १·१२

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सांख्यतत्त्वज्ञानाच्या चौकटीत हा 'पुरुष' (वेदांत्यांचा 'आत्मा' अथवा 'ब्रह्म') बसूच शकत नाही. एक अचेतनप्रधानकारणवाद मानून जडवादी भूमिका तरी स्वीकारावी (लोकायतिकाप्रमाणे), अथवा चेतनकारणवाद मान्य करून **विवर्तवाद** तरी स्वीकारावा अशी बिनतोड भूमिका आचार्यांनी मांडली आहे. सांख्यांनी पुरुषाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी जो युक्तिवाद केला आहे, जे दृष्टांत दिले आहेत तो सांख्याचा सर्वात कच्चा दुवा होय. 'पुरुष' म्हणजे शुद्ध, चैतन्य तत्त्व हा अर्थ एकदा मानल्यास सांख्यांचे 'पुरुषबहुत्वम्' गळून पडते. आणि विश्वसर्गाची सत्यताही लोप पावते. हे विश्व म्हणजे अव्यक्त, जड प्रकृतीचा परिणाम असे म्हटल्यास पुरुषाची आवश्यकताच उरत नाही; आणि पुरुषाच्या **प्रेरणेने** पुरुषाच्या **उपभोगासाठी**[१७] प्रकृति हे विश्व निर्माण करते असे म्हटल्यास पुरुषाचे शुद्ध, निष्कल स्वरूप नष्ट होते आणि त्याबरोबरच जड प्रकृति सहेतुक कार्य करते असा सिद्धांत मान्य करावा लागतो. सांख्यांनी ही विसंगति मान्य केली असली[१८] तरी वेदांती कदापिही ही भूमिका मानणार नाहीत. याठिकाणी सत्कार्यवाद, परिणामवाद आणि विवर्तवाद यांचे थोडेसे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

सत्कार्यवाद– परिणामवाद– विवर्तवाद

सांख्य हे सत्कार्यवादी आहेत. कार्याचे गुण कोणत्या ना कोणत्या स्वरूपात का होईना कारणात असलेच पाहिजेत. कारणात अंतर्भूत नसलेले नवे असे काहीही निर्माण होऊ शकत नाही[१९]. वटवृक्षाचे गुण सुप्तरूपात वटबीजात असलेच पाहिजेत. तेल हवे असल्यास रेती भरडून मिळणार नाही. दही हवे असल्यास दुधालाच विरजण लाविले पाहिजे. हे विश्व ज्या गुणांनी युक्त आहे तेच गुण अव्यक्त प्रकृतीमध्ये असले पाहिजेत. सांख्यांनी व्यक्तावरून अव्यक्त प्रकृतीचे अनुमान बांधले आहे. सांख्याचा हा कार्य-कारणभाव सृष्टीच्या निरीक्षणावरून निष्पन्न झाला आहे. दुधाचे रूपांतर दह्यात होणे अगर वटबीजाचे रूपांतर वटवृक्षात होणे यालाच **परिणामवाद** म्हणतात: "वस्तुनः पूर्वावस्थात्यागपुरःसरमवस्थान्तरप्राप्तिः परिणामः" यामध्ये वस्तूच्या मूळस्वरूपामध्ये होणारे **अवस्थांतर** गृहीत धरले आहे. वेदांतीही विश्वनिर्मितीचे कारण ब्रह्म मानतात. निष्क्रिय, शुद्ध, त्रिगुणातीत अशा ब्रह्माचे रूपांतर नाम-गुणयुक्त अशा विश्वामध्ये कसे होऊ शकेल? यातून मार्ग काढण्यासाठीच विवर्तवादाचा स्वीकार करावा लागतो. "वस्तुनः पूर्वावस्थायाः **अपरित्यागेन** अवस्थांतरभान् विवर्तः" ब्रह्माच्या मूळस्वरूपात काहीच विकार होत नाही, केवळ अज्ञानामुळे विश्वाचा ब्रह्मावर आभास होतो (शुक्ति-रजत्न्याय). तेव्हा वेदांती हे खऱ्या अर्थाने सत्कार्यवादी अथवा परिणामवादी असूच शकत नाहीत. ब्रह्मसूत्रकारांचा परिणामवाद[२०] हा अंतिमतः विवर्तवादच मानावा लागतो.

---

१७. सां. का. १७ "संघातपरार्थत्वात् . . ."

१८. सां. का. ५६, ५७, ५८.
"पुरुषविमोक्षनिमित्तं तथा प्रवृत्तिः प्रधानस्य" ५७.

१९. सां. का. ९ : "असदकरणादुपादानग्रहणात् । सर्वसंभवाभावात् । शक्तस्य शक्यकरणात्, कारणभावाच्च सत्कार्यम् ॥"

२०. ब्र. सू. I. ४.२६ "आत्मकृतेः परिणामात्" या सूत्रावरून ब्रह्मसूत्रकार परिणामवादी होते असे काही टीकाकार मानतात. पण ते बरोबर नाही. शंकराचार्यांइतक्या स्पष्ट शब्दात त्यांनी विवर्तवादाचा अथवा मायावादाचा उल्लेख केला नसला तरी त्यांचा परिणाम हा real modification नसून केवळ विवर्त आहे हे पुढील सूत्रात सूचित केले आहे. "अतएव चोपमा सूर्यकादिवत्" (३.२.१८) "आभास एव च" (२.३.५०) "मायामात्रं तु कार्त्स्न्येनानभिव्यक्तस्वरूपत्वात्" (३.२.३) आत्मनि चैवं विचित्राश्च हि" (२.१.२८) अविकारी ब्रह्म परिणाम पावते आणि पावत नाही या विसंगतीमधून "श्रुतेस्तु शब्दमूलत्वात्" (२.१.२७) या सूत्राने सुटका करून घेतली आहे.

II. १. १३–१४ या सूत्रामध्येही सूत्रकारांनी विवर्ताचीच कल्पना मांडिली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वेदांत्यांची ही विवर्तवादी भूमिका आपल्या प्रधानकारणवादाशी सुसंगत राहून मान्य करणे सांख्यांना कदापिही शक्य नाही. विश्वसर्ग हा अव्यक्त, जड प्रकृतीचा खरा परिणाम (real modification) आहे असे ते मानतात. अचेतन प्रकृतीपासून हे विश्व कसे निर्माण होऊ शकेल या शंकेला 'स्वभाववाद' हे सांख्यांचे उत्तर आहे. ब्रह्मसूत्रकारांनी आणि शंकराचार्यांनी ज्या पद्धतीने सांख्याचे खंडन केले आहे त्यावरून सांख्यांचा 'स्वभाववाद' अगदी स्पष्ट होतो. दूध अथवा पाणी जड असूनही वाहणे हा त्यांचा 'स्वभाव' आहे, त्याप्रमाणे सर्ग हा जडप्रकृतीचा स्वभाव आहे असे सांख्य मानत असावेत. आचार्यांनी II. २·३ या सूत्रावरील भाष्यात याच युक्तिवादाचे खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे. आचार्यांनी योजिलेला '**स्वभावेनैव**[२१]' हा शब्द मूळ सांख्यावर प्रकाश टाकणारा आहे. गौडपादांनीही सांख्य हे स्वभाववादी आहेत असे म्हटले आहे. जडवादी तत्त्वज्ञानाला स्वभाववादी भूमिकाच घेणे प्राप्त आहे. आजचे सारे विज्ञान याच भूमिकेवर अधिष्ठित झाले आहे. प्रकृतीच्या सूक्ष्म निरीक्षणाने विश्वाचा गतिसिद्धांत समजून घेणे हीच विज्ञानाची भूमिका होय. सांख्यांनी कार्यकारणभावाचा आणि स्वभाववादाचा अंगीकार करून हीच शास्त्रीय भूमिका घेतली होती. सांख्यांच्या या 'गुरुतर तर्कवादी' भूमिकेला आचार्यांचा विरोध होता. कारण या भूमिकेवरून चेतनब्रह्मकारणवाद सिद्ध होऊ शकत नाही. सगुण, जड विश्वाचे कारण निर्गुण, चैतन्यरूप ब्रह्म असू शकणार नाही. ब्रह्मकारणवादी भूमिका घेणाऱ्या पक्षाला तर्काशी सुसंगत राहावयाचे असल्यास विवर्तवादी भूमिकाच घ्यावी लागते. आचार्यांची भूमिका हीच आहे. सांख्यांनी अचेतनप्रधानकारणवाद न सोडता आपल्या तत्त्वज्ञानात चेतन, परंतु अक्रिय पुरुषाला स्थान देण्याचा जो प्रयत्न केला आहे तो मूलभूत विसंगति निर्माण करणारा आहे. सूत्रकारांनी आणि आचार्यांनी केलेल्या सांख्यखंडनावरून एक गोष्ट अगदी स्पष्ट होते की सांख्याच्या विचारविश्वात पुरुषाला स्थान नाही. उत्तर कालात वेदांताच्या प्रभावामुळे जरी पुरुषांचा सांख्यदर्शनात प्रवेश झाला तरी त्याचे स्थान अत्यंत गौण आहे; तो 'उदासीन' आहे. या 'उदासीन' पुरुषाचे समाजशास्त्रीय रहस्य नंतर पाहू. सध्या सांख्यांच्या पुरुषबहुत्वाचा विचार करू.

सांख्यांचे पुरुषबहुत्वम्

सूत्रकारांनी आणि आचार्यादि इतर वेदांत्यांनी सांख्यांच्या पुरुषबहुत्वाचे अत्यंत जोरदार खंडन केले आहे याचे कारण सांख्यांच्या पुरुषकल्पनेत सापडते. सांख्यांचा पुरुष म्हणजे वेदांत्यांचा शुद्ध 'आत्मा' नसावा. पुरुषबहुत्वाची कारणे सांगताना त्यांनी जो युक्तिवाद[२२] केला आहे. तो महत्त्वाचा आहे. निरनिराळ्या पुरुषांचे जन्म, मृत्यु, व्यवसाय, स्वभाव भिन्न असतात याचे कारण त्यांच्या ठिकाणच्या सत्व, रज, तम या गुणांची भिन्नता. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की या ठिकाणच्या सांख्यांचा पुरुष हा प्रकृतीचाच सर्ग आहे. प्रकृतीच्या सत्व, रज, तम या गुणांनीच पुरुषांची रचना सिद्ध होते. वेदांत्यांचा आत्मा याहून मूलतःच भिन्न आहे. तो प्रकृतीपासून अलिप्त असून त्रिगुणातीत आहे; आणि असे असूनही विश्वाच्या निर्मितीचे तोच एकमेव कारण आहे याचा स्पष्ट आणि तर्कसिद्ध अर्थ असा की हे विश्व म्हणजे केवळ आभास आहे. (विवर्तवाद) सांख्य आणि वेदांत तत्त्वज्ञानातील मूलभूत भेद हाच होय. सांख्य विश्वाला प्रकृतीचा खरा परिणाम मानतात; आणि वेदांती विश्वाला ब्रह्मावरील विवर्त मानतात. (परिणामवाद विरुद्ध विवर्तवाद) ब्रह्मसूत्रकार, शंकराचार्य, माधवाचार्य आदि वेदांतानुयायांनी सांख्यांचे खंडन इतक्या प्रखरतेने करण्याचे हेच कारण होय. परिणामवाद स्वीकारला की स्वभाववाद आलाच ! आणि स्वभाववादावर अधिष्ठित झालेला परिणामवाद म्हणजे शुद्ध जडवाद होय. ब्रह्मसूत्रकारानी II. २·१–१० या सूत्रामध्ये[२३] सांख्याच्या याच जडवादी भूमिकेचे खंडन

२१. ब्र. सू. भाष्य : II. २.३, ५, ६.

२२. सां. का. १८ "जननमरणकरणानां प्रतिनियमादयुगपत्प्रवृत्तेश्च। पुरुषबहुत्वसिद्धं त्रैगुण्यविपर्ययाच्चैव॥'

२३. ब्र. सू. "अन्यथानुमितौ च ज्ञशक्तिवियोगात्" (II. २·९) "प्रवृत्तेश्च" (II. २·३) "व्यतिरेकानवस्थितेश्चानपेक्षत्वात्" (II. २·४) इ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

केले आहे. यावरून उदासीन, अक्रिय पुरुष स्वीकारूनही सांख्य जडवादीच मानले जात होते हे अगदी स्पष्ट दिसते. वेदांत्यांच्या कल्पनेशी सुसंगत असा 'पुरुष' स्वीकारुन ईश्वरकृष्णाने त्याचे कार्य स्पष्ट करण्यासाठी आंधळयाच्या खांद्यावर बसणाऱ्या पांगळया पुरुषाचा आणि लोखंडामध्ये गति निर्माण करणाऱ्या लोहचुंबकाचा दृष्टांत दिला आहे. परंतु या दोनही दृष्टांतावरून अक्रिय, उदासीन आत्मा प्रकृतीला सर्गप्रेरणा देतो हे सिद्ध होऊ शकत नाही. कारण प्रेरणा देणे हा अक्रियतेशी, उदासीनतेशी विसंगत गुणधर्म आहे. उदासीन आत्मा आणि प्रकृति यांमध्ये कोणताच दुवा नाही. शंकराचार्यांनी या भूमिकेचे चिनतोड खंडन केले आहे: "The Pradhan being the non-intelligent and the Purusa indifferent, and these being no third principle to connect them, there can be no connection of the two." मूळ सांख्य तत्त्वज्ञानाशी सुसंगत असणाऱ्या स्वभाववादाचा त्याग करून 'पुरुषा'ला प्रेरकशक्ति मानण्याचा ईश्वरकृष्णाने जो प्रयत्न केला आहे त्यातून ही मूलभूत विसंगति निर्माण झाली आहे. मूळ सांख्यामध्ये प्रकृतीला प्रेरणा देण्यासाठी पुरुषाची मुळीच आवश्यकता नव्हती. प्रकृति ही जड, स्वयंभु, स्वतंत्र वस्तु आहे. बाहेरील कोणत्याही तत्त्वाच्या साहाय्याशिवाय ती विश्वनिर्मिति करते. या घटनेचे स्पष्टीकरण केवळ स्वभाववादानेच होऊ शकते. पुरुषाच्या उपभोगासाठी त्याच्या मोक्षासाठी प्रकृति सर्ग करते असे सांगण्याचा ईश्वरकृष्णाचा प्रयत्न[२४] अगदीच विसंगत आहे. जड प्रकृतीच्या ठिकाणी यामुळे सहेतुकता संभवते आणि निर्गुण, अक्रिय पुरुषाच्या ठिकाणी उपभोग, बंध, मोक्ष या कल्पना संभवतात. वेदांत्यांची पुरुषकल्पना स्वीकारण्याचा प्रयत्न केल्यामुळेच ही चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली. मूळ सांख्य केवळ अचेतनप्रधानकारणवादीच असले पाहिजे. शीलांक या जैन तत्त्ववेत्याने सांख्यांच्या मूळ जडवादी आणि स्वभाववादी भूमिकेला उद्देशूनच त्यांची लोकायतिकाशी तुलना केली आहे: "... Though the Sankhyas admit Souls, these are absolutely incapable of doing any work, and all the work is done by the Prakriti, which is potentially the same as the gross elements, the body and the so-called mind is therefore nothing but the combination of the gross elements, and the admission of separate Purusas is only nominal." असा हा नाममात्र पुरुष लोकायतिक स्पष्ट नाकारतात; तर सांख्य उदासीन स्वरूपात त्याला ठेवून घेतात. सांख्य दर्शनात पुरुषाचे अस्तित्व असले तरी ते नाममात्र असण्याचे कारण नंतर पाहू. विश्वसर्गामध्ये पुरुषाला कोणतेही स्थान नाही एवढया बाबतीत त्यांचे लोकायतिकाशीच साम्य आहे. शंकराचार्यांनीही याच संदर्भात सांख्यांची लोकायतिकाशी तुलना केली आहे. अचेतन प्रकृतीच्या ठिकाणी कर्तृत्व संभवते हे सिद्ध करण्यासाठी सांख्यांनी लोकायतिकांचीच भूमिका घेतली आहे असे आचार्य म्हणतात[२५].

मूळ सांख्यांतील 'पुरुष'

सांख्यकारिकामध्ये दिसून येणारा 'पुरुष' हा वेदांत्यांच्या शुद्ध चैतन्यरूप आत्मतत्त्वाशी एकरूप झालेला आहे. पण तत्पूर्वीच्या सांख्य वाङ्मयातील पुरुषाचे स्वरूप भिन्न असावे हे ब्रह्मसूत्रकारांनी खंडन केलेल्या सांख्यविचारावरून ध्यानात येते. आत्म्याच्या अगर पुरुषाच्या आधाराशिवाय स्वतंत्रपणे विश्वसर्गकरणारी प्रकृति हेच सांख्यांचे मूलभूत तत्त्व असावे. सांख्यकारिकाहून प्राचीन असलेल्या चरकसंहितेमधील पुरुषकल्पना तर उत्तरकालीन 'पुरुषांहून अगदी भिन्न आहे. चरकाने सहा मूलधातु (elements) सांगितले आहेत. आकाश, तेज, वायु इ. पंचमहाभूते, आणि चेतन अथवा पुरुष हा सहावा[२६]. हा इतर धातूप्रमाणेच एक धातु आहे. त्याची

---

२४. सां. का. ५७, ५८.

२५. S. Books of the East : XXXIV 368.

२६. H. I. P. Dasgupta (I. 213, 214)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पातळी भिन्न नाही. दुसऱ्या दृष्टीकोनातून पाहता चरक २४ मूलतत्त्वे सांगतो (१० इंद्रिये, ५ तन्मात्रे, मन, आणि अष्टधा प्रकृति.) यात पुरुषाचा उल्लेखच नाही. हा अनुल्लेख इतका ढळढळीत आहे की चक्रपाणी या चरकसंहितेवरील टीकाकाराला खुलासा करणे आवश्यक वाटले : 'प्रकृति आणि पुरुष ही दोनही तत्त्वे अव्यक्त असल्यामुळे त्या **दोहोंचीही गणना एकातच** केली आहे असे सांगून प्रकृति आणि पुरुष यांचे स्वतंत्र आणि भिन्न स्वरूपातील अस्तित्वच नाहीसे करून टाकण्याला त्याने अहेतुकपणे साहाय्य केले. चरकाच्या या मताचे डॉ. दासगुप्ता पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करतात : " Caraka identifies the *avyakta* (the unmanifested) part of the Prakriti with the Purusa as forming one category. The *Vikara* or evolutionary products of the Prakriti are called *Ksetra*, whereas the *avyakta* part of the Prakriti is regarded as Ksetrajna. This avyakta and cetana are one and the same entity. From this unmanifested Prakriti or cetana is derived the buddhi ..." चरकाच्या विचारांचे हे स्वरूप जर खरे असेल तर मूळ सांख्यात **पुरुष अथवा चेतन हा प्रकृतीचाच एक घटक होता** हे मान्य करावयास हवे. आधुनिक भाषेत हेच सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की **चैतन्य ही जडाचीच विकसित अवस्था होय.**

महाभारतामध्येही २४ तत्त्वांच्या सांख्याचा उल्लेख आहे, त्याअर्थी ईश्वरकृष्णाच्या कारिकांपूर्वी **पुरुषतत्त्वाला स्वतंत्र स्थान नसलेले अचेतन प्रकृतीलाच मूलभूत तत्त्व मानणारे** सांख्यदर्शन अस्तित्वात असावे असे वाटू लागते. या ठिकाणी पुरुषाचा जो उल्लेख आहे तो जड प्रकृतीचा एक घटक एवढाच आहे. उत्तरकालीन सांख्यातील पुरुष हा शुद्ध त्रिगुणातीत (प्रकृतीहून भिन्न), चैतन्यरूप आहे. ईश्वरकृष्णाने सांख्यावर केलेले हे वेदांताचे कलम होय. शुद्ध, ज्ञानरूप आत्म्याची कल्पना स्वीकारल्यामुळे ईश्वरकृष्णाला आपल्या मूलभूत तत्त्वांचाही त्याग करावा लागला आहे. हे दृश्य विश्व म्हणजे प्रकृतीचा खरा परिणाम (real modification) आहे या तत्त्वाचा त्याग करून विवर्तवादापर्यंत तो येऊन पोचला आहे.[२७]

वेदांतामधील पुरुषकल्पनेचा विकास

वैदिक वाङ्मयातही 'पुरुष' कल्पनेचा विकास झालेला दिसून येतो. प्रारंभावस्थेतील 'पुरुष' हा शुद्ध चैतन्यरूप आत्मतत्त्व नव्हता. शतपथ, तैत्तिरीय, तांड्य, ऐतरेय या ब्राह्मण ग्रंथांचा आधार देऊन डॉ. बेलवलकर आणि रानडे यांनी असे दाखवून दिले आहे की, प्रारंभी पुरुष हा शब्द मानवदेहधारी 'पुरुष' या अर्थाने आलेला[२८] आहे. हळूहळू उपनिषद्‌काळात त्याला शुद्ध आत्मतत्त्वाचे स्वरूप प्राप्त झाले. याठिकाणी आणखी एक गोष्ट विचारात घ्यावयास हवी, वैदिक वाङ्मयातील पुरुष हा शब्द केवळ 'मानव' या अर्थाने आलेला नसून पुल्लिंगवाचक अर्थ येथे अभिप्रेत असला पाहिजे. गोपालन अवस्थेतील पितृसत्ताक समाजजीवन जगणाऱ्या आर्यांना मानव या अर्थी 'पुरुष' हाच शब्द सुचावा हे स्वाभाविक होते. आर्यांचे बहुतेक सर्व देव पुरुष आहेत याचे रहस्य त्यांच्या समाजपद्धतीतच सापडते. उत्तरकाळात शेतीशी जेव्हा त्यांचा संबंध आला तेव्हा सीता, उर्वरा, अनघा, समा या स्त्रीदेवता त्यांनी स्वीकारल्या अर्थात् या देवता शेतीशी संबद्ध आहेत हे ध्यानात ठेवले म्हणजे गोपालन समाजाचे पितृसत्ताक वैशिष्ट्य ध्यानात येते.

आर्यांच्या या पुरुषकल्पनेला ऋग्वेदाच्या शेवटच्या कालखंडात 'विश्वतत्त्वाचे[२९] (Cosmic Principle) विराट रूप प्राप्त झाले आहे. यासाठी प्रथम त्याचे मानवदेहधारी स्वरूप गळून पडणे आवश्यक होते. उपनिषद वाङ्मयात असा प्रयत्न जाणीवपूर्वक

२७. सां. का. ६२, ६४.

२८. H. I. P. II. 427.8 बेलवलकर – रानडे.

२९. पुरुषसूक्तांतील विराटपुरुषाची कल्पना.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

केलेला आढळतो.[३०] या काळाच्या सुमारास वैदिक आर्यांच्या भौतिकवादी विचारांचा लोप होऊन अध्यात्मवादाचा उदय झाला आणि त्यांच्या मानवदेहधारी पुरुषाचे परिवर्तन शुद्ध ज्ञानरूप आत्मतत्त्वात झाले.

सांख्यांच्या पुरुषकल्पनेचा विकास या मार्गाने झालेला असणे शक्य नाही. प्रकृतीला प्राधान्य असणाऱ्या-प्रकृति हेच विश्वतत्त्व (Cosmic Principle) मानणाऱ्या समाजातील पुरुष हा सांख्यांचा पुरुष होय. येथे पुरुषाला गौण स्थान आहे. येथे विश्वतत्त्वाची प्रतिष्ठा पुरुषाला लाभलेली नसून प्रकृतीला–स्त्रीतत्त्वाला लाभलेली आहे. तांत्रिकांच्या विश्वनिर्मितिकल्पनेची विकसित आणि तर्कनिष्ठ अवस्था म्हणजे सांख्यांचा प्रकृतिकारणवाद. ही कल्पना मातृसत्ताक समाजरचनेतच सुचणे शक्य आहे. सांख्यांच्या उदासीन पुरुषाचे रहस्य याच समाजपद्धतीत सापडू शकेल.

सांख्यांनी पुरुष शब्द जो वापरला आहे तो 'पुंलिंग' वाचक आहे यात शंकाच नाही. उत्तर कालात त्याला आत्म्याचे रूप देण्यात आले तरी त्याचा मूळचा पुल्लिंगवाचक अर्थ पूर्णपणे लुप्त झालेला नव्हता. सांख्यकारिकेमध्ये पुरुषाऐवजी 'पुमान्', 'पुसः'[३१] हे शब्द योजिलेले आढळतात. सांख्यांचा प्रकृति शब्द तर तांत्रिकापासूनच आलेला आहे. तेव्हा त्याचा स्त्रीवाचक अर्थ तर स्पष्ट आहे. प्रकृतीचे स्पष्टीकरण करण्यासाठी कारिका आणि सांख्यसूत्रेही 'नर्तिका' हा शब्द वापरतात. सांख्यांचा विश्वनिर्मितीची कल्पना तांत्रिकांच्या स्त्रीपुरुष (प्रकृति–पुरुष) संयोगकल्पनेवरच अधिष्ठित झाली आहे. ११ व्या कारिकेवर भाष्य लिहिताना गौडपादांनी ही संयोगकल्पना स्पष्ट मांडली आहे: "... as the birth of a child proceeds from the union of the male and the female, so the production of creation results from the union of the Prakriti and the Purusa." हा केवळ दृष्टांत नव्हे. तांत्रिकांच्या विश्वनिर्मितिकल्पनेतून विकास पावलेली सांख्यांची विश्वनिर्मितिकल्पनाही स्त्री–पुरुष संयोगतत्त्वावरच अधिष्ठित झालली आहे. मानवी जन्म आणि मृत्यु या परिभाषेतच विश्वाचा जन्म आणि प्रलय समजून घेण्याचा सांख्यांचा प्रयत्न चरकसंहितेमध्ये दिसून येतो.[३२]

या सर्व घटनावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते की सांख्यांचा पुरुष हा पुल्लिंगवाचक आणि प्रकृति ही स्त्रीलिंगवाचक अर्थाने योजिलेली आहेत. 'प्रसवधर्मी' प्रकृतिच विश्व निर्माण करते, पुरुषाचे अस्तित्व आहे. पण त्याचे स्थान अत्यंत गौण आहे. या घटनेचा उलगडा मातृसत्ताक समाजाचे स्वरूप तपासून पाहण्याने होऊ शकेल.

मातृसत्ताकातील पुरुषाचे स्थान

मातृसत्ताकात पित्याचा कुळाशी संबंध जवळजवळ नसतोच. चिनी भाषेत कुलनामवाचक शब्दाचा अर्थ 'born of a woman' असा होतो. खासी टोळयामध्ये '... from the woman sprang the clan' असा वाक्प्रचार आहे. मुलांचा वंश आईचा. पिता केवळ 'पिता' (begetter) होय. मधूनमधून 'स्त्रीला' भेट देणारा, परका पाहुणा एवढेच त्याचे स्थान ! "In Jowai he neither lives nor eats in his wife's house, but visists it only after dark." "...this does not leave much scope for the man. As a husband he is a stranger to his wife's people who refer to him curtly as a begetter." एके वेळी अज्ञात असलेले निर्मितिक्रियेतील पुरुषाचे स्थान ज्ञात झाल्यावर त्याला 'begetter' हे स्थान तरी लाभले. परंतु व्यावहारिक जीवनात कुटुंबाच्या दृष्टीने त्याला मुळीच स्थान नसल्याने तो केवळ 'उदासीन' 'परका' पाहुणाच राहिला. पुरुषाचे हेच स्थान सांख्य तत्त्वज्ञानात प्रतिबिंबित झाले असावे. स्त्रीपुरुषसंयोगातून

---

३०. "There is a Purusa who is non-human" (अमानवः : छां. IV 15. 5. ही अमानवी आत्म्याची कल्पना पुन्हा पुन्हा येते.

३१. सां. का. ११, ६०.

३२. H. I. P. Dasgupta I. 215.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ज्याप्रमाणे प्रजोत्पत्ति होते त्याप्रमाणेच प्रकृति-पुरुष-संयोगातून विश्वनिर्मिति होते असे तांत्रिकांप्रमाणेच सांख्यही मानतात. परंतु कौटुंबिक जीवनात ज्याप्रमाणे पुरुषाचे स्थान गौणच, त्याप्रमाणे विश्वजीवनातही 'पुरुषांचे स्थान गौणच. तो केवळ प्रकृतीला 'पाहणारा' (भेटणारा)!

उत्तरकालीन सांख्यातील 'पुरुष'

अचेतन प्रकृति हेच एकमेव विश्वनिर्मितीचे कारण मानणाऱ्या सांख्यतत्त्वज्ञानात वास्तविक पाहता पुरुषाला स्थान असू नये. परंतु मातृसत्ताक समाजपद्धतीमधील 'उदासीन' पुरुषाचे प्रतिबिंब या तत्त्वचिंतनामध्ये उमटले असावे हे वर आपण पाहिलेच आहे. सांख्य तत्त्वदर्शनातील याच कच्च्या दुव्याचा आधार घेऊन वेदांत्यांनी सांख्यांना प्रखर युक्तिवादाने नामोहरम केले. १७ व्या कारिकेमध्ये[33] पुरुषाच्या अस्तित्वाची सांख्यानी जी जी कारणे दिली आहेत त्या सर्वांचे शंकराचार्यांनी अत्यंत तर्कशुद्ध असे खंडन केले आहे.

(१) विश्वातील वस्तुमात्राच्या संघाताचा उपभोग घेणारा, कोणीतरी या त्रिगुणात्मक संघातापलीकडचा पुरुष असला पाहिजे. (२) त्रिगुणात्मक प्रकृति उपभोग घेऊ शकत नाही. म्हणून प्रकृतीच्या कक्षेबाहेर स्वतंत्र पुरुष असला पाहिजे. (३) रथाला ज्याप्रमाणे सारथी, त्याप्रमाणे या त्रिगुणात्मक विश्वाला संचालक असा पुरुष असला पाहिजे. (४) व्यक्तिमात्राच्या ठिकाणी कैवल्याची उत्कट ओढ असते त्याअर्थी प्रकृतीच्या सर्गातून मुक्त होऊ इच्छिणारा पुरुष असलाच पाहिजे. यावरून प्रकृति-पुरुष यांचा संबंध सामान्यपणे तीन प्रकारचा दिसून येतो. (अ) उपभोग्य-उपभोक्ता (ब) संचलित-संचालक (क) बंधक-बद्ध. पुरुष जर अक्रिय, उदासीन, शुद्ध ज्ञानस्वरूप (Pure Consciousness) असेल तर यापैकी एकही गोष्ट असंभाव्य आहे. अक्रिय पुरुष उपभोग घेऊ शकणार नाही, मार्गदर्शन करू शकणार नाही, आणि प्रकृतीकडून बद्धही होऊ शकणार नाही. जर पुरुष बद्धच होऊ शकणार नाही तर पुरुषाच्या मोक्षाला अर्थच नाही. दुसरे असे की साक्षीभूत पुरुष जोपर्यंत प्रकृतीला निर्मितीची प्रेरणा देत राहील तोपर्यंत विश्वसर्गाची क्रिया चालूच राहील. आणि मग पुरुषाचा मोक्ष अशक्यच होईल.[34] शिवाय पुरुषाच्या मोक्षासाठी प्रकृति सर्ग करते या म्हणण्यात जड प्रकृतीच्या ठिकाणी सहेतुकता आरोपित करण्याचा दोष निर्माण होतो. यातून दोनच मार्ग निघू शकतात :

(१) विश्वसर्गात पुरुषाला कोणतेही स्थान नाही असे मानणे (मूळ सांख्य) अथवा (२) पुरुष अविकारी, अक्रिय, बंधमोक्षातीत शुद्ध, ज्ञानस्वरूप असल्याने तो उपभोगही घेत नाही अथवा निर्मितीची प्रेरणाही देत नाही, कोणाकडून बद्धही होत नाही आणि त्यामुळे त्याच्या मोक्षाचा प्रश्नच उद्भवत नाही. हा विश्वाचा पसारा म्हणजे त्या अक्रिय ब्रह्मावरील विवर्त मानावा (वेदान्त मत). **ईश्वरकृष्णाने हा दुसरा मार्ग पत्करून सांख्यदर्शनाला वेदांतरूप दिले.** सांख्यांच्या उदासीन पुरुषाचे वेदांत्यांच्या शुद्ध ज्ञानरूप आत्म्यामध्ये रूपांतर झाले. "तस्मान्न बध्यतेऽद्धा न मुच्यते नापि संसरति कश्चित्। संसरति बध्यते मुच्यते च नानाश्रया प्रकृतिः ॥" शुद्धवेदांतामध्ये शोभून दिसेल अशीच भूमिका ६२, ६३, ६४, ६५ आणि ६६ या कारिकांमध्ये ईश्वरकृष्णाने घेतली आहे. प्रकृतिच बद्ध होते आणि पुरुषार्थ साधण्यासाठी मुक्त होते. तत्त्वाभ्यासाने 'न अस्मि', 'न मे', 'नाहम्' हे ज्ञान पुरुषाला होते. या ज्ञानामुळे प्रकृतीचा प्रसव थांबतो, शुद्ध ज्ञानस्वरूप पुरुष आता प्रकृतीकडे केवळ उपेक्षा बुद्धीने पाहतो.

३३. १७ व्या कारिकेत सांख्यांनी घेतलेली भूमिका मूळ अचेतन प्रधानकारणवादाचा त्याग करणारी आहे असे शंकराचार्यांनी ब्र. सू. II. २·७ या सूत्रावरील भाष्यात स्पष्ट म्हटले आहे. "...For this your new position involves an abandonment of your old position, according to which the Pradhan is moving of itself and the (indifferent, inactive Soul possesses no moving power." मूळ सांख्यांची जडवादी भूमिका येथे अगदी स्पष्ट झाली आहे.

३४. ब्र. सू. II. २·६ वरील आचार्यभाष्य.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आणि मग प्रयोजनच उरलेले नसल्यामुळे प्रकृति विश्वसर्ग बंद करते.[३५]

हे सर्व विवेचन प्रधानकारणवादाशी आणि परिणामवादाशी पूर्ण विसंगत आहे. काहीच निर्माण होत नाही; जे प्रत्ययाला येते ते केवळ विवर्तरूप आहे असे मानण्यानेच या विवेचनाची संगति लागू शकते. हेच सांख्यांचे वेदांतील विलिनीकरण होय.

उत्तरकालीन सांख्य जरी वेदांताची शाखाच बनले तरी मूळ सांख्यांतील अचेतन प्रधानकारणवादाने भारतीय तत्त्वचिंतनाला नवेच वळण लावले हे मान्य करावयास हवे. सांख्यांचे मूळ तांत्रिकांच्या प्रकृति-पुरुषवादात असले तरी सांख्य म्हणजे तंत्रोपासना नव्हे. प्राथमिक अवस्थेतील मातृसत्ताक-स्त्री प्रधान समाजव्यवस्थेत शेतीच्या सुफलीकरणासाठी मंत्रतंत्रात्मक विधि त्या वेळच्या तांत्रिकांनी निर्माण केले. तत्कालीन ज्ञानाच्या अवस्थेत त्यांना यात्वात्मक महत्त्वही होते. (magical Significance) परंतु सांख्यांनी या क्षेत्रांत क्रांतीच घडवून आणली. त्यांनी तांत्रिकांचा प्रकृति-पुरुषसिद्धांत घेतला आणि त्यात नवा आशय ओतून एक अत्यंत प्रभावी तर्कनिष्ठ असे दर्शन निर्माण केले. सांख्याच्या तर्कनिष्ठ विचारांचे खंडन करण्यासाठी शंकराचार्यांना श्रुतीचा[३६] आश्रय घ्यावा लागला. सांख्यांचा प्रखर युक्तिवाद प्रकृतीच्या-व्यक्त विश्वाच्या सूक्ष्म निरीक्षणावर अधिष्ठित झालेला होता. त्रिगुणात्मक विश्वाचे आदिकारण त्रिगुणातीत, शुद्ध चैतन्य रूप ब्रह्म असणे शक्य नाही. कार्याचे गुण कारणामध्ये असल्याशिवाय कारणाची कार्यात परिणति होऊच शकत नाही. हा कार्य-कारण भावाचा महत्वपूर्ण सिद्धांत मांडून या **त्रिगुणात्मक विश्वाचे कारण त्रिगुणात्मक प्रकृतिच** असली पाहिजे हा विचार त्यांनी प्रखर युक्तिवादाच्या साहाय्याने प्रस्थापित केला. यासाठीच ब्रह्मसूत्रकारांनी आणि शंकराचार्यांनी सांख्यांना 'प्रधानमल्ल' मानिले. सांख्यांच्या सत्कार्यवादाचा वेदांताला उपयुक्त असा विपरीत अर्थ लावण्याचा काही पंडितांकडून प्रयत्न केला जातो. 'कारणामध्ये कार्य असतेच' याचा 'जगात नवे काहीच निर्माण होत नाही; जे मुळात कारणरूपाने आहे ते तसेच अविकृत रहते.' असा अर्थ करण्याने विवर्तवाद सिद्ध करणे सोपे होते. पण सांख्यांच्या सत्कार्यवादाचा हा विपर्यास आहे. त्याना एवढेच म्हणावयाचे आहे की कार्याचे गुण कारणात सुप्तस्वरूपात असतात. (Potential) गौडपादानी हाच अर्थ दिला : "... From the nature of the Vrihi-plant we may infer that it must have been produced by the Vrihi-Seeds ..." याच तर्कपद्धती दृश्य विश्वावरून अव्यक्त प्रकृतीच्या रूपाचे अनुमान निष्पन्न होते. "The visible world is the product or effect of the Prakriti and as such, from the essential materiality of the visible world we may infer the essential materiality of the Prakrit itself." व्यक्त विश्व म्हणजे प्रकृति नव्हे. "Nature in the sence of the totality of the phenomena of the visible world, is potentially contained in the Prakriti —" अव्यक्त प्रकृतीमध्ये साम्यावस्थेत असणाऱ्या सत्व, रज, तम (Intelligence, Energy and Inertia) या गुणांना गतिमानता कशी प्राप्त झाली हे सांगणे कठीण आहे. परंतु त्यांच्या विविध स्वरूपी संयुगातून विश्वाचा विकास झाला ही सांख्यांची कल्पना विज्ञानाला जवळची आहे. जाणीवशक्ति (consciousness) ही मेंदूतील जड स्वरूपाच्या प्रक्रियेतून उद्भवते हे आजच्या वैज्ञानिक युगातील प्रायोगिक सत्य सांख्यांना समजले नसेल हे खरे; परंतु मन, बुद्धि, अहंकार ही जडाची परिणति आहे हे त्यांना समजले होते हे निश्चित्. तांत्रिकांना ज्याप्रमाणे विश्वनिर्मितीची कल्पना मानवी निर्मितिक्रियेवरून सुचली असावी, त्याप्रमाणेच सांख्यांना गर्भाच्या विकासक्रमावरून विश्वविकासाची कल्पना सुचली असावी. तांत्रिकांच्या पिंड=ब्रह्मांडवादातूनच ही

---

३५. केवल ज्ञानाने प्रकृतीचा पसारा लुप्त होतो, ती निवृत्त होते याचा अर्थ स्पष्ट आहे. 'आत्म्याच्या अज्ञानावस्थेत प्रकृतीचा सर्ग भासतो.' ज्ञान होताच हा आभास मावळतो. हा विचार शुद्ध वेदांतविचार होय.

३६. ब्र. सू. II १·२७ भाष्य.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कल्पना उद्भवू शकते. सीलने सांख्यांचा विकासवाद आधुनिक वैज्ञानिक परिभाषेत मांडण्याचा जो प्रयत्न केला आहे तो महत्त्वपूर्ण आहे. प्राचीन भारतातील भौतिकवादाचे अत्यंत उद्‌बोधक असे स्पष्टीकरण तेथे पाहावयास सापडते.[३७] आचार्यांनी सांख्याच्या भूमिकेचा सारांश सांगताना हीच जडवादी भूमिका अगदी स्पष्ट शब्दात मांडिली आहे: "The world which is non intelligent and comprises *Sattva*, *rajas*, and *tamas* can only be the effect of a cause itself non intelligent and made up of *Sattva*, *rajas* and *tamas*[३८] वेदांत्यांचा चेतन ब्रह्मकारणवाद आणि सांख्यांचा अचेतन प्रधानकारणवाद याचा समन्वय अशक्य आहे, उत्तरसांख्यांनी वेदांत्यांची 'पुरुष' कल्पना स्वीकारून अध्यात्मवादाच्या वेदीवर भारतीय भौतिकवादाचा बळी दिला.

वेदांत आणि सांख्य ही दोन परस्परभिन्न समाजजवनातून विकास पावलेली दर्शने आहेत. वैदिक आर्यांचे तत्त्वज्ञान गोपालन वृत्तीन (Pastoral) जगणाऱ्या पितृप्रधान समाजाचे निदर्शक आहे. या समाजात पुरुषाला विश्वतत्त्वाची प्रतिष्ठा लाभावी हे स्वाभाविक होते. या उलट सांख्यांचा प्रकृतिकारणवाद मातृसत्ताकामध्येच विकास पावणे शक्य आहे. वैदिक आर्यही एके वेळी जडवादीच होते. त्यांचेही इहलोक साधनापर मंत्रतंत्र होतेच. यज्ञसंस्था हे याचे उत्कृष्ट उदाहरण होय. त्यांच्याही मंत्रतंत्रामध्ये वामाचार होताच. परंतु यांतही पुरुषाला प्राधान्य होते. तांत्रिकांच्या प्रकृतिपुरुषवादातून विकास पावलेले सांख्यदर्शन प्रामुख्याने प्रकृतिप्रधानच राहिले, आणि यामुळेच त्याना विश्वविकासाची मूलतत्त्वे सांगता आली. दृश्य विश्वाला ब्रह्मावरील विवर्त मानणाऱ्या वेदांततत्त्वज्ञानाला भौतिक विकासक्रमाचा विचार करण्याचीही आवश्यकता भासू नये हे साहजिक होते.

---

३७. Seal : Positive Sciences of Ancient Hindus.

३८. S. B. E. XXXIV. 300.

चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान

— लेखक —

प्रा. सदाशिव आठवले

किं. ३ रु.

मिळण्याचें ठिकाण —

चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.

[जि. सातारा]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्रा. कमलाकर दीक्षित

औदुंबर : एक आकलन

बालकवि, निसर्ग आणि बालक

बालकवींची प्रतिमासृष्टि अपार समृद्ध आहे. त्यांच्या कवितेत प्रतिमांचा पाऊस आहे. बालकवि हे जन्मजात निसर्गकवि होते. (त्यांच्या अन्य विषयावरील कविता एकतर अपुऱ्या राहिल्या किंवा फसल्या हा याचा पुरावा.) अर्थात् त्यांच्या प्रतिमामुद्रां निसर्गाचा आश्रय घेणाऱ्या असतात. निसर्गातील वस्तु व घटना यांच्यावर मनुष्यत्वाचा आरोप करून या प्रतिमा निर्माण होतात बालकवींना निसर्गाचे मोहक रूपच मुख्यतः भावले आहे. अर्थात् त्यांच्या प्रतिमाही प्रामुख्याने मोहक स्वरूपाच्या असाव्या हेही ओघानेच आले.

बालकवींची वृत्ति बालकाची होती. या वृत्तीच्या माध्यमातून त्यानी आपले सर्व अनुभव शब्दांकित केले आहेत. आनंदाने बागडणे, स्वच्छंद भटकणे, पाण्यात खेळणे, फुले, फळे, पक्षी पाहून हर्षनिर्भर होणे ही कोणत्याही बालकाची वृत्ति असते. तसेच काही काही प्रसंगी रुसणे, फुगणे, खिन्न होणे, एकांतात जाऊन एकाकीच बसून राहाणे याही गोष्टी हळव्या, संवेदनाप्रधान बालवृत्तीला साजेशा असतात. तथापि बालकाच्या जीवनात तौलनिक दृष्ट्या खिन्नतेपेक्षा आनंद अधिक असतो हे बाल्याची स्तुतिस्तोत्रे गाणारे सारे कवि सांगतील. याचमुळे बालकवींच्या कवितेत आनंदी बालकाच्या प्रतिमा जेवढ्या आढळतात तेवढ्या खिन्न किंवा रुसल्याफुगल्या बालकाच्या आढळत नाहीत. पण म्हणून त्या कमी सुंदर व उपेक्षणीय असतात असे मात्र नाही, उलट खिन्न किंवा रुसलेल्या बालकाची प्रतिमा बालकवि जेव्हा रंगवितात तेव्हा विरळा असल्यामुळे ती अधिक वेधक वाटते.

औदुंबर

बालकवींची प्रसिद्ध कविता 'औदुंबर' ही या दृष्टीने विचारात घेण्याजोगी आहे :

"ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेउन
निळा सांवळा झरा वाहतो बेटाबेटातुन
चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गर्दी पुढे.
पायवाट पांढरी तयांतुन अडवी तिडवी पडे
हिरव्या कुरणामधुन चालली काळ्या डोहाकडे
झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटावर
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर."

—ही कविता आठच ओळींची आहे, परंतु परिपूर्ण आहे. म्हणजे एक संपूर्ण अनुभव या कवितेत शब्दरूप पावला आहे.

'झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटावर
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर'

—या शेवटच्या दोन ओळीतून प्रस्तुत कवितेतील मुख्य व मध्यवर्ती प्रतिमा व्यक्त झाली आहे. आपल्या छायेने जळ झांकळून, लाटावर गोड काळिमा पसरीत असलेला (असला) औदुंबर जळात पाय टाकून बसला आहे. (असला) हा औदुंबर नजरेसमोर येताच एखाद्या एका बाजूला रुसून बसलेल्या बालकाचे चित्र मनश्चक्षुसमोर तरळते.

रुसलेले बालक तरी काय करते ? एका कोपऱ्यात निमूट बसून राहाते. बोलत नाही की हलत नाही. आपला रुसवा ज्यांच्यावर आपण रुसलो त्याना कळावा म्हणून हुंदका दे, नाक ओढ, दार लावून घे अशा गोड लीला ते करीत असते. आपला रुसवा लोकांना कळावा, सगळीकडे पसरावा अशी त्याची इच्छा व प्रयत्न असतो. असे हे रुसलेले बालक मोठे गोड दिसते. त्याचा चेहरा खिन्न, काळवंडलेला दिसला तरी त्याच्यावरचा मूळचा गोडवा लोपत तर नाहीच परंतु अधिक वाढतो. (रागावलेली स्त्री अधिकच सुंदर दिसते असे म्हणतात. तसेच.) अगदी असेच रुसलेले गोड बालक शेवटच्या दोन ओळीतून ध्वनित केले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

या कवितेच्या पहिल्या चार ओळीत आनंदाचे, खेळकरपणाचे वातावरण दिसते. ऐलपैल, निळासावळा बेटाबेटातुन इ. शब्दातून बाल झऱ्याचे सानंद नर्तन सूचित होते. 'चिमुकले' या एकाच विशेषणाने एक टुमदार, सुंदर गावच नजरेसमोर येते असे नव्हे तर ते गाव आनंदी असले पाहिजे असे वाटते. शेतमळ्याची गर्दी 'दाट' असून 'हिरवी' आहे. तीही आनंद सुचविते. दुःखाचे प्रसंगी माणूस एकाकी राहणे पसंत करतो तर आनंदाच्या प्रसंगी चार मित्रमंडळी गोळा करून मौज मजा करतो. गर्दी या शब्दाने असाच आनंद व्यक्त केला आहे. तसेच हिरवा रंग हा चैतन्य-सूचक व आल्हादसूचक असतो. सारांश या पहिल्या चार ओळीनी नजरेसमोर उभे केलेले चित्र आनंदी आहे.

ऐलपैल, बेटबेट, निळा सावळा झरा, चिमुकले गाव या प्रतिमा तर उघडपणे बाळवृत्ति सुचवितात. म्हणजे पहिल्या चार ओळीनी मनावर आनंदी बालकांच्या क्रीडामग्न समुदायाचे एक चित्र कोरले जाते.

'पायवाट पांढरी तयातुनि अडवी तिडवी पडे
हिरव्या कुरणामधुन चालली काळ्या डोहाकडे'

यानंतरच्या दोन ओळीपासून वातावरण एकदम बदलले आहे. पहिल्या आनंदी, खेळकर बालक मंडळीपासून आपण दूर जाऊ लागतो. पायवाट पांढरी आहे. पांढरा रंग हा शांतता म्हणजे मौन सुचवितो. आनंदी बालकांच्या मेळाव्यातील एखादे बालक अचानक (काही कारणाने) शांत होऊन स्तब्ध उभे राहिले, मूक झाले. अशी सूचना 'पांढरी' हे विशेषण व 'पडे' हे स्थितिवाचक क्रियापद आपणास देते. हे मूक बालक त्या पायवाटेवरून वाकडी तिकडी पावले टाकीत चालू लागते. आजूबाजूला आनंदी बालके (हिरवी कुरणे) आहेतच! परंतु ते एकटेच पायवाटेवरून कसेबसे चालत डोहाकडे येते. हा डोह काळा आहे. काळा रंग खिन्नतासूचक असतो. या डोहात पाय टाकून, लाटावर आपल्या खिन्न रुसव्याचा गोड काळिमा पसरीत ते बालक मूकपणे बसून राहाते. या बालकाची प्रतिमा म्हणजे 'असला' औदुंबर! हे बालक रुसले आहे. त्याचा हा रुसवा गोड आहे. 'गोड काळिमा' या प्रतिमेने तेच स्पष्ट केले आहे.

अशा रीतीने ही छोटी कविता पूर्ण होते. ही कविता म्हणजे एक छोटे पण पूर्ण प्रवासचित्र आहे. पहिल्या चार ओळीत चार घरांचे चिमुकले गाव, निळा सावळा झरा, शेतमळ्यांची हिरवी, दाट गर्दी यांचे स्थितिचित्र आहे. नंतरच्या दोन ओळीतील अडवी तिडवी पायवाट आपल्याला हिरव्या कुरणामधून काळ्या डोहाकडे घेऊन येते. याच दोन ओळीत प्रवासाची सूचना आहे. शेवटच्या दोन ओळीतील जळात पाय टाकून बसलेला औदुंबर दिसताच हा प्रवास संपतो. अशा रीतीने या कवितेने स्थिति, गति व पुन्हा स्थिति असे चित्रण केलेले आहे. आनंदी खेळकर बालकांच्या मेळ्यातून रुसून एकाकी चालत चालत येऊन डोहातील पाण्यात पाय सोडून बसलेल्या एका उदास बालकाचे चित्र बालकवींनी या कवितेत औदुंबराच्या रूपाने सूचित केले आहे.

'औदुंबरात' वैराग्याचा शोध

श्री. दि. के. बेडेकर यानी (साहित्य निर्मिति व समीक्षा या आपल्या ग्रंथातील 'साहित्य समीक्षेचे स्वरूप' या लेखात) व श्री. कृ. बा. मराठे यानी (मनोहर, ऑगस्ट ६३ या अंकात) या कवितेचा अर्थ उपर्युक्त अर्थाहून वेगळा लावला आहे. श्री. बेडेकर व श्री. मराठे एकमेकाशी सहमत आहेत. मी मात्र त्या दोघांशी सहमत होऊ शकत नाही.

या दोघाही टीकाकारांच्या मते औदुंबराची प्रतिमा ही कवीच्या मनातील वैराग्यभावनेची द्योतक आहे. औदुंबर या विशिष्ट वृक्षाशी संबद्ध असलेल्या देवता-कल्पना व या देवताकल्पनातील आध्यात्मिक अर्थ या दोघा टीकाकारांना विशेष जाणवला. पायवाटेचा पांढरेपणा व डोहाचा काळेपणा या दोन रंगानी त्यांच्या मताला पुष्टि मिळाली असे त्याना वाटते. त्याना पांढरा रंग वैराग्यसूचक तर काळा रंग नैराश्य बोधक भासतो. सारांश, औदुंबराचा आध्यात्मिक संकेत, पांढरी पायवाट व काळा डोह या तीन मुद्यावर वरील टीकाकारद्वयाच्या निष्कर्षाची इमारत उभी आहे.

बालकवींच्या काव्यात वृक्षांच्या विशेषनामाचा उल्लेख कधी केलेला नसतो. फक्त या एकाच कवितेत हा प्रकार घडला आहे. तसेच कसलेही धार्मिक अगर आध्यात्मिक संकेतही ते सुचवीत नाहीत. ("निसर्ग-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

विषयी लिहिताना धार्मिक, सामाजिक व वैचारिक संकेतांची बंधने त्यांच्या आड आली नाहीत. लवलेल्या झाडावरचे फळ सहज हाती यावे तसे अनुभवाचे सहजाकार त्यांना गवसले." प्रा. गंगाधर गाडगीळ : बालकवींची कविता–साहित्याचे मानदंड) या कवितेतील औदुंबर हा विशिष्ट अवस्थेतील आहे. तो नेहमीचा औदुंबर नव्हे. तो जळ झाकळून, लाटावर गोड काळिमा पसरीत पाण्यात पाय टाकून बसलेला हा औदुंबर आहे. एका विशिष्ट अवस्थेतील औदुंबर आहे. यावरून बालकवींना औदुंबराचा अध्यात्ममूलक सांकेतिक अर्थ सुचवायचा नाही हे रसिकांना पटण्यास अडचण पडणार नाही.

शिवाय एकदा औदुंबराला आध्यात्मिक संकेतात गुरफटून टाकल्यामुळे अर्थातच पांढऱ्या रंगाचा वैराग्यसूचक तर काळ्या रंगाचा नैराश्यसूचक अर्थ घेणे उपयुक्त टीकाकारांना भाग पडले आहे. पांढरा व काळा रंग अनुक्रमे शांति (मौन) व खिन्नताही सुचवितात. हा सूक्ष्म फरक त्यांच्या ध्यानात आलेला दिसत नाही. शिवाय वादासाठी त्यांचे प्रतिपादन मान्य केले तरी एक प्रश्न उरतोच ! जर हा औदुंबर 'विकल', 'दुःखातिरेकाने वाचा गेलेला', 'त्वचेवर राख फासल्यासारखा दिसणारा' आहे तर त्याने पसरलेला काळिमा 'गोड' कसा ?

याचे उत्तर श्री वेडेकर देतात ते असे :-

(१) "औदुंबराने सूचित होणाऱ्या विरागी वृत्तीमध्ये जगाविषयी आसक्त असलेल्या माणसाची आर्तता व असंतोष नावालाही नाही; उलट निरासक्तीमुळे प्राप्त झालेला एक प्रकारचा आनंद आहे. हा आनंद अर्थातच त्या वैराग्यातच सामावलेला आहे. व हीच गोष्ट 'गोड काळिमा' या विलक्षण शब्दप्रयोगात यशस्वी रीतीने व्यक्त झाली आहे."

(२) श्री. कृ. बा. मराठे म्हणतात:– "मग जळातील हा काळिमा गोड कसा झाला ? कवीने या मुकेल्या हाती भारती दिली नि कळवले की उदासीनतेतही एक प्रकारचे सुख आहे ! सुखाच्या हिरवळीत दुःख झिरपत असते."

थोडा सूक्ष्म विचार केला तर ओढून ताणून लावलेला हा अर्थ कसा चुकीचा आहे हे कळणे अवघड नाही.

(१) निरासक्तीमुळे प्राप्त झालेला आनंद माणसाला समाधान देईल, शांति देईल. पण गोडवा कसा देईल ? एखाद्या प्रौढ योग्याच्या मुखावर शांति आढळेल का गोडवा ? गोडवा हा बालकाचा गुणधर्म ! विरागी योग्याचा नव्हे !

(२) तसेच उदासीनतेतही एक प्रकारचे सुख आहे, यात वाद नाही. परंतु या उदास सुखात गोडवा कसा निर्माण होईल ? उदासता सुखी असू शकेल, परंतु गोड असू शकणार नाही. एखादा योगी उदासीन वृत्तीने जगाकडे पाहात असता त्याच्या मुद्रेवर सुख दिसेलही ! पण गोडवा ? तो कसा बरे दिसेल ? कोणताही 'रसिक' असा आरोप करू धजणार नाही. असो.

क्रीडा नव्हे रुसवा

प्रा. रा. ग. जाधव हे (नवभारत, ऑक्टो. ६३ या अंकात) म्हणतात :– "ही प्रतिमा क्रीडावृत्तीने प्रभावित झालेली आहे. आणि म्हणून ती प्रतिमा क्रीडेच्या विविध हालचाली, अवस्था याना ध्वनित करणारी आहे. या क्रीडेच्या प्रतिमेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ते असे की ही क्रीडा एक प्रकारची बालक्रीडा आहे. बालकाच्या क्रीडेचे दर्शन घडविणारी आहे. बाह्य वर्णनाच्या मागे खेळणारी, हुंदडणारी एका क्रीडामग्न बालकाची मूर्ति या कवितेतून पारदर्शक होते. विशेषतः या क्रीडामग्न बालकाच्या प्रतिमेचे पूर्ण चित्र पाण्यात पाय टाकून बसलेल्या औदुंबराच्या वर्णनाने अधिकच स्पष्ट होते."

प्रा. रा. ग. जाधव यानी पाण्यात पाय टाकून बसलेला औदुंबर ही एका बालकाची प्रतिमा आहे हे मान्य केले आहे. श्री. वेडेकर व श्री. मराठे याच्या मानाने माझा त्यांच्याशी मतभेद कमी आहे. ही एका बालकाची प्रतिमा आहे येथपर्यंत मी त्यांच्याशी पूर्ण सहमत आहे परंतु हे बालक 'क्रीडामग्न' आहे असेही ते म्हणतात येथे मतभिन्नता उद्भवते.

हा औदुंबर जळ झाकळून, लाटावर गोड काळिमा पसरीत जळात पाय टाकून बसलेला 'असला' औदुंबर आहे. या त्याच्या अवस्थेत क्रीडामग्नता कोठे दिसते ? तो जर क्रीडामग्न असता तर पाण्यात टाकलेल्या पायानी त्याने इकडे तिकडे पाणी उडविले असते; निदानपक्षी ते पाय नुसते 'टाकुनि' न ठेवता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पाण्यातल्या पाण्यात हलविले तरी असते. पण तो हे असले काही करीत नाही. पाण्यात पाय टाकून तो नुसता बसला आहे. हू नाही की चू नाही. अशा बालकाला आपण 'क्रीडामग्न' कसे म्हणू शकू? क्रीडेमध्ये हालचाल गर्भित असते. येथे तर सारे निश्चल आहे, निष्पन्द आहे.

शिवाय या औदुंबराने जळ झाकळून टाकले असून लाटावर तो गोड कालिमा पसरीत आहे. तो जर क्रीडामग्न असेल तर तो आनंदी वृत्तीत असला पाहिजे. आणि जर तो आनंदी असेल तर 'कालिमा' का पसरीत आहे? 'कालिमा' या शब्दाने आनंदी वृत्ति सूचित होत नाही. काळसरपणा किंचित् खिन्न अशी उदासता ध्वनित करतो. प्रा. जाधव या कवितेचे रसग्रहण करीत असता क्रीडामग्न बालकाची प्रतिमा सूचित करताना 'कालिमा' या शब्दाला विसरलेले आहेत. त्यामुळे हे बालक क्रीडामग्न तर नाहीच परंतु क्रीडा सोडून देऊन एका बाजूला रुसून बसले आहे, हे त्याच्या लक्षात आलेले नाही.

सारांश, बालकवींच्या 'औदुंबर' या सुंदर कवितेत आपल्या खेळगड्यावर रुसून दूर डोहावर येऊन पाण्यात पाय टाकून, आजूबाजूच्या वातावरणात एक प्रकारची खिन्नता, एक प्रकारचा रुसवा पसरीत बसून राहिलेल्या गोड बालकाची प्रतिमा सूचित होते, असे मला वाटते.

प्राज्ञपाठशाला मण्डळ-ग्रन्थ प्रकाशन

वैदिक संस्कृतीचा विकास

लेखक- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

वैदिक संस्कृतीचें विकसित रूप म्हणजेच आजची भारतीय संस्कृति होय. भारतीय संस्कृतीच्या जन्मापासून आतांपर्यंत झालेल्या स्वरूपाचें वर्णन या पुस्तकांत प्राधान्यानें केलें आहे. वैदिक संस्कृतीच्या अभ्यासकास अत्यंत उपयोगी आणि मराठी भाषेंतील अत्यंत अप्रतिम अशा प्रकारचें हें पुस्तक आहे.

किंमत ६ रु.

प्रकाशक : व्यवस्थापक, प्राज्ञपाठशाळामंडळ
वाई (जि० सातारा)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. प्र. ल. सासवडकर

रघुनाथराव पेशव्याचे अखेरचे दिवस

' राघोभरारी 'ची कष्टाची अखेर

' अटकेवर मराठ्यांचा झेंडा नेणारा ' राघो भरारी म्हणून रघुनाथराव पेशवा मराठी इतिहास वाचकास सुपरिचित आहे. नानासाहेब पेशव्याचे कारकीर्दीचे सुरवातीपासून नारायणरावाचे वधापावेतो रघुनाथरावाचे जीवन सर्वश्रुत आहे. पण त्याचे उत्तर-आयुष्य मात्र किती कष्टाचे गेले याची कुणाला कल्पना नसेल. नारायणरावाच्या वधानंतर बारभाईंच्या कारस्थानामुळे पदच्युत होऊन दादा मुंबईस पळाला व त्याने इंग्रजांचा आसरा घेतला. सत्ता संपादण्यासाठी जरी त्याने इंग्रजांसारखा सबल मित्र केला तरी ती गोष्ट दादाला तितकीशी फायद्याची पडली नाही.

पुरंदरच्या तहानंतर बारभाई आपणास पकडतील या भीतीने रघुनाथराव मुंबईस पळाला. वरळीस त्याने स्वतंत्र वाडा बांधून दोन वर्षे वास्तव्य केले. मुंबईच्या या मुक्कामात त्याने तोफांचा कारखाना काढण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण यश आले नाही. आनंदीबाईला त्याचे मुंबईतील वास्तव्य आवडले नाही. तिने दादाला लिहिले. " उगीच इंग्रजांच्या घरी पोटास मात्र खाऊन कितीक दिवस पडून रहावे ? एवढे पराक्रमी भारती योद्ध्यासारखे म्हणविता आणि मुंबईस राहून काही उद्योग न करता काळ घालविता यास काय म्हणावे ? " पण दादाने तिच्या बोलण्याकडे फारसे लक्ष दिलेले दिसत नाही.

तळेगावच्या लढाईनंतर दादा पुन्हा महादजी शिंद्याच्या सेनेतून निसटला व सुरतेस परत इंग्रजांच्या आश्रयास गेला. तळेगाव मोहिमेपूर्वी दादाने इंग्रजांना थापा मारल्या असल्यामुळे यावेळी इंग्रज त्याच्यावर विशेषसा विश्वास ठेवत नव्हते. इंग्रजांना ' आपण दादाला उगीच आश्रय दिला ' असे वाटू लागले होते. इंग्रजांच्या आश्रयास गेल्यापासून प्रथम प्रथम दादाचा उत्साह दांडगा होता. पण पुढे पुढे त्याचा धीर खचत चालला मनोरथ वितळू लागले. पेशवा होण्याचे स्वप्न मृगजळ भासू लागले. पैशाची टंचाई वाढू लागली व ' यद् परवशं दुःखम् ' हा अनुभव त्याला पदोपदी येऊ लागला. मन खचू लागले व शरीरही रोगग्रस्त झाले. सुरतेमधील ही साडेतीन वर्षे व कोपरगाव (कचेश्वर) येथील सहा महिन्यातील दादाच्या अखेरच्या जीवनाचे चित्र नाना फडणीसाचे वकील व हस्तक यांचे पत्रावरून पुढील प्रमाणे दिसते.

सुरतेतील दिवस

सुरतेस दादाबरोबर आनंदीबाई, बाजीराव, व दत्तकपुत्र अमृतराव हे होते. सर्व कारभार बाजीराव व बाई पहात. अमृतराव त्यांना मदत करी. पुण्याहून बातम्या काढण्यासाठी दादाने पुण्यात आपला एक हेर ठेवलेला होता.[1] बाजीराव बर्वे, मानाजी फाकडे, सटवाजी भोसले व गुलजारखान हे दादाचे जीवास जीव देणारे साथीदार त्याच्या बरोबर होते.[2] त्यांच्याबद्दल नानांचा हस्तक ' चारी कुभांडी श्रीमंतांजवळ एकत्र जाहली आहेत ' असे लिहितो.[3] मुंबईप्रमाणे सुरतेसही दादाने तोफखाना काढण्याचा प्रयत्न केला. २८४ तोफांचे सामान तयार करविले होते. ३६ तोफा तयारही झाल्या. पण पुढे पैशाच्या अभावी काम अर्धवटच राहिले.[4] इंग्रजांच्या आसऱ्यास गेल्याबरोबर त्यांच्या स्वाधीन केलेले जडजवाहीर दादा मरेपर्यंत सोडवू शकला नाही. आश्रितांच्या व शिबंदीच्या खर्चाची तोंडमिळवणी करता करता नाकी नऊ येऊ लागले. गुलजारखानास बारभाईवर पाठविण्याची दादाची इच्छा होती पण तीही खर्चाच्या तंगीमुळे शक्य झाली नाही.[5]

---

१. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय रुमाल ५३ गठ्ठा २ पत्र ६३.

२. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय रुमाल ४९ गठ्ठा ४ पत्र ४५.

३. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय रुमाल ४९ गठ्ठा ४ पत्र १९.

४. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय रुमाल ५३ गठ्ठा २ पत्र ७९, १२७.

५. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय रुमाल ४९ गठ्ठा ४ पत्र ३७.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लढाईच्या मामल्यास रघुनाथराव मनातून कंटाळला होता. पुणे सोडल्याला बरेच दिवस झाल्यामुळे 'पेशवाई नाही तर नाही. निदान पुणे तरी पहायला मिळावे असे दादाला व आनंदीबाईला वाटत होते. वडगावच्या लढाईच्या वेळी पुण्याच्या जवळ जाऊन पुण्याचे दर्शन झाले नाही म्हणून दादाला हळहळ वाटली. "दौलत खराब जाली. याउपरी जसे होईल तसे कबूल करून समेट करावा, स्वस्थ जागा देतील तेथे राहावे. नच मर्जीस येई तरी सुरतेसच असावे असे वारंवार दादाच्या मनात येत होते.[६] मदतीसाठी त्याने अनेकांना पत्रे लिहिली पण सर्वांनी वाटाण्याच्या अक्षदा लावल्या. इंग्रजही आळंटळं करीत होते. दिल्लीचा जुना मुत्सद्दी गाजुद्दीनखान फिरता फिरता एकदा सुरतेस आला असता दादाला भेटला. त्याने दादाला आपले निशाण लावण्याचा व बाणा राखण्याचा सल्ला दिला. त्यावरून दादाने विजयादशमीला स्वतःचे एक कुमुंबी निशाण तयार केले.[७]

आनंदीबाई व अमृतराव सर्व योजना करून त्या पार पाडीत. बऱ्याच वेळा दादाचा आनंदीबाईशी खटका उडे. इंग्रजांनी दादास वसईचा किल्ला लिहून मागितला. दादा बोलल ' किल्ला आम्हास देणे नाही." त्यावरून 'इंग्रजांचे मर्जीस ठीक न पडल' तेव्हां आनंदीबाई व अमृतराव यांना दादाच्या शिक्यानिशी वसई लिहून दिली. 'हे वर्तमान दादास कळले. फार राग भरले. बाईशी व श्रीमंताशी कडवी भाषण फार झाले.' एकदा आनंदीबाई अशीच रुसली. कारण ती व अमृतराव यांचे मनात 'सुरत अठ्ठावीसांमध्ये आपली ठाणी झेंडे बसवावे तो इंग्रजांचे ठाणी बसतात, हे ठीक नाही.' रघुनाथरावाने इंग्रजांस सांगितले की "ठाणी आमचे बसवावी." इंग्रजांनी उत्तर केले की "तुम्हास पुण्यास नेऊन बसवू तेव्हा तुम्ही आपले झेंडे ठाणी बसवावी." श्रीमंत (दादा) बोलले की "याप्रमाणे करार नाही. येसे असता ठाणी तुमचीच बसविता हे काय ?" इंग्रजांनी या कुरकुरीमुळे दादाचा तनखाच बंद केला. पण प्रकरण लवकरच मिटले. पण "सौ. बाई मात्र रागे भरून बसली. आठचार दिवस श्रीमंताकडे गेली नाही.[८] आनंदीबाईच्या सांगण्यावरून दादो येवलेकर व आबा जोशी दादास वारंवार टोचून बोलत. तेव्हा संतापून दादा एके दिवशी आनंदीबाईला म्हणाला, "सटवे, तूही बारभाईंस मिलोन गोष्टी सांगतेस हे ठीक नाही."[९] दादाच्या सात आठ नाटकशाळा (रखेल्या) बरोबर असत. आनंदीबाई त्यामुळे पिसाळून जाई. दादाची कनिष्ठ पत्नी मथुराबाई देवी निघून गत झाली.

सुरतेस दादाजवळ फुकटये भोजनभाऊ आश्रितांचा गोतावळाही बराच जमला होता. नानांचा वकील नानांना लिहितो, "कारभार मुख्यत्वे अमृतराव करतात. शिवाय नारो तुकदेव वगैरे एकदोन आसामी थोरली आहे. वरकड भटब्राह्मण शागीर्द मिलोन दोनशे आसामी नित्य भोजनास आहेत. उपयोग एकापासून नाही. लावून देत असता जात नाहीत. याजमुळे अन्नवस्त्र चालते तितकेंच कबूल करून सेपन्नास रिकामेही आहेत माणसेही कंटाळली आहेत. सेपन्नास माणसे उठोन गेली. जाईल त्यास नको म्हणत नाहीत."[१०] या फुकट भोजनभाऊमुळे आनंदीबाई पण कावून जाई. व कित्येकदा संतापाने त्याना टाकून बोलत असे. एकदा काही लोक 'आमचे पैसे द्या आम्ही जातो' म्हणून हटून बसले. पाईची माणसे व स्वार यांचा मात्र धर राहिला नाही.' "मागील हिसाब करून द्यावा. पोट भरेल तिकडे जाऊ तेही मिळत नसल्यास शहरातील कर्ज घादल्याचा हवाला घेऊन घरास पोहचू. असी बेगमी करून द्यावी. जाऊ." 'म्हणत आज दोन दिवस सिल्लेदारांनी निकड लावीली होती. त्यास 'दिपवाळीपर्यंत दम धरावा ऐवजाची तरतूद करून थोडे बहुत देऊन मार्गस्थ करितो म्हणून वायदा करून थांबविले आहेत. हे दिवसेंदिवस ठीक दिसत नाही.' याजवरून

६. डे. कॉ. ऐ. मं. रु. ५३ ग. २ पत्र ७९, १०९.
७. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ ग. २ पत्र १००.
८. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५२ ग. १९ पत्र १.
९. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ ग. २ पत्र ९९.
१०. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ ग. २ पत्र ७९.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्रीमंत सौ. बाई बहुतच सर्वत्रावर इतराज होऊन सिव्यागाली केल्या. 'रिकामे खावयास जमा जाले उपयोग एकाप सून नाही. सारे हाकोन लावावे' म्हणोन बोलल्यावरून यादोबा येवलेकर व नारो तुकदेव याणी उत्तर केले की "तुम्हास इतबार (विश्वास) एकाचा नाही. व बोलाल ते शाश्वत नाही. आसे असता जवल राहणारावर रागे का भरता ? काये चुकले ? सर्वत्रांनी तुमचे सोबतीस घरदार सोडून तुमचे बरे व्हावे म्हणोन तुम्हाबरोबर येका वस्त्रांनी चार चार वेल जाले असता ते अन्यायी कसे काये ? जे आहेत ते यथामतीने केवल आसे न करते. साहेबाचेच शाश्वत नाही" त्यावर बाईनीं उत्तर केले की 'त नीट असते तर आसं का होते ?[11] ते मुलापासून तसे. कोण्हीच मातबर जवल राहीला नाही." अखेर दादाने हळुहळु माणसे कमी करण्यास सुरवात केली. 'श्रीमंत दादासाहेबांनी लोक व माणसे थोडीबहुत कार्यकारण ठेवून वरकडास निरोप दिल्हा. परंतु कोणी जात नाही. निमे रोजमरा घेऊन राहावयास कबूल जाले निघोन जाण्याची रुष्ट बोली आहे." एकदा रघुनाथरावाने स्वतःच निघून जाण्याचा विचार केला. तेव्हा लोक म्हणू लागले तुम्ही गेला तरी समागमे आम्हास घेऊन जावे,"[12] सिबंद पण डोईजड झाली. सिदी, आरब वगैरे भाडोत्री सैनिक दोनतीनशेपर्यंत रुकसत केले.[13] जवळच्या साथीदारासही अखेर सोडावे लागले. "बर्वे व भोसले यास श्रीमंत रा. दादासाहेब व इंग्रजाने काहाडून दिल्हे आणि सांगितले की तुमचे पोट भरेल तिकडे जावे. त्याजवरून ते सुरतेहून निघाले. हिंदुस्थानाकडे जाणार ऐसी जन वदंता आहे." बारभाईचे सरदार गणेशपंत बेहरे यांनी सुरत प्रांत उजाड केला. त्यामुळे 'दादा हे सुरतशहरास अरिष्टरूपच आहेत. पुणेकरांशी सलाह करण्यातच कल्याण आहे' असे चिंताग्रस्त सुरतकर सावकारास वाटू लागले.[14]

रघुनाथरावाची धर्मकृत्ये व आनंदीबाईची व्रतेवैकल्ये सुरतेसही चालूच होती तापी नदीवर आनंदीबाई कधी कधी स्नानास जाई, कोणी 'रामनाथबाबा गोसावी' महापुरुष होता त्याच्या दर्शनास ती स्वतः जाई व इतर लोक गेले नाही की *शागीर्दावर व इतरावर राग काढी.*[15] दादाने सुरतेस गणेशोत्सवही सुरु केला. 'गोसावी एक दुसरा समान्य मिळाला आहे. कलावंतणीचा नाच करविणार. बडोद्याहून फत्तेसिंगाकडून नामी ताफे आणविले आहेत.'[16] पण उत्सवाचे दिवसातच कानाला फारच तिडीक लागल्यामुळे दादाला कार्यक्रम ऐकता आले नाहीत.

इंग्रजांशी धुसफूस

इंग्रजांचा आश्रय होता तरी दादाचे इंग्रजांशी सूत होते असे मुळीच नाही. दादाचा खर्चिक स्वभाव, वाईट सवयी, व आश्रिताचे लटांबर यामुळ इंग्रजांनाही तो नसते लोढणे वाटत होता. उलट दादाच्या तोंडूनही 'इंग्रज केवळ गळेकापू. आपला मतलब साधनारे' असे उद्गार वारंवार निघत. एक दोनदा दादाचे व इंग्रजांचे चांगलेच बिनसले. एकदा दादाकडील व इंग्रजाकडील जमातदारांचा कज्जा झाला. तर एकदा दादाच्या व इंग्रजांच्या लोकांची कटकट होऊन इंग्रजांचा एक माणूस मारला गेला. इंग्रजांनी गुन्हेगाराचा मागणी केली व दादाचा तनखा बंद केला. 'येक महिना खर्चास पावले नाही. वोढ पडली. त्या समयी रुप्याचा देव्हारा दादासाहेबी साहुकाराकडे ठेवून १॥ हजार रुपये आणले व डांगरीस निघोन गेले. बाइ व अमृतरावही गेले."[17] अखेर जनरल गॉडर्ड जेव्हा मुंबईहून आला, तेव्हा स्वतः रघुनाथरावास भेटून त्याची त्याने समजूत काढली. दादावर एक किटाळही आले होते. एकदा दादान एका नागर ब्राह्मणाची मुलगी जबरदस्तीने धरून आणली. तिच्या आईबापांनी प्राण दिला. गाडर सुरतवाल्यास रागे

---

११. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ गठ्ठा २ पत्र १४७.
१२. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ गठ्ठा २ पत्र ७९.
१३. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ गठ्ठा २ पत्र १००.
१४. सरदेसाई – मराठी रियासत उत्तर विभाग– १ पृष्ठ २९८.
१५. डे. कॉ. ऐ. सं. रुमाल ५३ गठ्ठा २ पत्र ६६.
१६. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ गठ्ठा २ पत्र७१.
१७. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ ग. ११ पत्र ५.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

भरीन बोलला. "तुमच्या स्वाधीन राघू केला असता अशा बदफैलीच्या गोष्टी व्हाव्या !" सुरतवाला म्हणाला, ' ब्राह्मण होऊन याच्या बुद्धिस भ्रंश झाला." असे म्हणून त्याने श्रमंतास वाड्यात बंदोबस्ती ठेविले. बाहेर निघो देत नाहीत.[१८] अखेरचा प्रयत्न म्हणून दादाने हणमतराव व मणीयार पारशी हे दोन गृहस्थ इंग्लडला वकील म्हणुन पाठविले. त्यांचे तिथे फार हाल झाले. पण एडमंड बर्कने त्यांचा चांगला परामर्श घेतला म्हणून निभावले. शेवटी दादाने स्वतः इंग्लंडच्या राजास एक पत्रही लिहिले. पण काही उपयोग झाला नाही. दादाची सर्वत्र नाचक्की झाली[१९] प्रकृतीने व परिस्थितीने तो अगदीच हताश झाला होता. बायका मुलेही त्याची परवा करीनात. नानांचा हस्तक तर नानांना ' दादांच्या बुद्धीस काही विपर्यास पडला आहे म्हणून कित्येक बोलतात ' असे लिहितो.[२०]

शारीरिक, मानसिक व्याधि आणि अंत

शरीर कृश व व्याधिग्रस्त, बुद्धीस थोडाबहुत भ्रंश, व मन अत्यंत निराश व उदास होऊन दादा अगदी मृत्युपंथास लागला. नानांचा बातमीदार लिहितो. ' सुरतेत दादासाहेब शरीरेकरून फार श्रमात आहेत. तिघा शिष्यांनी धरून उभे करावे तेव्हा सूर्य अर्घ्य देऊन एक घटका उभे राहतात. तदोत्तर बसणे अथवा शयन. बारा घटका रात्री तीन पैसेभार राळ्याचे तांदूळ व पैसाभार मूग ऐसे एकत्र खिचडी करून भक्षितात. आठ दहा दिवसानी सौ. आनंदीबाईचे दर्शन. एक अर्धा घटका जवळ येऊन बसली तर त्यासी भाषण करीत नाहीत. बाजीरावास बाईकडे फारसे जाऊ देत नाहीत. वारंवार आपले मंडळींचे पुण्याचे स्मरण करीतात." कानाचे दुखण्याने तर दादा अगदी बेजार झाला. पथ्य करण्याची शक्ति अंगात राहिली नाही. ' उजवे डोळ्यापासून कानाचे वरील पाळीकडून दाडेपावेतो दुःख. त्यात फाड करून क्षतच तीन बोटे लांब व दोन बोटे रुंद याप्रमाणे आहे.' स्नानसंध्या झाल्यानंतर भोजनसमर्या जे इच्छा होईल ते खावे न झाल्यास कोण्हाचीही बाकी राहू नये. याप्रमाणे मर्जी विलक्षण आहे. उपरांतीक फार दाटी न होता येकटेच निजावे. बहुत बोलणे आदि करून गडबड सोसत नाही. कदापि बोलणे पुसणे झाल्यास रा. अमृतराव याणीं जाऊन पुसावे अशी मर्जी आहे.[२१] इंग्रज डॉक्टर उपाय करीत होते. ' इंग्रजी उपायाने कान किंचित बरा झाला. किंचित् क्षताचा डाग राहीला आहे. व थोडी बोल आहे. याजकरिता पटी बांधत असतात.'[२२] एकदा इंग्रज डॉक्टराने ऑपरेशन केले. दुसऱ्यांदा करणे आले तेव्हा बाईने मना केले. ती म्हणाली, ' येक फाड जाला. त्याज-कडून निचर होत नाही. दुसरे ठायी फाड कराल त्याने निचर होईल हा भरंवसा काये ? याजकरिता सेकून औषधे लावून जिरवावे हेच चांगले म्हणोन जिर-वण्याचे उपाये चालता केला.' या जखमेसाठी ' बार्क ' नावाचा औषधी पदार्थ दादा मुंबईहून वारंवार माग-वीत असे.[२३]

या सर्व व्याधींनी त्रस्त होऊन व सालबाईच्या तहानंतर इंग्रजांनीही ' जा ' म्हणून सांगितल्यामुळे दादा १७८३ च्या जुलैत हरिपंत फडक्यांच्या स्वाधीन झाला. पुणे दरबारने दरमहा २५,००० रुपयांची नेमणूक करून दिली. कोपरगावास आल्यावर दादाने प्रायश्चित्तही घेतले. गोपिकाबाईने त्याची भेट घेण्याचे नाकारले. नोव्हेंबरात दादाची प्रकृती अधिकच बिघडली. ज्वर येऊ लागला. थोड्या दिवसांनी ज्वर उतरला म्हणून त्याने स्नाने करण्यास सुरवात केली. स्नान करून चार घटका ध्यान करून दादा बसत असे. त्यामुळे ज्वर पुन्हा उलटला. व ११ डिसेंबरला रात्री सहाव्या घटकेस दादाने इहलोकीची यात्रा संपविली. यावेळी दादाचे वय फक्त ४९ वर्षांचे होते. आनंदीबाई त्यानंतर ११ वर्षांनी वारली.

[पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे ५३ वे वाढदिवशी दि. २२ जून १९६३ ला लेखकाने वाचलेल्या निबंधावरून]

---

१८. सरदेसाई– मराठी रियासत उत्तर विभाग १ पृ. २९९
१९. सरदेसाई– मराठी रियासत उत्तर विभाग १ पृष्ठ ३००.
२०. सरदेसाई– मराठी रियासत उत्तर विभाग १ पृ. २९९.
२१. डे. कॉ. ऐ. सं. रु. ५३ गठ्ठा २ पत्र ७१.
२२. डे. कॉ. ऐ. सं. ,, ५३ गठ्ठा २ पत्र ९९.
२३. डे. कॉ. ऐ. सं. ,, ५३ गठ्ठा २ पत्र १०५.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. आबा चांदोरकर

शिखंडी आणि इळा ! एक नैसर्गिक चमत्कार !!

शिखंडीची कथा

ही कथा, महाभारतांत आली आहे. काशीच्या राजाला तीन मुली होत्या, पैकीं अंबा ही वडील, अंबिका ही मधली, अंबालिका ही धाकटी होती. भीष्मपितामहानीं, विचित्रवीर्य या आपल्या सावत्रभावासाठीं या तिन्हीं मुली बायका म्हणून नेमस्त करून हस्तिनापुरास आणल्या. पण अंबेनें त्यांना सांगितलें कीं, "आपण पूर्वीच शाल्वराजास मनानें वरलें आहे." हें ऐकून भीष्मानीं तिची सन्मानानें शाल्वाकडे रवानगी केली, पण त्यानें ती दुसऱ्याची नियोजित केलेली वधु म्हणून तिचा त्याग केला ! ती भीष्माकडे परत आली व तिनें स्वतः भीष्मानीं भार्या म्हणून आपला स्वीकार करावा म्हणून त्यांना गळ घातली ! पण मत्स्यगंधेस आपलो सावत्र आई बनविण्यासाठीं, तिचे बापासमोर "आपण आजन्म ब्रह्मचारी राहूं व तुझ्या मुलीचा पुत्रच राजा होईल" अशी निःस्वार्थ प्रतिज्ञा पूर्वीच केली होती, या कारणामुळें त्यानीं अंबेच्या विनंतीस नकार दिला ! यावरूनच "भीष्मप्रतिज्ञा" ही म्हण पडली !

याप्रमाणें अंबा दोहोंकडून नाडल्यानें तिला साहजिकच भीष्माबद्दल राग आला व त्यांचे नाशासाठीं वनांत जाऊन तिनें शंकरदर्शनासाठीं घोर तप केलें. "आशुतोष" प्रसन्न झाले; वर देतांना हा भोळा देव शुभाशुभाची पर्वाच करीत नाहीं ! त्यानीं तिला सांगितलें कीं, "तुझी इच्छा पूर्ण होईल पण या जन्मीं नाहीं, पुढल्या जन्मीं !" त्यानंतर तिनें देहत्याग केला.

द्रोणाचार्यांनें अपमान केल्यामुळे द्रुपदराजानें, द्रोणाचा वध करणारा पुत्र व्हावा म्हणून अरण्यात जाऊन शिवपत्नी उमा (म्हणजेच अंबा) हिला प्रसन्न करण्यास्तव तप केलें. तिनें प्रसन्न होऊन तशी संतति होण्याचा वर दिला. पण पुढें संतान जे निपजलें तें मुलीचें ! द्रुपद व त्याची राणी यानीं ही गोष्ट गुप्त ठेवली व पुत्र झाला म्हणून जाहीर केलें ! तिचे सर्व संस्कार पुत्राप्रमाणेंच केले. मुलाचें शिक्षण दिलें, युद्धशास्त्रांत प्रवीण केलें. योग्य कालीं तिचें लग्न दशार्णदेशाचा राजा हिरण्यवर्मा याचे कन्येशीं केलें; पण गर्भाधान (पुंसवन) समारंभांत हें गुप्त भांडवल फुटलें ! नवरीनें बापास ही सत्यकथा सांगितली, साहजिकच तो रागावला. त्यानें द्रुपदावर स्वारी करण्याची तयारी चालविली. ती बातमी ऐकून द्रुपदही तयारीस लागला. शिखंडी वैतागली; आपल्यामुळें बाप व सासरा यांत वैर उत्पन्न झाल्यामुळें तिने गुप्तपणें वनवास केला. तेथें स्थूलकर्ण नांवाचा एक यक्ष रहात होता; त्यानें युक्तीनें शिखंडीकडून सर्व हकीकत समजावून घेतली. त्याला तिची दया आली व त्यानें तिला आपलें पुरुषत्व अर्पण केलें ! **शिखंडी मुलगी, मुलगा झाली** ! गोदूचा गोविंदा बनला !!

पुंसवन समारंभ यथास्थित सर्वप्रकारें पार पडला ! हें आनंदाचें वर्तमान वधूनें बापास कळविलें; त्यानें ज्याह्याची क्षमा मागितली. पुढें भारतीय युद्धांत शिखंडीनें आपल्या मेव्हण्या-(अर्जुना)चे बाजूनें भाग घेऊन भीष्माशीं युद्ध केलें; पण शिखंडी ही स्त्रीच मानून त्यानीं त्याचेवर शस्त्रप्रहार केला नाहीं. त्यानें अर्जुनाचे मदतीनें भीष्माना शरपंजरी पाडलें ! पुढें अश्वत्थाम्यानें शिखंडीचा वध केला. (म. भा. उद्योग प. अ– १८८–१९२).

शिखंड या संस्कृत शब्दाचा अर्थ मयूरपक्षाचा पिसारा, त्यांतील एक पींस. याचें विशेषण **शिखंडिन्** (शिखंडोऽस्त्यस्य इनि), अर्थ–गुच्छ, तुरा, मस्तकावरील केसांची गांठ, जटाजूट, नपुंसक, अंबाडा (आजचे पुण्यामधील बोलाईभक्तांचे– नपुंसकांचे– डोईवर केसांचा अंबाडा असतो. हे नपुंसक पूर्णपणें पुरुष नसतात व धडपणे स्त्रीहि नसतात. यांच्यांत हे दोन्हीं *लिंगप्रकार अर्धवट असतात म्हणून त्यांना* तृतीयप्रकृति म्हणतात !).

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शिखंडीचे आणीक अर्थ आहेत, ते लक्षांत ठेवले म्हणजे या शिखंडी नांवाचा मी पुढें जो उलगडा करणार आहे तो समजण्यास सोपें जाईल. शिखंडी म्हणजे मोर कारण त्याला शिखा (शेंडी) असते. मोगरी शेंडी, कोंबडा, मोराचें शेंपूट, वार्षिकी ऊर्फ मोगरी वनस्पति, मोरशेंडा ऊर्फ मोरशिखी वनस्पति म्हणजच "शिखंडी" नावाचें एक क्षुप, याचे शेंडे मोराच्या डोक्यावरील तुऱ्याप्रमाणे असतात. कोंबड्यालाहि शेंडा (तुरा) असतें.

वर ज्या वनस्पति व प्राणी सांगितले त्यांची वैशिष्ट्यें

वार्षिकी ही **पुत्रदा** आहे. ही प्रत्येक पावसाळ्यांत पुन्हां फुलते. ही थंड, कर्ण-नेत्र-मुख-रोग, हृदयविकार, घाव, विषार इ० रोगांची नाशक. फार कामोत्तजक. हिचें तेल व अत्तरहि असेंच गुणकारी. हिचे नस्यानें (रस नाकात पिळल्याने) गर्भ **पुत्राचाच** बनतो म्हणून हीस ' राजपुत्रिका '' म्हणतात. **मोरशेंडानें** बालग्रह बरा होतो. प्रयोगांत याचीं पत्रांगें वापरतात, हिनेंहि **कन्यागर्भाचें पुत्रग्रहांत रूपांतर होतें !**

मोरपक्षी नपुंसक आहे अशी (मिथ्या) लोकोक्ति आहे ! तिच्यामतें त्याची वंशवृद्धि पुढीलप्रमाणें होते. मोर व लांडोरी यांचा साक्षात् समागम होत नाही. पावसाळयाचे प्रारंभीं दोघेहि कामासक्त होऊन नाचतात. त्यावेळीं मोराचे डोळयांत वीर्यपरिप्लुत अश्रु टिबकतात, ते लांडोरी आपल्या चोंचीनें बरचेवर पकडून पिते, त्यानें तीस गर्भ राहून मग ती अंडी घालते ! या बनावामुळें या नरमादींना, शुक्रभुक्, रेतोभोजक नांवे पडलीं. मोराचे मांस, मधुर, बुद्धिवर्धक, पाऱ्याप्रमाणे सद्यफलदायी, कान डोळे-वर्ण-स्वर शुद्ध करणारें, शुक्र-मांसवर्धक आहे. म्हणूनच मोर अत्यंत **वीर्यवान** आहे. मात्र तें मार्गशीर्ष ते वैशाख याच सहामाहींत खावें ! त्यापुढील सहामाहींत खाऊं नये कारण त्या काळांत मोर हे सापांना खातात त्यामुळें त्याचें मांस विषारी बनतें (शार्ंगधर) !

कोंबड्यास शेंडी असल्यानें त्यालाहि शिखंडी म्हटलें आहे. तो फार स्त्रीलंपट. रोज चार पांच कोंबडींना भोगतो, अत्यंत वीर्यसंपन्न, त्यामुळें मादी रोज एक अंडे घालते ! त्या कारणानें त्याचें मांस पौष्टिक, **वीर्यवर्धक**, मधुर, क्षयरोगनाशक आहे. त्याचें अंडही असेंच गुणकारी.

शिखंडी कथेचा उलगडा

वरील मजकुरावरून हा उलगडा पुढील माझे तर्कावरून समाधानकारकपणें सोडवितां येतो व स्थूलकर्ण यक्षानें आपलें पौरुषत्व शिखंडी कन्येस देऊन तिला शिखंडपुत्र केला याचीहि सुसंगत संगति लागते. त्यानें तिचे नाकांत वार्षिकीमोरशेंडा या वनस्पतींचें रस पिळले तद्वत् इतरहि (वड, पिंपळ, उंबर इ.) पुत्रदा वनस्पतींचे रस पिळले. मग तिला मोर-कोंबडा यांचे मांसांचा खुराक सुरू केला. नंतर सांडबैलाचें मूत्र (आर्यवैद्यकात कांहीं प्राण्यांचे मूत्रांचा उपयोग संततिप्राप्तीसाठीं करण्यास सांगितलें आहे !) इ. औषधांच्या मदतीनें त्या **जन्मजात मुलीला कायमचे युवक बनविलें !** यक्षजातींतील तज्ज्ञ वैद्यराजांना ही प्रक्रिया साध्य होती. ही माझी स्वैर कल्पना नाहीं. पुढील शास्त्रीय माहितीवरून ती **शास्त्रशुद्ध सत्यकथा** आहे हें समजेल !

नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांचा वीर्यप्रभाव

या ब्रह्मचाऱ्यांचा वीर्योत्सर्ग, ते आपण होऊन करीत नसल्यानें, तें वीर्य त्यांच्या देहांतील सर्व रंध्रांतून बाहेर पडून प्रकाशतें एवढेच नव्हे तर त्यांच्या शरीरांचें शस्त्रापासून रक्षण करतें. देवांच्या चितारलेल्या चित्रांत त्यांचे अंगाभोवतीं चित्रकार एक तेजोवलय (आरोरा) मुद्दाम चितारतात, त्याचे कारण हेंच ! हें रसरसलेलें शुक्र त्यांचे हरएक अवयवांतून स्रवतें. तें जसें अश्रुंतून तसें त्यांच्या घामातूनहि प्रकट होतें. रामायणांत ही दोन्हीं उदाहरणें आढळतात. ब्रह्मदेवाच्या अश्रूंपासून ऋक्षराज जांबवान जन्मले व लंकादहनानंतर हनुमंताचे श्रमलेल्या अंगांतून निघालेला घाम त्यांनीं समुद्रांत गाळला असता तो ज्या मकरीनें गिळला तिला त्या घामापासून मकराक्ष पुत्र झाला !

इळराजा

गोदूचा गोविंदा करण्याचे शिखंडीचें एक उदा० आपण मागें पाहिलेंच, आतां आणीक दुसरें देतों. आजचें मनूचें नांव वैवस्वत (विवस्वत् = सूर्य, त्याचा पुत्र), त्याची पत्नी श्रद्धा. दोघे बरेच दिवस संततीहीन, म्हणून त्यांनीं कुलोपाध्याय वसिष्ठाकडून **पुत्रकामेष्टियज्ञ** करविला. या इष्टीनें **पुत्रच** उत्पन्न होतो (रामायणांतील दशरथानें केलेल्या याच इष्टीनें त्याला चार पुत्र झाले). मनूचा आग्रह **पुत्राचा** होता तर स्त्रीस्वभावानुसार श्रद्धेचा, **कन्येचा** होता ! तिने त्या-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

साठीं इष्टीच्या होत्यास गुप्तपणें तसें सांगितलें. त्यानें **कन्यागर्भ** उत्पन्न करणारा हवि अग्नीस अर्पिला, त्यामुळें श्रद्धेस पुढें **मुलगीच** झाली! तिनें तिचें नांव **इळा** ठेवलें. पण मनूस तें आवडलें नाहीं, त्यानें वसिष्ठाना गळ घालून त्या **मुलीचा पुत्र बनवा** म्हणून विनविलें आणि ती विनंति मान्य करून त्यानीं त्या **जन्मजात कन्येचें** रूपांतर **पुत्रांत** केलें(मागें सांगितलेल्या उपायांनीं) ! त्याचें नांव सुद्युम्न ठेवलें (मत्स्य व पद्मपुराण). रामायणांत वसिष्ठाऐवजी मरुत्ताचें नांव आहे (उत्तरकांड सर्ग ८७) तर स्कंदपुराण अरुणाचलाचें नांव देतें. ब्रह्मपुराण (अ. १०८) म्हणतें इलाकन्या "एका **यक्षाचे** गुहेंत राहिली असतां त्यानें तिला **पुरुष** केलें!" या कथेवरून मीं मागें म्हटल्याप्रमाणें तज्ज्ञ **यक्षवैद्यराजांना** ही (मुलीचा मुलगा करण्याची) विद्या चांगली येत होती व कोणाहि मातपित्यांच्या विनंतीवरून ते **जन्मजात मुलींचा मुलगा** (गोंदूचा **गोविंदा**) तत्परतेनें करीत ! हा इळराजा, श्रीरामाच्या सूर्यवंशाचा मूळपुरुष होय. याचेंच नांवावरून, प्राचीन भारतसाम्राज्य ज्या विस्तीर्ण प्रदेशावर पसरले होते, त्यास "इलावर्ष" हें नांव पडले! वसिष्ठानाहि ही प्रक्रिया माहीत होती; म्हणजे यक्षजातीप्रमाणे **आर्यजाती**हि या वैद्यकप्रक्रियेंत प्रवीण होती !

आयर्वैद्यक हा चमत्कार करते: तो आर्यवैद्यकास मान्य असून, आर्यधन्वंतरींनीं, **वैदिककालापासून प्रत्यक्षांत घडवूनहि** आणलेला आहे ! त्यांचें मतें हा चमत्कार मानवी व दैवी उपायांनीं करतां येतो; त्यांनीं या उपायांचा क्रमहि सांगितला आहे, तोच वर दिली आहे, म्हणूनच मीं वर म्हटलें आहे कीं, **माझी** ही स्वैर कल्पना नसून ती शास्त्रशुद्ध **सत्यकथा** आहे.

नैसर्गिक चमत्कार

ही सत्यकथा **निसर्गाचे नियमांना धरूनच** निर्माण करतां येते. ती अधिक स्पष्ट शब्दांत मांडावयाची म्हटल्यास, ती "स्त्रीगर्भ, पुरुषगर्भांत रूपांतरित करतां येईल काय ?" या शब्दांत मांडतां येईल! याचें उत्तर स्त्रियांच्या शरीरांतील एका नैसर्गिक चमत्कारांत लपले आहे ! तो चमत्कार म्हणजे **स्त्रीजननेंद्रियांत पुरुषजननेंद्रियाचें (एक उपस्थ व दोन वृषण) सूक्ष्म अस्तित्व !!** सामान्यजनांना हें एकून आश्चर्याचा धक्का बसेल पण शारीरशास्त्र्यांना बसणार नाहीं, कारण ती **निसर्गनिर्मित सत्यघटना** आहे, मानवनिर्मित **नाहीं ! फक्त** मानवांनीं तिचा फायदा घेऊन आपलें (पुत्रप्राप्तीचें) ईप्सित साध्य करून घ्यावयाचें आहे ! तें कसें साधावयाचें हें खाली दर्शवितों !

स्त्रीलिंगांत पुल्लिंग

स्त्रियांचे योनींत, योनीद्वाराचेवर, अगदी वरच्या बाजूस, हें पुल्लिंग असतें, त्यांत एक शिश्न व दोन अंडी **सूक्ष्म** रूपांत असतात पण तें चिन्ह स्पष्ट दृष्टिगोचर असते ! हें सूक्ष्म पुल्लिंग स्थूल करणें म्हणजेच **स्त्रीचा पुरुष करणे !** ही घटना **आर्यवैद्यकानेंच प्रथम** अस्तित्वांत आणली. पत्नीचे गर्भाशयांत गर्भ राहिला व तो पुत्रगर्भच असला तर ठीकच झाले पण तो जर कन्यागर्भ असला तर मग काय करावयाचें ?

पुत्रगर्भ बनविण्याचे उपाय

समागमानंतर आपल्यास गर्भधारणा झाल्याचें स्त्रीस तत्काळ समजतें ! त्याची खूण अशी कीं, तिची संभोगतृप्ति होते, ओटीपोट जड होऊन स्फुरण पावतें, वीर्य-रज बाहेर पडत नाहींत, छाती धडधडते, अंग रोमांचित होतें, इत्यादि ! त्यावेळीं पुत्रोत्पत्तिदायक वनस्पतीधान्यें (जव, मोहऱ्या, उडीद) यांचें सेवन करणें व मुख्यतः पुंसवन (गर्भाधान) विधि करणें हे प्रमुख उपाय करावेत. गर्भधारणेनंतर अतिमैथुन, मलमूत्रादि वेग थांबविणें, उकीडवें बसणें वगैरे कुपथ्यें गर्भारशीनें करूं नयेत.

गर्भसंक्रमण

पहिले महिन्यांतील गर्भ म्हणजे केवळ वीर्य–रजांचा एक गोलक असतो. दुसऱ्या महिन्यांतच गर्भास पुत्राचा किंवा कन्येचा आकार येतो, पुत्रगर्भ घट्ट वर्तुळाकार तर कन्यागर्भ पिशवीवजा लंबगोल असतो. या महिन्यांत डोहाळे सुरू होतात तिसऱ्या महिन्यांत गर्भाचे हात पाय डोकें स्पष्ट होऊन, सर्व सूक्ष्मांगें उपजतात व त्याचा लिंगभेद कायमचा स्पष्ट अनुभवास येतो ! चौथ्यांत अवयवांची वाढ होते. पांचव्यांत गर्भ चैतन्ययुक्त होतो म्हणजे त्यांत प्राण उत्पन्न होतो. सहाव्यांत व सातव्यांत तो सर्वावयवपूर्ण होतो व त्या अवयवांचे गुणधर्म यांनीं तो पुष्ट होतो. आठव्यांत आईलेकरांच्या अंगांत ओज (तेज) आळीपाळीनें पसरतें. या महिन्यांत गर्भपाताचा किंवा लीनगर्भा (सल) ची भीती असते. म्हणून गर्भिणीस फार जपलें पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लीनगर्भ पुन्हा वाढीस लागण्यास पुढील उपाय करावा. उडीद व मुळे (भाजी) यांचे कढां (सारां)त पुष्कळ तूप घालून गर्भाशयीस पाजावें, किंवा कोवळें बेलफळ–तीळ-उडीद-भाजलेलें सातुपीठ एकत्र करून दुधांतून अथवा द्राक्षासवांतून देणें. कमरेस नेहमीं तेल जिरवावें. **तिसऱ्या महिन्यांत** गर्भाचा लिंगभेद स्पष्ट होत असल्यानें तो पुल्लिंगी असेल तर उत्तमच पण स्त्रीलिंगी असल्यास, त्या स्त्रीलिंगी गर्भाचे योनींतील अत्यंत सूक्ष्म पुल्लिंगी उपस्थ व वृषणें स्थूल करण्यासाठीं पुंसवन व इतर शास्त्रीय विधी करावेत!

लिंगरूपांतर

वर सांगितल्याप्रमाणें हें रूपांतर गर्भावर, पोटांत असतांना जसें करतां येतें तसें मूल जन्मलेवर त्याचे बाळपणीं फार काय त्याचे तरुणपणींहि औषधांनी (शिखंडी, इळकथा पहा) किंवा शस्त्रक्रियेनेंहि करतां येते (गोदूची गोविंदा मूळ सत्यकथा आठविणें)!

पाश्चात्य वैद्यक व वैद्य यांची मान्यता

वरील आर्यवैद्यक व आर्यवैद्यांच्या अलौकिक पण नैसर्गिक चमत्कारित प्रक्रीयेस आजचे पाश्चात्य वैद्यक व त्याचें वैद्य हे मान्यता देतात काय, याचें महत्त्वाचें त्रोटक वर्णन आतां करतो. एका वाक्यांत सांगावयाचें म्हणजे आमच्या आर्यपूर्वजांचा दहा हजार वर्षांपूर्वीचा हा (कन्यागर्भाचें मातेच्या गर्भाशयांतच पुत्रगर्भांत रूपांतर करणें, अशा पुत्रालाच मातेनें प्रसवणें, फार काय जन्मजात कन्येस बालपणीं किंवा कुमारी असतांना अथवा लग्नानंतर तारुण्यांतहि, धार्मिकसंस्कार-मंत्रतंत्र-औषधी प्रयोग व शेवटीं शल्यतंत्र इत्यादि दैवी-मानुषी साधनांनीं कायमचा पुरुष करणें) शोध व सिद्धांत त्यांना **पूर्ण मान्य** आहे! मात्र हे धन्वंतरी हा प्रयोग गर्भाशयांत करण्यास अजून धजत नाहींत तसेंच कुमारी अवस्थेंतहि करण्यास घाबरतात! फक्त तरुण स्त्रीवर हा प्रयोग करण्यापर्यंतच त्यांची धांव गेली आहे. तद्वतच त्यांचा भरंवसा धार्मिकसंस्कार-मंत्रतत्र–औषधादिकांवर नसून केवल शल्यतंत्रा (ऑपरेशन) वरच प्रामुख्यानें आहे! याचा अर्थ ते आर्यधन्वंतऱ्यांच्या **फार मागें** आहेत.

पाश्चात्यमतें स्त्रीशरीररचना

स्त्रीजननेंद्रियांत एक छोटें पुल्लिंग असतें; त्याची सर्व रचना पुरुषजननेंद्रियासारखीच असते. या इंद्रियाचें नांव "क्लिटोरीस". हें स्त्रीशरीराचे मध्य रेषेवर असून, योनीचे प्रारंभी, थोडसें अंतर्गत असतें. योनीचे ओष्ठ जेथें वरचे बाजूस एकत्र येतात तेथून हें लहानसर व लांबट इंद्रिय खालीं लोंबत असतें. याचे लोंबलेल्या टोंकास उपस्थाचे बोंडीप्रमाणें एक गोल आकाराची बोंडी असते, तिचें नांव "ग्लॅन्स". या जननेंद्रियाचा रचनाच्छेद करून पाहिला असतां असें दिसून येतें कीं, हें इंद्रिय दोहों बाजूंस असलेल्या, प्रसरणक्षम–वीर्यवाहक स्नायूंच्या लांबट पट्टिकांशीं संलग्न असते. हे प्रसरणक्षम स्नायू, श्लेष्मल त्वचेच्या खालीं व मागें गेलेले असून तेथें त्यांचें रूपांतर दोन गोलकांत म्हणजे दोन वृषणांत होते. त्यांना "बल्ब्स" म्हणतात, अगर "बल्बी व्हेस्टिब्युली" असेंहि म्हणतात. हे, योनीछिद्राचे दोन्हीं बाजूंस असतात. रचनादृष्टीनें हे दोन गोलक, पुरुषाच्या मूत्रमार्गांतील (व वीर्यमार्गांतील) गोलकांशीं समानधर्मी स्वरूपाचे असतात! यांचीं पुढील टोकें एकत्र येऊन त्यांचीच "क्लिटोरीस ग्लॅन्स" तयार होते! याच पट्टिकांना "पार्स इंटरमेडिया" असें म्हणतात. रचनादृष्टीनें त्यांचें साम्य पुल्लिंगांतील दोन वृषणांडांशीं असतें! हा सारांश माझे मित्र पुणें महानगरपालिकेचे कार्यकर्ते व श्रेष्ठ धन्वंतरि डॉ. वा. रा. ऊर्फ आप्पासाहेब ढमढेरे यानीं महत्त्वाचा भाग न गाळतां सुबोध मराठींत करून दिला त्याबद्दल मी त्यांचा ऋणि आहे.

याप्रमाणें आर्यवैद्यकांतील स्त्रीजननेंद्रियांतील, पुरुषजननेंद्रियाचें अस्तित्व व त्या इंद्रियाची रचना, जी आर्यधन्वंतरींनीं वर्णिली आहे, ती दोन्हीं पाश्चात्य वैद्यक व वैद्य यांना **संपूर्ण मान्य** आहे. मात्र या सिद्धांताचा व्यवहारांत उपयोग करण्याची प्रत्यक्ष क्रिया किंवा कला व तिच्या साधनानें निपुत्रकांना पुत्रवन्त करून उपकार करण्याचें श्रेय आर्यधन्वंतऱ्यांनीं **दहा हजार वर्षांपासूनच** पदरीं बांधलें आहे! अनार्य पाश्चात्यवैद्य आतां त्या श्रेयग्रहणाकडे वळत आहेत एवढाच या दोहोंत फरक आहे!

सारांश

हा नैसर्गिक–चमत्कार औषधीप्रयोग (व धार्मिक संस्कार) करून होतो हे आपण आतापर्यंत पाहिलें तसेंच तो शल्यतंत्रसाध्यहि आहे. स्त्री–योनींतील वर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सांगितलेलें ते समग्र (१ उपस्थ व २ वृषणें) पुल्लिंग वरील दोन्ही उपायांनीं, सूक्ष्माचे दीर्घ करतां आलें तर कुमारीचा कुमार, स्त्रीचा पुरुष, पत्नीचा पति करतां येईल ! जर जन्मजात स्त्रीस या पद्धतीने पुरुष बनविता येतो तर मग मातेच्या पोटांतील स्त्रीगर्भाचा पुरुषगर्भ बदलणे काय मोठी गोष्ट आहे ? स्त्रीगर्भाचे पुल्लिंग दीर्घ वाढून, स्थूल होऊन, गर्भाचे योनींतून (त्याचे नियमित लांबीइतके) बाहेर येईल व योनीछिद्र आणि तिचे सर्व स्वरूप पार बदलून, पुल्लिंगच कायमचे राहील, यास शिखंडी व इळा यांनीं आपली साक्ष वर भरलीच आहे ! या दोन व्यक्ती म्हणजे गेंदूचीं गोविंदा झाल्याचीं दोन साक्षात् उदाहरणे होत ! असलीं उदाहरणें आपण अनेक ऐकलीं आहेत पण याचे उलट म्हणजे पुरुषाची कांहीं काळाने स्त्री बनणें अशीं उदाहरणें फार क्वचित् आढळतात पण ती ही घडलीं आहेत ! पाश्चात्यलोकांत अशी दोन तीन उदाहरणें घडल्याचें मी वाचलें आहे. आपल्याकडे असें एक उदाहरण परवां (एप्रिल १९६३) घडल्याचें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे ! एक मद्रासप्रांतीय लष्करी जवान, नेफा रणांगणाहून रजा घेऊन परत घरीं आलेवर, थोड्या दिवसांनी या पुरुष जवानाचें हळुंहळुं स्त्रीत रूपांतर होऊं लागलें आहे ! विश्वकर्म्याची माया अतर्क्य आहे !

एतावता आर्यप्रक्रीयेनें —

" सा तत्पूंसवनं राज्ञो प्राश्य वै पत्युरादधे ।
गर्भं कालं उपावृत्ते कुमारं सुषुवेऽप्रजा ॥ "

—(भाग. पु. ४·१३·३८)

THE

PHALTAN SUGAR WORKS LTD.

[*Established 1933*]

MANUFACTURERS OF BEST QUALITY OF WHITE SUGAR & RAW SUGAR

HEAD OFFICE

296, Bazargate Street,
Sangli Bank Building., 4th Floor.
Opp : Reserve Bank of India, Fort Bombay

Factory

Sakharwadi - Dist. Satara

MANAGING AGENTS

M/s MAFATLAL, APTE & KANTILAL Ltd.,
296, Bazargate Street, Sangli Bank Building,
Opp : Reserve Bank of India, Fort Bombay. 1.

Telephone
253339.

Telegram
" RISINGSUN " Bombay

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

अनुवादकः भि. वि. मराठे

समाजवादाची अल्बेर कामूकृत समीक्षा : २ :

संघर्ष आणि समन्वय

मार्क्सची भविष्यवाणी तत्वतःदेखील क्रांतदर्शी आहे. मानवी वास्तवतेचे मूळ उत्पादनाच्या फलितांत असते, त्या अर्थी, ऐतिहासिक उत्क्रांति क्रांतिमूलक असते; कारण, अर्थपद्धति क्रांतिजनक असते, उत्पादनाच्या प्रत्येक अवस्थेत अर्थपद्धतीत अंतर्गत विरोध निर्माण होतो आणि या विरोधामुळे तदनुषंगिक समाजव्यवस्था मोडकळीस येऊन, उत्पादनपद्धति उच्चतर पातळी गाठते. भांडवलशाही ही या उत्पादन अवस्थांची अखेरची पायरी होय. कारण, ती अशी परिस्थिति निर्माण करते की ज्यामुळे सारे अंतर्गत विरोध विरून जातात आणि अर्थपद्धति संपुष्टात येते. तत्क्षणी आपले युग इतिहासपूर्वकालीन (pre-history) युग ठरते. अन्यतऱ्हेने, ही मीमांसा हेगेलच्या मीमांसेसारखीच आहे. हेगेलने अध्यात्मिक दृष्टीकोनांतून विरोधविकासाचा (Dialectic) विचार केला आहे. खुद्द मार्क्सने कोठेही विरोधविकासात्मक जडवादाचा (Dialectical Materialism) उल्लेख केलेला नाही. या राक्षसी वेडाची भरमसाट वाखाणणी करण्याचे कार्य त्याने आपल्या वारसदारांवरच सोपविले. तरीपण, मार्क्सच्या मते वास्तवता ही विरोधविकासात्मक आहे. तसेच, ती अर्थोत्पादनपद्धतीवर अवलंबून आहे. वास्तवता ही उत्क्रांतीची नित्य-प्रवृत्ति आहे; आणि तदंतर्गत नित्य संघर्षामुळे उत्क्रांतीला चालना मिळत असते. प्रत्येकवेळी हे संघर्ष विरून जातात आणि एक नवीन उच्च प्रतीचा समन्वय (Synthesis) निर्माण होतो. या समन्वयातून प्रतिविरोधी समन्वय निर्माण होऊन तो इतिहासाची प्रगति चालू ठेवतो. अध्यात्माच्या (spirit) दिशेने प्रगत होणारी वास्तवता अशा तऱ्हेचे हेगेलचे जे वास्तवतेविषयी वर्णन आहे, अगदी तसेच, वर्गविहीन समाजव्यवस्थेप्रत प्रगत होणारी अर्थोत्पादन पद्धति, असे मार्क्सचे प्रतिपादन आहे. प्रत्येक वस्तु स्वयं आणि स्वयंविरोधी आहे, आणि या विसंगतिमुळे तिचे अन्य वस्तूत परिवर्तन होत असते. 'बूर्झ्वा'- स्वरूपी म्हणून भांडवलशाहीचा क्रांतिजनक आविष्कार होतो आणि साम्यवादाचा (Communism) मार्ग सुकर होतो.

मार्क्सवादाचा आधार

मार्क्सची कल्पकता जर कशात असेल तर, इतिहास हा एकाच वेळी विरोधविकासात्मक तसेच, अर्थोत्पादनपद्धतीवर अवलंबून असतो, या तत्वप्रतिपादनात. इतिहास जड (matter) आणि अध्यात्म (spirit) अशा दोहोंवर अधिष्ठित आहे, हा हेगेलचा सिद्धांत. मार्क्सने अध्यात्म लक्षण नाकारून, ऐतिहासिक जडवादाचे तत्व पुरस्कृत केले. पण, बरडायिफ म्हणतो त्याप्रमाणे 'डायलेक्टिक्' (एक तर्कशास्त्रीय विचारपद्धति) आणि जडवाद यांचा समन्वय अशक्य आहे. 'डायलेक्टिक'चा संबंध फक्त मनाशीच असू शकतो (There can only be a dialectic of the mind). शिवाय जडवाद ही देखील संदिग्ध कल्पना आहे. जडवाद या शब्दाच्या व्युत्पत्तीतच, जगात जडाशिवाय आणखी काहीतरी आहे हा अर्थ अभिप्रेत आहे. हा आक्षेप ऐतिहासिक जडवादावरील टीकासंबंधात अधिकच लागू पडतो. इतिहास व निसर्ग यातील भेद अशाकरिता की, इतिहास हा इच्छाशक्ति, विज्ञान, भावना याद्वारे घडविला जातो. अर्थात, मार्क्स हा विशुद्ध जडवादी नाही, कारण, विशुद्ध वा निरपेक्ष जडवाद अशी चीजच नाही. हा जडवाद विशुद्धता वा निरपेक्षता यांच्यापासून इतका दूर आहे की, जर साधनांमुळे (weapons) औपपात्तिक (theory) यशःप्राप्ति होऊ शकते, तर उपपत्तींमुळे साधने निर्माण होऊ शकतात हेही त्यास मान्य आहे. ऐतिहासिक नियतिवाद (Determinism) हे नामाभिधानच मार्क्सच्या तत्त्वाला सार्थ ठरण्यासारखे आहे. तो विचारांचे अस्तित्व नाकारीत नाही; बहिर्गत वास्तवतेमुळेच निरपेक्षपणे ते निश्चित होतात अशी त्याची कल्पना आहे. " माझ्या मते, विचारप्रवृत्ति (Process of thought) म्हणजे वास्तवता-प्रवृत्तीचे (Process of reality) मानवी मनावर येऊन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

उमटलेले (transported) आणि क्रमांतरित (transposed) परावर्तन होय. " मार्क्सच्या या बोजड व्याख्येचा अर्थ नीटसा उमगू शकत नाही. ही बहिर्गत प्रवृत्ति मनावर कशी आणि कशाद्वारे येऊन उमटते आणि याहीपेक्षा कठीण म्हणजे, संक्रमण कसे होते, या प्रश्नांचा उलगडा होत नाही. पण, तत्कालीन अदूरदर्शी तत्वज्ञानच मार्क्सचा आधार होता. त्याला जे काही म्हणावयाचे आहे, त्याचे अन्य विचारपातळीवर स्पष्टीकरण होऊ शकेल.

आर्थिक नियतिवाद

मार्क्सच्या मते, मानव हाच केवळ इतिहास आहे आणि विशेषेकरून उत्पादनसाधनांचा इतिहास आहे. आपल्या उपजीविकेचे साधन तो स्वतः निर्माण करतो, या भूमिकेवरच, माणूस हा अन्य प्राण्यापासून भिन्न आहे, असे मार्क्सचे प्रतिपादन आहे. उदरंभरण, वस्त्रप्रावरण आणि निवारा या प्राथमिक गरजा भागविल्याविना त्याला अस्तित्व नाही. माणसाची नियति प्रथम यावर अवलंबून आहे आणि हें अवलम्बन अपरिहार्य व अभिन्न आहे. हे प्रदर्शित करण्याकरिता मार्क्स म्हणतो, "उद्योगधंद्यांचा इतिहास, माणसाच्या ज्या आवश्यक कार्यप्रवृत्ति आहेत त्यांचे दर्शन घडविणारा ग्रंथ आहे." या सर्व प्रतिपादनांतून जे सर्वसाधारण तत्त्व म्हणून मार्क्सने मांडले ते असे की आर्थिक अवलम्बन हे एकमेव कारण असून, मानवी जीवनातील, असिद्ध, अननुभवित धरून साऱ्या, घटनांचा अर्थ लावण्यास पुरेसे आहे. मानवी आचारविचारांच्या उत्पत्तीचा अर्थ लावण्याचे कार्यात आर्थिक नियतीवादाचा फार मोठा वाटा आहे हे मान्य करूनही, आपणाला मार्क्सप्रमाणे असा निष्कर्ष काढतां येणार नाही की, नेपोलियन विरुद्ध झालेली जर्मन बंडाळी केवळ साखर व कॉफी यांच्या तुटवड्यामुळेच झाली. खरोखर विशुद्ध नियतिवाद हे मूलतःच हास्यास्पद तत्त्व आहे. ते तसे नसेल तर, एका निश्चित विधानापासून प्रारंभ करून नियतिवादानुसार त्याचा परिणाम म्हणून तज्जन्य दुसरे विधान, त्याचा परिणाम म्हणून तिसरे, चवथे, पाचवे, अशा रीतीने शेवटी संपूर्ण सत्य सहज गाठता येईल. नाहीपेक्षा एकतर प्रारंभीचे विधान असत्य असेल किंवा सत्य नैमित्तिक अतएव परिणामशून्य असले पाहिजे; मग, नियतिवाद खोटा ठरतो. पण इतक्या साध्या नी सोप्या विचारसरणीचा मार्क्सने निर्वेधपणे आश्रय घ्यावा याची, तशीच काही, शुद्ध तर्कशास्त्रास परकी अशी कारणे होती.

मानवी आचारविचारांच्या मुळाशी आर्थिक नियतिवाद आहे असे गृहीत धरणे, याचा अर्थ साररूपाने माणूस म्हणजे त्याचे सामाजिक संबंध. एकला (Solitary) मानव अशी काही वस्तु नाही, हा १९ व्या शतकातील वादातीत शोध आहे. माणसाला जे एकटे एकटे वाटते ते सामाजिक कारणामुळेच, असे यावरून अनुमान निघू शकेल. कारण, या एकलेपणाचा अर्थ मानवाबाहेरील गोष्टीमुळे लावावयाचा असेल तर माणसाला अलौकिकत्वाचाच मार्ग धरावा लागेल. उलटपक्षी, समाजाचा मूळ घटक मानव हाच आहे, या विधानाला जोडून समाज मानवाला घडवितो असे विधान केले की, अलौकिकत्वाची हकालपट्टी होऊन त्याविना साऱ्या गोष्टींचा अर्थ लागल्यासारखा दिसेल. आणि मग, मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे मानव हाच 'आपल्या इतिहासाचा कर्ता- करविता' ठरतो. ज्ञानदीप उजळणाऱ्या तत्त्वज्ञानामुळे चालना मिळालेली नकारात्मक चळवळ (movement of negation) पूर्णत्वास पोहोचविण्याच्या दृष्टीनेच मार्क्सची भविष्यवाणी क्रांतदर्शी ठरते. जॅकोबिनवादाने मानवाच्या ईश्वरी अंशाचे अलौकिकत्व नष्ट केले. पण त्याऐवजी तत्त्वांच्या अलौकिकत्वाची प्रतिष्ठापना केली. मार्क्सने तत्त्वांचे अलौकिकत्वही नष्ट करून समकालीन नास्तिकवादाची स्थापना केली. हेगेलपेक्षाही खोल असा मूलग्राही घाव घालून, त्याने बुद्धीच्या अलौकिकत्वाचा नाश केला आणि ते इतिहासाच्या ओघात फेकून दिले. तत्पूर्वी इतिहास नियमन करणारे तत्त्व (regulating principle) होते. आता तो विजयाची पताका फडफडवीत आघाडीवर आहे. मानवी मनाच्या अधिराज्याला इतिहासातील मूल्य पुनर्प्राप्त होते, म्हणून हेगेल हा अध्यात्मवादी आणि आपण जडवादी असल्याचा मार्क्सचा दावा होता–(मार्क्स जितका जडवादी नव्हता त्याहीपेक्षा अधिक हेगेल अध्यात्मवादी नव्हता). 'कॅपिटल' हा ग्रंथ स्वामित्व व दास्यत्व यांच्यातील विरोधविकासात्मक तर्ककुशलतेच्या (Dialectic) फिरून आश्रय घेतो; पण, आत्म्याचा जाणिवेच्या जागी (consciousness of self), आर्थिक स्वायत्तता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

(economic autonomy) आणि शेवटी साम्यवादाच्या आगमनाद्वारे निरपेक्ष अध्यात्माची अधिसत्ता यांना आणून बसवितो. "नास्तिकवाद म्हणजे धर्माचे अस्तित्व नष्ट करून त्याद्वारे समन्वय सांधलेला मानवतावाद; साम्यवाद (communism) म्हणजे खासगी मालमत्तेचे अस्तित्व नष्ट करून (suppress) त्या द्वारे समन्वय सांधलेला (mediated) मानवतावाद." धार्मिक परभाव वा स्नेहसंबंधाची ताटातूट (alienation) तसेच, आर्थिक परभाव यांचे मूळ एकच. भौतिक निर्धार व कृति याबाबतीत मानवाला निरपेक्ष स्वातंत्र्य प्राप्त करून दिल्याने धार्मिकतेपासून मुक्तता होऊ शकेल. म्हणूनच, क्रांतीचा नास्तिकतेशी आणि तसाच, मानवी अधिसत्तेशी एकरूपतेचा संबंध जोडला जातो.

यावरून, मार्क्स आर्थिक नियतिवादावर भर देण्याच्या निर्णयाप्रत का पोहोचला हे लक्षात येईल या दृष्टिकोनाचा सर्वात मोठा फायदा तो हाच की, तत्कालीन 'बुर्झ्वा' समाजाने बडेजाव माजविलेल्या काही औपचारिक मूल्यांच्या मागे दडून असलली वास्तवता प्रकाशात आली. मार्क्सची गूढ उपपत्ति अजूनही ग्राह्य ठरते. कारण, त्यात सत्य आहे आणि क्रांतिमूलक गूढत्वही आहे. तत्कालीन स्वातंत्र्यविषयक कल्पना म्हणजे दंडुकेशाहीचे संरक्षण असलेले मिरासदारवर्गाचे स्वातंत्र्य; पुराणमतवादी वृत्तपत्रांकडून उदोउदो केली जाणारी कुटुंबव्यवस्था, खाणींच्या खोल गर्तेत जातीयतेच्या दोरखंडास धरून उतरणारे स्त्री-पुरुष, अशा सामाजिक स्थितीवर ही कुटुंबपद्धती आधारित होती, श्रमजीवी वर्गाला नीच व्यवसाय करावयास लावून त्यांच्या हीन दशेवर नीतिमत्ता उजळत होती. अप्रामाणिकपणा, बुद्धीचा स्वार्थलोलुपतेखातर दुरुपयोग, दांभिकपणा, ढोंगबाजी यांनी बुजबुजलेला हीन दर्जाचा समाज, ही एक तत्कालीन दुर्दैवी कहाणी होती. डोळयात झणझणीत अंजन घालणाऱ्या मार्क्सने अशा या समाजपद्धतीवर कडाडून, अपूर्व आवेशाने हल्ला चढविला यात नवल ते काय ? दुसरे म्हणजे, १८३४ च्या लिऑनमधील बारगळलेल्या बंडाळीत सांडलेल्या रक्तातून, तसेच, व्हर्सेलिसच्या नीतिवाद्यांच्या अधम क्रूरतेमुळे, हा धिक्कार करण्यास मार्क्सला चेतना मिळाली, ही एक विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. "ज्या माणसाजवळ काहीही नाही, तो अस्तित्वशून्य" वस्तुतः चुकीचे असे हे विधान, १९ व्या शतकातील आशावादी समाजाच्या बाबतीत प्रायः खरे ठरणारे होते. संपन्नतेच्या अर्थोत्पादनपद्धतीमुळे बोकाळलेली बेजबाबदारवृत्ति, मार्क्सने आपल्या विचारप्रणालीत आर्थिक व सामाजिक संबंधांना अग्रक्रम देण्यास कारणीभूत झाली, आणि मानवी अधिसत्तेचे आकर्षक भविष्यचित्र रेखाटून पराचा कावळा केला.

सामाजिक विग्रहांच्या समाप्तीचा सिद्धांत

मार्क्सने शुद्ध आर्थिक दृष्टिकोनातून इतिहासाचा लावलेला अर्थ समजणे आता अधिक सोपे होईल. तत्त्वे जर श्रममूलक असतील, तर, दारिद्र्य आणि श्रम यांची वास्तवताच केवळ सत्य ठरते, आणि मग, असे सिद्ध करता आले की, या वास्तवतेच्या दृष्टिकोनातून मानवजातीच्या भूतभविष्यकालाचा अर्थ लावता येतो, तर तत्त्वे कायमची नाश पावतील आणि त्याबरोबर त्यांच्यापासून फायदा उचलणारा हितसंबंधी समाजही. वस्तुतः मार्क्सची हीच महत्त्वाकांक्षा आहे.

मानव हा उत्पादन आणि सामाजिक संबंध यांच्या जगात जन्माला आलेला प्राणी आहे. भिन्नभिन्न भूभागातील संधीविषयक असमानता, उत्पादनसाधनांची कमीअधिक वेगाने सुधारणा आणि जीवनसंग्राम, या साऱ्या गोष्टींमुळे जे सामाजिक भेद शीघ्रगतीने निर्माण झाले, त्यातूनच उत्पादन व वाटप यांच्यामधील विरोध आकारास आला. परिणामतः वर्गविग्रह निर्माण झाला. हे विरोध आणि विग्रह इतिहासाची चेतनाशक्ति आहे. प्राचीन गुलामांची पद्धत आणि तदनंतरची सरंजामशाही, या खुद्द उत्पादक-उत्पादन साधनांचा मालक असलेल्या मध्ययुगीन कारागीर-पद्धतीप्रत (artisanship) नेणाऱ्या दीर्घ मार्गावरील अवस्था होत्या. जागतिक व्यापारमार्ग व नवीन बाजारपेठा यांच्यामुळे उत्पादन प्रांताच्या कक्षा वाढत गेल्या. उत्पादनपद्धति आणि वाटपाची वाढती मागणी यांच्यात निर्माण होणाऱ्या विसंगतिमुळे लघु उद्योग व कृषिपद्धति अवनतीच्या मार्गाला लागतात. औद्योगिक क्रांति, बाष्पयंत्राचा शोध, नवीन बाजारपेठांसाठी स्पर्धा, यांच्यामुळे लघुउद्योगधंदेवाल्यांना गाशा गुंडाळावा लागतो आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाला सुरवात होते. ज्याची विक्रत घेण्याची ऐपत आहे,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अशाच्या हातात उत्पादन-साधने केंद्रीभूत होतात आणि खरे उत्पादक जे कामगार आता फक्त आपली श्रमशक्ति पैसेवाल्यांना विकून टाकू शकतात. उत्पादकाची उत्पादन-साधनांपासून झालेली फारकत 'बुर्झ्वा' भांडवलशाहीचे स्वरूप स्पष्ट करते. या संघर्षातून अपरिहार्यतेने उद्भवणाऱ्या परिणामाच्या आधारावरच मार्क्सने सामाजिक विग्रहांच्या समाप्तीचा पुरस्कार केला.

विरोधविकासात्मक वर्गविग्रहाचे प्रस्थापित तत्त्व अशा रीतीने एकाएकी का विराम पावते, अशी शंका साहजिकच उद्भवते. हे तत्त्व शाश्वत सत्य तरी असले पाहिजे किंवा तसे ते नसले पाहिजे. वर्गविग्रहाचा अंत झाल्यावर आणखी दुसरे सामाजिक विग्रह निर्माण होणार नाहीत कशावरून? मार्क्सच्या भविष्यवाणीची मेख याच प्रश्नात आहे.

भांडवलशाही समाजपद्धतीची मार्क्सकृत मीमांसा सुपरिचित आहे. अपरिहार्यतेने एक दिवस असा येतो की, जुलुमाच्या जोखडाखाली जीवन कंठणाऱ्या गुलामांचे एक प्रचंड सैन्य अधम व निष्ठुर अशा मूठभर मालकशाहीच्यासमोर उभे ठाकते. हाच तो क्रांतीचा दिवस. भांडवलशाहीचा विनाश आणि तितकाच कामगारवर्गाचा विजय अटळ ठरतो. पण, भांडवलशाहीच्या मार्क्सकृत सुप्रसिद्ध मीमांसेत सर्व संघर्षाच्या समाप्तीचे निवेदन कोठेच आढळत नाही. कामगारवर्गाच्या विजयानंतर जीवनसंग्राम चालूच राहून त्यांतून नवीन संघर्ष निर्माण होण्याचा संभव कायम राहातोच. मग दोन कल्पना संभवतात. पहिली आर्थिक–उत्पादनाचा विकास व सामाजिक विकास या दोहोमधील एकरूपता (identity); दुसरी शुद्ध पद्धतिविषयक (systematic) – कामगारवर्गाचे कार्य. या दोन कल्पनांचे, ज्याला मार्क्सची सक्रीय निष्क्रीयता (activist passiveness) म्हणता येईल, अशा अवस्थेत पुनर्मीलन होते.

मूठभर व्यक्तींच्या हातात भांडवलाचे केंद्रीकरण करणारी आर्थिक उत्क्रांति संघर्षाची तीव्रता वाढविते आणि काही अंशी हा संघर्ष अवास्तवही बनविते. जेव्हा उत्पादक शक्तींची वाढ अत्युच्च बिंदुप्रत पोहोचते, तत्क्षणी, आधीच खासगी मालकीच्या पकडीतून ढिली पडलेली उत्पादनसाधने, अगदी अल्पशा चालनेमुळे देखील कामगारवर्गाच्या हातात पडू शकतील आणि त्यावर सामुदायिक हक्क प्रस्थापित करता येईल, असे दिसते. जेव्हा खासगी मालमत्ता एकाच मालकाच्या हातात केंद्रीभूत होते, त्यावेळी ती फक्त या एकाच व्यक्तीच्या अस्तित्वामुळे सामुदायिक मालकीपासून दुरावलेली असते. पर्यायाने या खासगी भांडवलशाहीचा (private Capitalism) अपरिहार्य परिणाम म्हणजे एक प्रकारची राज्यनियंत्रित भांडवलशाही (State Capitalism). ही राज्यनियंत्रित भांडवलशाही सेवाभावाने एका नूतन समाजाला जन्म देईल. या समाजव्यवस्थेत भांडवलदार व मजूर असा भेदभाव दिसून येणार नाही; आणि प्रगतीकडे धाव घेणारा हा एकजिनसी समाज न्याय व संपन्नता निर्माण करील. ही सुखदायक निष्पत्ति लक्षात घेऊनच मार्क्सने, अजाणतेपणाने का होईना, भांडवलशाहीच्या क्रांतिमूलक भूमिकेची वाखाणणी केली आहे. भांडवलशाहीचे 'ऐतिहासिक हक्क' असा उल्लेख करून, तो म्हणतो की, हे हक्क प्रगति, तसेच, परागति या दोघांचेही उगमस्थान आहे. त्याच्या दृष्टीने, श्रेष्ठ दर्जाची अर्थोत्पादनपद्धति प्रस्थापित करण्याकरिता जी आदर्श परिस्थिति आवश्यक आहे, तिची पूर्वतयारी करणे हेच भांडवलशाहीचे अंगीकृत कार्य आहे आणि तिच्या अस्तित्वाचे समर्थनही याच गोष्टीत आहे. खुद्द ही उत्पादनपद्धति क्रांतिकारक नाही, ती प्रत्यक्ष क्रांतीचा शिखरबिंदु आहे. 'बुर्झ्वा' अर्थोत्पादन पद्धतीची मूलतत्वेच फक्त क्रांतिमूलक असतात. क्रांतीचा बीजे तत्त्वतः भांडवलशाही पद्धतीत असतात; म्हणूनच, 'बुर्झ्वा' राज्ययंत्राविषयी सहिष्णुता दाखवावी, येवढेच नव्हे तर, औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या अर्थोत्पादनपद्धतीप्रत मागे फिरण्यापेक्षा हे राज्ययंत्र उभारण्यास मदत करावी, अशी मार्क्सची शिफारस आहे. तो म्हणतो की कामगारवर्गाने कामगार-क्रांतीकरिता अट म्हणून भांडवलशाही क्रांति स्वीकारलीच पाहिजे. "

कामगारवर्गाचे अवतारकार्य

या विवेचनावरून लक्षात येईल की, उत्पादन हा मार्क्सच्या भविष्यवाणीचा मध्यबिंदु होता. आणि अगदी याच मुद्द्यावर, वास्तवतेकडे दुर्लक्ष करून त्याने पद्धतीलाच अधिक महत्त्व दिले असे म्हटल्यास गैर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई


अनुक्रमणिका

ठरणार नाही. मँचेस्टर उत्पादनपद्धतीचा पुरस्कार करणारा अर्थशास्त्रज्ञ रिकार्डो याच्यावर, मानवी हिताकरिता उत्पादन नव्हे, तर, उत्पादनाकरिताच उत्पादन, असे अनिष्ट तत्त्व प्रतिपादन करतो म्हणून आरोप लादणाऱ्यांच्याविरुद्ध मार्क्सने रिकार्डोचा नेहमीच पाठपुरावा केला आहे. नेमके या तत्त्वप्रतिपादनातच रिकार्डोचे गुणवैशिष्ट्य आहे. असे मार्क्स, हेगेलसारख्याच बेपर्वाईने, उत्तर देत असे. अखिल मानवजातीच्या मुक्तीला मदत होणार असेल, तर मग व्यक्तीव्यक्तीच्या बलिदानाची किंमत ती काय! जणु प्रगति म्हणजे, पराजित शत्रूच्या मस्तक-कवचीतून सुधापान करण्याची इच्छा बाळगणाऱ्या त्या भयंकर खिस्तपूर्व (Pagan) देवासमानच!! पण, काही का असेना, औद्योगिक स्वर्ग अवतरल्यानंतर जेव्हा तो विग्रहविहीन समन्वयाचा सुदिन उगवणार असेल, तत्समयी सर्व यातना व चिंता दूर करणारी ती प्रगतीच असेल!

पण, अशा तऱ्हेची ही क्रांति कामगार वर्ग टाळू शकत नसेल किंवा उत्पादनसाधनांची मालकी हातात येणे अपरिहार्य असेल, तर सर्वांच्या हिताकरितां या साधनांचा उपयोग कसा करावयाचा याचे तरी ज्ञान त्या वर्गाला असेल काय? या क्रांतीच्या गर्भातून आणखी वर्ग नी विग्रह निर्माण होणार नाहीत यांची हमी काय? यांची हमी हेगेल आहे! कामगारवर्गाला संपत्तीचा उपयोग जगाच्या कल्याणाकरिता करणे भाग पडेल. विशिष्ट (Particular) विरुद्ध वैश्विक (Universal) असे हे नाते आहे. ज्या विग्रहाने मालक आणि गुलाम यांच्या ऐतिहासिक शोकांतिकेला चालना दिली, तशाच तऱ्हेच्या विशिष्ट विरुद्ध वैश्विक या विग्रहाची भांडवलशाही विरुद्ध कामागार ही अंतिम अवस्था आहे. मार्क्सने तयार केलेल्या कल्पनारम्य योजनापूर्तीनंतर शेवटी, कुप्रसिद्ध गुन्हेगार ठरलेल्या मूठभर मालकांना अगदी खड्यासारखे दूर वेचून काढून, कामागारवर्ग सर्व वर्गांची एकजूट घडवून आणील. कामगारवर्गाला अवनतीच्या आत्यंतिक अवस्थेला पोहोचवून, भांडवलशाही ही त्या वर्गाला समाजातील अन्य घटकापासून भिन्नत्व प्राप्त करून देण्यासाठी क्रमाक्रमाने मुक्त करीत असते. कामगारवर्ग सर्वस्वाला पारखा होतो. त्याचे स्वतःचे असे काहीही उरत नाही. ना मालमत्ता, ना नीतिमत्ता ना स्वदेश! त्याची सारी नाती तुटतात. तो कुणाचाच राहात नाही. फक्त आपल्या विशिष्ट वर्गाच्या जातीचा दुराराध्य प्रतिनिधी! आपले स्वत्व प्रतिज्ञापूर्वक प्रस्थापित करतो, तेव्हा तो प्रत्येक वस्तूचे आणि प्रत्येक व्यक्तीचे करीत असतो. तो कुणी देव आहे म्हणून नव्हे, तर अत्यंत अधम अशा अमानुष दशेला तो पोहोचला आहे म्हणूनच! "व्यक्तित्वाला पारखा झालेला कामगार वर्गच फक्त स्वत्व प्रतिज्ञापूर्वक प्रस्थापित करण्यास समर्थ असतो."

आत्यंतिक हीनतेतून अत्युच्च मानाचे स्थान संपादन करणे, हेच कामगारवर्गाचे अवतारकार्य आहे. क्लेश आणि कष्ट याद्वारे मानवजातीची पापकर्में धुऊन काढून, दुरावलेले स्नेहसंबंध पुन्हा जोडण्याकरिता कामगारवर्ग हा जणु मानवी स्वरूपात येशु खिस्तच अवतरला आहे. प्रथमतः अनेकविध नकार नी अभाव पाठीशी बांधून आलेला, आणि तदनंतर, स्वत्वाच्या मानवी हक्काची प्रतिज्ञापूर्ण प्रस्थापना करणारा अग्रदूत ही त्याची भूमिका, "कामगारवर्गाच्या अवतार समाप्तीविना तत्त्वज्ञानाचा आत्माविष्कार होणे नाही, आणि तत्त्वज्ञानाच्या आत्माविष्काराविना कामगारवर्गाला अस्मिता नाही." शिवाय, "जगाचा इतिहास हेच कामगारवर्गाच्या अस्तित्वाचे अधिष्ठान... साम्यवाद्यांच्या कर्तृत्वाला ऐतिहासिक वास्तवता म्हणून जे अस्तित्व आहे, ते जागतिक भूमिकेवरच." पण, हा खिस्तावतार सूड घेणाराही आहे. खासगी मालमत्तेत अभिप्रेत असलेल्या शिक्षेचे प्रायश्चित हा देत असतो. मार्क्स म्हणतो, "चालू युगातील प्रत्येक घरावर एक गूढ अशी लाल फुली आहे. इतिहास हा न्यायाधीश आणि कामगारवर्ग हा शिक्षेची अंमलबजावणी करणारा आहे." अशा रीतीने, परिपूर्ति अपरिहार्य आहे. अरिष्टामागून अरिष्टे येतील कामगारवर्गाची अवनति अधिकाधिक गंभीर होत जाईल. त्या वर्गाचे अस्तित्व जागतिक अरिष्टकालापर्यंत टिकाव धरून राहिल. आणि हे जागतिक अरिष्ट ज्यावेळी कोसळेल, तत्क्षणी जगाची अनित्यता नष्ट पावलेली असेल व पराकोटीची हिंसात्मक घटना घडून येऊन, इतिहासातील हिंसा कायमची विराम पावेल. साधनाविना साध्यांचे अधिराज्य सुरू होईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. ना. बा. मराठे

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृति

परप्रांतातील महाराष्ट्रीय

मराठी भाषिक परप्रांतात गेले, काही राव, पंत, पांडे, शास्त्री, त्या त्या प्रांतात स्थायिकहि झाले. काहींनी स्थानिक वातावरण आत्मसात् करून घेतले. तेथील जीवनात एकरूप होऊन गेले. बनारसमध्ये अशी काही घराणी आहेत की ती घरात मराठी भाषेचा वापर करीत असूनही महाराष्ट्राच्या कोणत्या मूळ भागातून आले हे त्यांना सांगता येणे कठीण जाते. तीच स्थिति म्हैसूर तंजावरमधील काही घराण्यांची आहे. त्यांची घरगुती बोलभाषा मराठी आहे. महाराष्ट्रात चालू असलेल्या मराठी भाषेशी ती मिळती जुळती आहे. तथापि त्यात कितीतरी फरक पडलेला आहे. टी. चन्द्रशेखरन् यांच्या सम्पादकत्वाखाली सरस्वती महाल लायब्ररी तंजावर एथून प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकातील मराठी भाषा अवलोकन केल्यावर हे चटकन् ध्यानात येते. इतर स्थानिक व्यवहार स्थानिक बोलभाषेतून केले जात असल्याने त्या त्या बोलभाषेचे काही ध्वनि, हेल वा आघात या मराठी बोलीतूनही दिसून येतात. कौतुक एवढेच की घरी बोलताना हे कधीकाळचे मराठी लोक घरी व आपापसात मराठी भाषेतूनच बोलतात. त्यांचे रोटी-बेटी व्यवहार शक्य तो आपापसात केले जात असल्याने परंपरागत आचार-विचार बरेचसे पूर्वीचेच चालत आलेले आहेत. तंजावरच्या या कुटुंबांना तमिळ व तेलुगु लोक महाराष्ट्रीय म्हणूनच ओळखतात. पण एखादा अस्सल महाराष्ट्रीय भेटला तर त्याच्याशी हे मूळ मराठी लोक इंग्रजीतून वा हिंदीतून बोलणेच पसंत करतात: त्यामुळेच की काय महाराष्ट्र प्रांतातील मराठी भाषिक त्यांना आपले म्हणून जवळ करण्यास तेवढेसे उत्सुक दिसत नाहीत.

सांस्कृतिक देवाण-घेवाण

मद्रासी लोक ज्या ज्या शहरात गेले तेथे तेथे आपल्याबरोबर ते इडली-दोसा-सारं घेऊन गेले. आपल्या जीवनातील वैशिष्ट्यांची छाप तेथील जीवनात उतरविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे असे प्रत्ययास येते. सांस्कृतिक देवाण घेवाण शतकानुशतके चालत आली आहे. मराठी भाषेवर द्रविडी भाषांचे परिणाम झालेले आहेत ते इतके आहेत की ते समूळ काढून टाकू म्हटले तर अशक्य व्हावे. मराठीतील ताई, अक्का, अण्णा, अप्पा, कोंकणीतील आई अर्थी येणारा ' आवय ' ह्या घरगुती शब्दांपासून तो मूर्धन्य ध्वनिप्रचुर उद्गारापर्यंत या सांस्कृतिक घेवाणाची मर्यादा मराठीने गाठली आहे. महाराष्ट्रांतील शिवपूजा आणि ठिकठिकाणी दिसणारी त्र्यम्बकेश्वर, महाकाळेश्वर, महाबळेश्वर, भद्रेश्वर, या सारखी शंकराची मंदिरे म्हटली तर द्रविडी संस्कृतीच्या परिणामाची प्रतीके म्हणून पाहावयास हरकत नाही. या सांस्कृतिक देवाण घेवाणाची गतकालीन उदाहरणे हुडकीत बसणाच्या ऐवजी प्रचलित मुंबईतील उडुपी भवने, माटुंगा विभाग वा पुण्यातील रास्तापेठी वैशिष्ट्ये दृष्टीखाली घातली तरी चालण्या सारखे आहे. राजकीय क्षेत्रातही ही एकात्मकता कन्नम्वारांना बिनविरोध मुख्यमंत्री म्हणून निवडून दिले त्यावरुन दिसून आलेली आहे.

ब्रिटिशांनी युरोपियन शिष्टाचार, शिक्षण, पेहेराव सारे सारे काही भारताला दिले. कोणतीही कुरकुर न करता ममी, पपा, आमच्या चुलीपर्यंत पोचून सांस्कृतिक घेवाणाची श्रीगणेशा आम्ही घातली. तत्पूर्वी आलेल्या नबाबी शिष्टाचारांनीही आमच्या घरात असाच नकळत प्रवेश केला होताच. शहाजी पासून शेवटच्या बाजीरावांपर्यंतचा महाराष्ट्रातील रीति रिवाजांचा काळ या सन्दर्भात तपासला तर एक झक चित्र आपल्या लक्षात भरेल. सतराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या महाभारतातील हस्तलिखितात अर्जुन-श्रीकृष्णाची हातानी काढलेली काही चित्रे हस्तलिखित पोथ्यातून उपलब्ध आहेत ती चित्रे याची साक्ष देण्यास पुरेशी आहेत. इतर अनेक क्षेत्रात सांस्कृतिक घेवाणाची दृश्ये तपासाअंती आपल्याला दिसून येतील. संगीतातील ठुमरी, टप्पा, कव्वाली ही खास याच काळात जन्माला आलेली बालके आहेत आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ती आपल्या संस्कृतीत कधीच एकरूप होऊन गेली आहेत आणि त्याबद्दल कुणी अवाक्षर काढीत नाही अन् जरुरीही नाही. याचा अन्वयार्थ मराठी माणसापुरता असा लावला की 'मराठी माणसे सांस्कृतिक घेवाणात मोठी तरबेज आहेत आणि सांस्कृतिक देवाणात ती फारशी जागृत नाहीत' तर त्यात फारशी चूक होऊ नये.

मराठी माणसांनी आपली म्हणून काही वैशिष्ट्ये भारतभूवर उतरविण्याचा बुद्धिपुरःसर वा नकळत प्रयत्न केला आहे असे दाखवून देता येईल काय? किंवा भारतातील इतर प्रांतांनी मराठी बाण्याचा धडा गिरविण्याचा प्रयत्न केला आहे असे सांगता येईल काय? शिवाजीने गिरवलेला गोब्राह्मणप्रतिपालनाचा धडा कुणी गिरवला आहे? किंवा कुणाला गिरवायला लावला असे तरी सांगता येईल? रामशास्त्री प्रभुण्यांचा निःस्पृहपणा आदर्श समजून तो आदर्श एखाद्या प्रांतात उदाहरणादाखल तरी दिला जातो काय? आगरकरांची सुधारणा, तळमळ, न्याय्य–सत्यप्रियता, ज्योतिबा फुल्यांची गरिबांविषयीची कळकळ आणि शिक्षणप्रेम महाराष्ट्राबाहेर नाममात्रानेही प्रसृत का झाले नाही? मराठीचे आद्य दर्पणकार वा आधुनिक गद्य वाङ्मयाचे अध्वर्यू यांची नावेही मराठ्येतरांना ऐकून माहित का असू नये? या उलट राममोहन राय ईश्वरचन्द्र विद्यासागर, यासारखी इतर भारतीय अग्रणींची नावे भारतातील बहुतेक सर्व प्रांतातून सर्वतोमुखी का व्हावी? ऊर्दूच्या प्रेमचंदाला आपलेपणाचा वारसा लावून हिन्दीतील श्रेष्ठ कथाकार म्हणून कधीच गौरवून टाकला. रवीन्द्र, शरचन्द्राइतके श्रेष्ठ साहित्यिक इतर भारतीय वाङ्मयात नाहीतच अशी स्वप्रांती, परप्रांती आणि परदेशी ग्वाही मिरवून भारतात एकमेवाद्वित यश मिळविण्याचे श्रेय या उलट बङ्गभाषिकांनी कधीच मिळविले. राजकीय क्षेत्रात तर खुद्द बंगालमध्ये नसतील इतके अनुयायी आणि व्यक्तिपूजक सुभाषचंद्रांना, शामाप्रसादांना आणि मानवेन्द्रनाथांना महाराष्ट्रात मिळाले आहेत. महाराष्ट्रातील एखाद्या खेडेगावातील रस्तोरस्ते याची साक्ष देतील.

वाङ्मयीन प्रवृत्तीतही तेच

सांस्कृतिक बाबतीत जे दृष्टोत्पत्तीस येते, तेच वाङ्मयीन प्रवृत्तीतही! भारतीय कीर्तीच्या लोकमान्यांचे करंदीकर, प्रधान, जोग, ताम्हनकर, पर्वते यासारख्या एकाहून एक दर्जेदार लेखकांनी इंग्रजीतून जीवन रेखाटन करण्यात यश मिळवले. शताब्दीच्या निमित्ताने या जीवन रेखाटणाऱ्यांचा यथोचित गौरवही झाला. या वाङ्मयीन महात्मतेचा चरित्रनायक भारतीय कीर्तीचा होता हे एक कारण असले तरी वरील लेखकांनी चरित्र नायकाचे विविध पैलू दाखविण्यासाठी केलेली जिवापाड मेहनतही त्याला कारणीभूत मानली पाहिजे. इंग्रजीच्या मानाने भारतीय इतर भाषाभगिनींनी केलेले प्रयत्न किरकोळ आणि फुटकळ स्वरूपाचे समजले पाहिजेत. प्रसिद्ध झालेल्या बहुतेक पुस्तकांची प्रतवारी मुलांसाठी, कुमारांसाठी अशासारखी आहे. रवींद्र विवेकानंदांवर ज्या प्रमाणात स्वतंत्र प्रकाशनांचा इंग्रजीतून आणि विशेषतः बंगालीतून पाऊस पडला तसा वाटा लोकमान्यांच्या वाटी आला नाही. रवींद्र–विवेकानंदांवर अनूदित वा स्वतंत्रपणे इतर भारतीय भाषातूनही आलेले पीकही कमी नाही. तुलनात्मक दृष्ट्या लोकमान्यांवर मराठीतूनही शताब्दिवर्षाच्या निमित्ताने तसा पाऊसही पडला नाही, किंवा पुस्तकांचे नवीन पीकही आले नाही. भारतीय कीर्तीचे दुसरे महाराष्ट्राने दिलेले भारतीय नेते आहेत आचार्य विनोबा! विनोबांचे वाङ्मय भारतीय चौदाही भाषातून अनूदित होत असते. त्या दृष्टीने पवनारच परंधाम अक्षरशः पर धाम बनले आहे यात शंका नाही. याचा मराठी भाषिकांना अभिमान वाटावा. दुर्दैवाची गोष्ट अशी की त्याच विनोबांचे वाङ्मय न विकवना मराठी भाषिक सहन करताना दिसतात. 'तुझे आहे तुजपाशी' मधील आचार्यांचा तोंडवळा असणाऱ्यांना ते स्वतंत्रपणे सांगायला नको. संत, पंत जंत यापासून प्रथम महाराष्ट्राला सोडवले पाहिजे असा आक्रोश एका नामवंत पत्रकाराने केलेला वाचकांच्या ध्यानात असावयास हरकत नाही. भारतीय कीर्तिमुळे या नेत्यांच्या वाङ्मयाला भारतभर थोडाफार वाचक मिळाला. अपवादात्मक असणारी ही दोन उदाहरणे बाजूला ठेवली तर इतर वाङ्मयीन बाबतीत मराठीचे पाऊल कुठपर्यंत पोचले आहे बरे?

वस्तुतः भारतीय वाङ्मयात अभिमान वाटावा अशी मराठी वाङ्मयात पुष्कळ ठिकाणे आहेत. मराठीचा संदर्भग्रंथ पुरसा परिपुष्ट आहे. विविध विषयात

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तयार झालेले आणि होत असलेले संदर्भग्रंथ तिच्या गंगाजळीत प्रत्यही भर घालीत आहेत. मराठीची ऐतिहासिक संदर्भसाधने खास मराठीची आहेत. मराठीचे टीकाशास्त्र सकस आणि कणखर आहे. चरित्रविषयक ग्रंथ कोणत्याही भारतीय भाषाभगिनी-पेक्षा मराठीत अधिक आहेत यावर अनेक लोकांचा विश्वासच बसणार नाही. मराठीतील नाट्य लेखनाचा हात कोणतीहि भारतीय भाषाभगिनी धरू शकणार नाही एवढे मराठीचे नाटक समृद्ध आहे. बंगालमधील 'संतु' या एकाच नाटकाचा १००० वा प्रयोग नुकताच विश्वरूपाने साजरा केला तथापि हजारो नाटके साहित्यात वावरली आहेत असे म्हणणे मराठीलाच शक्य आहे.

एवढे असून **अडखळते कुठे ?** लो. टिळकांनंतर भारतरत्न कर्वे यांची शताब्दि साजरी झाली. आगरकरांची शताब्दी टिळकांच्या शताब्दीच्या झगझगाटापुढे महाराष्ट्रातच विरून गेली. इतर प्रांतांनी आगरकरांना नावाने तरी ओळखले आहे कि नाही इतका सन्देह निर्माण व्हावा इतकी स्थिति ! महर्षि कर्वे यांना 'भारत रत्न' हा भारतीय सर्वोच्च किताब दिल्याबद्दल नाके मुरडणारे लोकच इतर भाषाभगिनींनी पाहिले. कलकत्याच्या वृत्तपत्रांनी तर 'भारतरत्न' ही पदवी अशा अप्रसिद्ध माणसाला देऊन तिची मान-मान्यता, सन्मान इतकी स्वस्त करू नये असा स्पष्ट इशारा देण्यासही कमी केले नाही. शताब्दीच्या निमित्ताने कर्व्यांबद्दलचे वाङ्मय वा त्यांच्या कार्याविषयी गौरवोद्गार काढण्याचे बाजूलाच राहिले. या उलट मराठी वाङ्मयात रवींद्र-शरच्चन्द्र-विवेकानंदांच्या मूळ पुस्तकांची भाषांतरे, तत्संबंधी समीक्षणात्मक लेखन करण्याचे नुसत पेवच फुटले आहे. श्री शिवनारायण रे यांच्या टीकात्मक मूळ लेखाचे मराठीत भाषांतर करून ते नवभारताने प्रसिद्ध करून रवीन्द्रांच्या वाङ्मयाचे पेव कसे फुटत जाणार आहे याचे एक उत्कृष्ट चित्र वाचकांपुढे ठेवले होते. १९६४ साल हे हरिभाऊ आपटे या मराठीच्या आद्य थोर कादंबरीकार कलावंताच्या शताब्दीचे वर्ष म्हणून साजरे व्हावयाचे आहे म्हणून जाहीर झालेले आहे. विचार करण्यासारखी गोष्ट अशी की मराठी वाङ्मयात वा मराठी ग्रंथ निर्मितीत हरिभाऊ संबंधी फारसे लिहिले जात आहे वा लिहिले जाणार आहे असे दृष्टोत्पत्तीस येत नाही. रवीन्द्रांचे समग्र वाङ्मय बारा खण्डात प्रसिद्ध होणार आहे. ज्यांना प्रत हवी असेल त्यांनी रु. ७५ देऊन नाव नोंदवावे म्हणून बंगाल सरकारने जाहिरात फडकवली मात्र मूळ पंचवीस हजार प्रतींची योजना सरकारला पन्नास हजाराचे वर न्यावी लागली आणि एवढे करूनही हे रवीन्द्र समग्र वाङ्मयखण्ड खुल्या बाजारात मिळत नाहीत. मराठीतील हरिभाऊंचे समग्र वाङ्मय एकत्र छापण्याची अशीच टूम महाराष्ट्रात निघाली आहे असे वृत्तपत्रांवरून कळते. त्याचे काय होणार आहे हे लवकरच कळून येईल. खुद्द मराठी भाषिकच ह्या शताब्दीसंबंधी म्हणावे तितके उत्सुक दिसत नाहीत तर इतर भाषाभगिनींतील साहित्यिकांनी त्यांच्या बद्दलचे कितीसे कौतुक दाखवावे ?

प्रेमचंद, हरिश्चंद्र, सुब्रम्हण्यभारती, बंकिमचंद्र, वल्लतोल या लेखकांची नावे त्या त्या भाषेच्या बाहेरही ज्ञात होण्यास त्या त्या भाषाभगिनींच्या साहित्यिकांनी त्यांचे संबंधी इतर भाषातून लेखन करून वाङ्मयीन जागृति निर्माण करण्याचे महत्कार्य केले व सध्याही ते कार्य चालू ठेवले आहे. मराठी माणूस महाराष्ट्रा-बाहेर पडला की महाराष्ट्र सारस्वताला विसरतो, तो इतरांची मर्जी सम्पादन करण्यासाठी त्या त्या भाषांतील वाङ्मयीन श्रेष्ठ पुरुषांची तोंड फाटेपर्यंत स्तुति करीलही पण मातृभाषेतील श्रेष्ठ कलावंतांसंबंधी चकार शब्द उच्चारणार नाही. लोकांना त्यांच्या रोजच्या भाषेत थोर पुरुषांसंबंधी सांगितल्या शिवाय कळावे कसे ? माहितीच्या अभावी लोक अज्ञानसागरात डुंबत राहिले तर त्यात नवल कोणते आणि त्यात लोकांचा दोष कसा समजावा ? दोषच असेल तर तो मराठी ताठरवृत्तीचा ! चांगल्याला चांगले म्हणायचे नाही पण जरासे चुकले तरी निःस्पृहपणाच्या नावाखाली त्या चुकीला भर रस्त्यावर आणून तिची अवहेलना करावी, टिंगल-कुचेष्टा करून जीव नकोसा करून टाकीपर्यंत ती ताणणाऱ्या वृत्तीचा दोष समजायला हवा. परप्रांतात स्थायिक झालेल्या आणि तेथील भाषेवर प्रभुत्व मिळवलेल्या शिक्षित-सुसंस्कृत-बहुभाषी जाणत्यांनी वस्तुतः हे ऋषिऋण म्हणून आपखुषीने

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काम स्वीकारावयास हवे पण सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे देवाणापेक्षा घेवाणाकडेच मराठी सांस्कृतिक निष्ठा अधिक प्रेमाने पाहात असल्याने जाणते लोक केवळ मंत्रमुग्ध होऊन वाट पहात बसले असावेत ! ती वेळ केव्हा येते त्या वेळेची !

वाङ्मयशास्त्रेतील नोबेल पारितोषिक मिळण्याइतके तेज आणि नाविन्य रवीन्द्रनाथांच्या लेखणीतच होते, असे आग्रहाने प्रतिपादन करणारा आणि समजणारा वर्ग बंगालमध्ये आणि भारतातही बराच मोठा आहे. इंग्रजीतून आपल्या वाङ्मयाचे भाषांतर करून–करवून ते जगाच्या वेशीवर टांगण्यात यश मिळवण्याइतके दूरदृष्टीचे कल्पक लेखक रवीन्द्रनाथ होते, त्यांच्याइतके किंबहुना काकणभर अधिकही तेज आणि नाविन्य असणारे इतर भाषाभगिनींचे सुपुत्र केवळ प्रसिद्धिपराङ्मुख राहिल्याने जगाच्या वेशीवर राहोच स्वतःच्या भाषाभगिनींपुढे पुरेशी प्रसिद्धि मिळवून निर्वाह करू शकले नाहीत. ज्याच्या हाती ससा तो पारधी ! असा विचार बोलून दाखवणाराही वर्ग लहान प्रमाणात आहे. या दोन परस्पर पोषक नसलेल्या विचारसरणीतील मर्म लक्षात घेतल्यास एक गोष्ट सहज लक्षात येते. उत्पादनाबरोबर त्याला बाजारपेठ उपलब्ध करून दिली नाही तर स्वतूला इष्ट भाव मिळू शकत नाही.

रवीन्द्रांच्या कल्पकतेमुळे त्यांना योग्य ते बक्षिस मिळाले हे उचित असेच झाले. या उदाहरणावरून इतर भारतीय भाषाभगिनींच्या मातबर साहित्यिकांनी जो एक शोधान्ती बोध घ्यावयास हवा होता तो घेतला गेला नाही याचाच थोडासा खेद होतो. मराठी भाषा आणि साहित्य एका आगळयाच श्रेष्ठ दर्जाचे आहे अशा भाबड्या वृत्तीत राहून जसे चालणार नाही तसेच बंगाली इतके श्रेष्ठ दर्जाचे साहित्य इतर भारतीय वाङ्मयात अजून व्हावयाचे आहे अशा भ्रान्त आणि विपर्यस्त समजुती उराशी घट्ट धरून बसणेही तितकेच अयोग्य आहे.

"The unsophisticated monolingual is more apt to falsely assume that everything he thinks is entirely his own and is universal, final and correct than the person who has studied and learned a foreign language"– R. Laho.

जादवपूर युनिर्सिटीने 'तुलनात्मक साहित्य' (Comparative literature) नावाची एक विद्याशाखा उघडली आहे. एम्. ए. च्या या विषयाच्या अभ्यासूंना इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, जपानी, रशियन वगैरे भारतीयेतर वाङ्मयीन कलाकृतीचा अभ्यास करण्यास लागणारा पुरेसा सन्दर्भग्रन्थ उपलब्ध होत असल्याने भारतीय साहित्याला स्पर्श न करताही उपाधीची प्राप्ति करून घेता येते. परकी साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासावर उपाधि मिळवून समाजात येणारे स्नातक भारतीय साहित्याकडे आपुलकीने न पाहता भारतीय साहित्य त्या श्रेष्ठ कलाकृतीच्या दर्जापर्यंत पोंचलेच नाही अशा सुखद गैरसमजुतीत वावरताना दिसतात. साहित्य अकादमी त्या त्या भाषेतील उच्च दर्जाच्या साहित्याला पारितोषिक देऊन गौरव करते. तथाविध उच्च दर्जाचे साहित्य त्या त्या भाषिकांच्या चाळणीतून येते आणि मगच पारितोषिक दिले जात असले तरी त्यामुळे भाषाभगिनींना परस्पर तुलना करण्याचे दृष्टीने याचा विशेष उपयोग होत नाही. तुलनात्मक अभ्यासासाठी पुरेशी सामग्री इंग्रजीतून पुढे आलेली नाही. बंगाली, गुजराथी, तेलुगु, तमीळ व हिन्दी भाषांच्या ललित वाङ्मयाचे इतिहास थोड्या प्रमाणात तरी इंग्रजीतून सांपडतात. प्रि. भाव्यांनी लिहिलेले पुस्तक वगळले तर मराठी वाङ्मयाची महती आणि माहिती मराठीयेतर भाषिकांना मिळेल–कळेल असा ग्रंथ मराठीने तयार केला नाही. वाङ्मयीन इतिहासाचे उत्कृष्ट उदाहरण उर्दूचे दाखविण्यासारखे आहे. हा इतिहास लिहिला आहे तो एका बाईने ! अख्तार बानू सुन्हावर्दीने केवळ उर्दूच्या कथा लघुकथांच्या शैलीचे शर्म वर्म निवेदन करून लंडन युनिव्हर्सिटी मार्फत पीएच्. डी. मिळवली. तो निबंध प्रसिद्ध करून वाङ्मयीन इतिहासाचा एक मानदंडच स्थापित केला म्हणाना !

परकीयांना आपल्या साहित्याचा ठावठिकाणा नीट उलगडून देणारा इंग्रजीतून लिहिलेला मराठी वाङ्मयीन इतिहास उपलब्ध नाही. एवढेच नव्हे तर परकीयांना मराठी भाषा शिकायची असली तर ती इंग्रजीतून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शिकवणारे एखादेही उत्कृष्ट पुस्तक नाही. याची दाद महाराष्ट्रातील सांस्कृतिक आणि शैक्षणिक संस्थांनी घ्यावयास हवी. लंडनमधल्या लॅम्बर्ड बाईंनी एक क्रमिक पुस्तक वर्णनात्मक भाषाशास्त्राच्या आधाराने लिहून ठेवलेले अपवादात्मक पुस्तक ! या पुस्तकावरून मराठी भाषा शिकणाऱ्यांना आलेच तर मिशनऱ्यांची मराठी भाषा येईल. यापेक्षा अधिक अपेक्षा त्या पुस्तकाकडून करता येत नाही. मराठी भाषा शिकणाऱ्यांना La formation of de La Langue Marathi हे पुस्तक तर अभ्यासाला देऊन भागणार नाही ! या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रा. परांजपे यांनी केले आहे; तर त्याचा समावेश विश्वविद्यालयाने आपल्या यादीतही केला नसल्याने मराठीच्या उच्च भाषाभ्यासकांना ते हाती लागतच नाही म्हणे. आणि इंग्रजी अनुवाद करून देऊनही त्याला प्रकाशक मिळत नाही अशी त्या पुस्तकाच्या इंग्रजी अनुवादकांनी केलेली सत्य पण कठोर, तक्रार माझ्या दप्तरी आहे.

मराठी भाषिकांनी महाराष्ट्राबाहेर वास्तव्य करणाऱ्या मराठी भाषिकांच्या पुढच्या या समस्यांचा विचार करावयास हवा. भाषा, साहित्य आणि संस्कृति यांचा परस्पर संबंध लक्षात घेता त्यातील उणिवा कमी करण्याचा प्रयत्न करणे हे तर आपले काम आहे. या दृष्टीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने पुढाकार घेऊन परकीयांना मराठी शिकण्यासाठी अधिकृत मराठी क्रमिक पुस्तके, तुलनात्मक अभ्यासास अवश्य असा मराठी वाङ्मयाचा इंग्रजीतून अधिकृत इतिहास, मराठी साहित्य आणि संस्कृति यांची माहिती आणि महती परकीयांना करून घ्यावयाची असल्यास तत्संबंधीची अधिकृत प्रकाशनेही प्रसिद्ध करावयास हवीत.

प्राज्ञपाठशाळा–मण्डळ-ग्रंथमाला

धर्मकोश

संस्कारकाण्ड

भाग १ ला

सुपररॉयल साइज, पृष्ठसंख्या ९००, किंमत ४५ रु.

संस्कारकाण्डाचा प्रथम भाग प्रकाशित झाला आहे. या भागांत संस्कारांसंबंधी सामान्य विचार, गोत्र, प्रवर व सापिण्डय यांसंबंधी विस्तृत शास्त्रार्थ, विवाहकाल, विवाहाचे प्रकार इत्यादि विषय आलेले आहेत. धर्मशास्त्राचें आधुनिक पद्धतीनें संशोधन करणाऱ्या संशोधकांस व प्राचीन पण्डित–याज्ञिक यांसही हा भाग अत्यंत उपयुक्त असल्यामुळें संग्राह्य आहे.

मिळण्याचें ठिकाण– प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

[जि० सातारा,]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

डॉ. वा. वि. मिराशी

राष्ट्रकूट नृपति अविधेय याचे पांडरंगपल्ली दानपत्र

खिस्तोत्तर तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास सातवाहन राजांचे महाराष्ट्रातील राज्य नष्ट झाले. त्यानंतर बदामीच्या चालुक्यांचा अंमल सातव्या शतकात दक्षिण महाराष्ट्रात बसण्यापूर्वी तेथे कोणाचे राज्य होते याविषयी काही माहिती नव्हती. या काळात उत्तर महाराष्ट्रात आभीर राजांचे राज्य झाले. या वंशाचा आद्य नृपति माढरीपुत्र ईश्वरसेन याचा कोरीव लेख नाशिकच्या पांडव लेण्यात आढळला आहे. सातवाहनानंतर उदयास आलेल्या राजवंशांची नावे पुराणातील वंशावळीत दिली आहेत. त्यामध्ये आभीराचा उल्लेख आहे. दहा आभीरांनी ६७ वर्षे राज्य केले असे बहुतेक पुराणात म्हटले आहे. ते खरे असल्यास एका राजास वाटणीस सुमारे साडेसहा वर्षे येतात. ही सरासरी फारच कमी आहे. तेव्हा वायुपुराणाच्या एका हस्तलिखितात म्हटल्याप्रमाणे आभीरांनी १६७ वर्षे राज्य केले असावे. त्यांनी स्थापिलेला संवत् पुढे कलचुरि व चेदि या नावांनी प्रसिद्ध झाला आणि तो सुमारे हजार वर्षे प्रचारात राहिला. या संवताचे आरंभीचे लेख उत्तर महाराष्ट्र, कोकण, गुजराथ आणि अनूप देश (महेश्वरजवळचा प्रदेश) यात सापडले आहेत. पुराणात आभीर राजांची संख्या दिली आहे, पण नावे दिली नाहीत. तथापि कोणत्याही संवताचा प्रसार सामान्यतः राजसत्तेमुळे होतो हे लक्षात घेतले असता आभीरांचे साम्राज्य वरील सर्व प्रदेशात पसरले होते असे अनुमान करण्यास हरकत नाही.

मागे सांगितल्याप्रमाणे आभीरांचे राज्य उत्तर महाराष्ट्रांत १६७ वर्षे म्हणजे खिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या आरंभापर्यंत टिकले. त्यानंतर तेथे त्रैकूटकांचे राज्य झाले. विदर्भात वाकाटक राजवंशाचा उदय होऊन त्याचे राज्य खिस्तोत्तर २५० ते ५०० पर्यंत अडीचशे वर्षे टिकले. पण दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर, सातारा, पुणे, सोलापूर या प्रदेशांत या काळात कोणाचे राज्य होते या विषयी काही माहिती नव्हती. गेल्या पंचवीस तीस वर्षांत प्रसिद्ध झालेल्या काही ताम्रपटावरून आता बरीच माहिती उपलब्ध झाली आहे.

दक्षिण महाराष्ट्रात राष्ट्रकूटांचे राज्य

तथापि अद्यापिही खिस्तोत्तर २५० ते ३५० या काळातील दक्षिण महाराष्ट्राचा इतिहास अज्ञात आहे. खिस्तोत्तर ३५० च्या सुमारास तेथे एका राष्ट्रकूट वंशाचे राज्य स्थापन झाले. या घराण्याचा मूळ पुरुष मानाङ्क याने मानपुर नामक नगर स्वतःच्या नावे स्थापून तेथे आपली राजधानी केली. या घराण्याचे एकूण तीन ताम्रपट आतापर्यंत सापडले आहेत. त्यापैकी पहिला ताम्रपट डॉ. भाऊ दाजी यांच्या संग्रहात होता. तो कोठे मिळाला याविषयी काही माहिती नाही. डॉ. भाऊ दाजी यांच्या निधनानंतर पं. भगवानलाल इंद्रजी यांनी तो रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या जर्नलमध्ये (व्हॉ. १६, पृ. ८८ इ.) प्रसिद्ध केला. त्यात खालील वंशावळ दिली आहे —

मानांक
|
देवराज
|
(अनिर्दिष्ट) — (अनिर्दिष्ट) — भविष्य
|
अभिमन्यु

या ताम्रपटात राष्ट्रकूटवंशी अभिमन्यु याने मानपुर येथे राहत असता उंडिकावाटिका नामक गाव पेठपंगरक येथील दक्षिण शिवाचा (पुजारी) संन्यासी जटाभार यास दान दिला होता. याला उंडिकवाटिका दानपत्र असे नाव दिले आहे. हा ताम्रपट कोठे सापडला याची नक्की माहिती नसल्याने मानपुर, उंडिकवाटिका, पेठपंगरक आणि दक्षिणशिव देवाचे स्थान याविषयी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

विविध प्रकारचे तर्क पंडित भगवानलाल इंद्रजी व डॉ. फ्लीट यांनी केले होते. पं. भगवानलाल यास मानपुर हे पुढे राष्ट्रकूटांची राजधानी झालेले मान्यखेट वाटले तर फ्लीटने ते माळव्यातील किंवा पूर्वीच्या रेवासंस्थानातील मानपुर असावे असा तर्क केला.[1] दक्षिणशिवाचे देवालय मध्यप्रदेशाच्या होशंगाबाद जिल्ह्यातील महादेव डोंगरातील सुप्रसिद्ध शिवायतन असावे असाही फ्लीटचा तर्क होता. त्याप्रदेशात या महादेवाची शिवरात्रीची जत्रा अद्यापि पंढरपूरच्या यात्रेप्रमाणे मोठ्या प्रमाणात चालू आहे. फ्लीटच्या मते पेठपंगरक हे मध्य प्रदेशातील पचमढी जवळचे पगार आणि उंडिकावाटिका हे महादेव डोंगरापासून वायव्येस तीस मैलावरचे ऊंटिया असावे. याप्रमाणे या मानपुरच्या राष्ट्रकूटांचे राज्य मध्यप्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्याच्या परिसरात असावे असा फ्लीटचा ग्रह झाला. हा ताम्रपट पुढे डॉ. हुल्श याने एपिग्राफिया इंडिका व्हॉ. ८ पृ. १६३ इ. वर प्रसिद्ध केला.

पांडरंगपल्ली दानपत्राची उपलब्धि

यानंतर सन १९२८ च्या सुमारास प्रस्तुत पांडरंगपल्ली दानपत्र कोल्हापूर जवळच्या कोरोची नामक खेड्यात सापडले. ते श्री. पी. डी. उपाध्ये यांच्या मार्फत राजाराम कॉलेजातील प्रा. कुन्दनगार यांच्या हाती आले. त्यांनी ते सेंट झेव्हियर कॉलेजचे रे हेरास यांचेकडे पाठविले. रे. हेरासनी ते म्हैसूरच्या पुरातत्त्वखात्याचे प्रमुख डॉ. कृष्ण यांस पाठविले आणि शेवटी ते त्या खात्याच्या सन १९२९ च्या रिपोर्टात (पृ. १९७–२१० वर) प्रसिद्ध झाले. डॉ. कृष्णांना या दानपत्राचे वाचन नीट करता आले नाही. त्यांनी यातील काही स्थलनामे चुकीची वाचली; शिवाय त्यांनी या राजवंशांचा संबंध छत्तीसगडातील शरभपुरच्या राजवंशाशी जोडून खिस्तोत्तर सहाव्या शतकात या मानपुराच्या राष्ट्रकूटाचे साम्राज्य छत्तीसगड, उत्तर महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्र या विशाल प्रदेशावर होते आणि त्यांचा पराभव केल्यावर बदामीचा द्वितीय पुलकेशी हा तीन महाराष्ट्रांचा स्वामी झाला अशी उपपत्ति इंडियन् हिस्टरी कॉंग्रेसच्या सन १९४३ च्या अधिवेशनात पुढे मांडली. तिचे परीक्षण डॉ. अ. स. अळतेकरांनी भांडारकर ओरीएंटल रीसर्च इन्स्टिट्यूटच्या ॲनाल्स्‌मध्ये (व्हॉ. २४, पृ. १४८ इ.) एका लेखात केले आणि बदामीच्या चालुक्यांच्या उदयापूर्वी महाराष्ट्रात राष्ट्रकूटांचे साम्राज्य नसून तेथे नल, मौर्य, कलचुरि, कदंब इत्यादि राजवंश राज्य करीत होते असे प्रतिपादिले.

डॉ. अळतेकरांच्या लेखाने माझे या दानपत्राकडे लक्ष गेले आणि मी त्याचा प्रसिद्ध झालेल्या छापावरून अभ्यास करून भांडारकर इन्स्टिट्यूटच्या ॲनाल्समध्ये (व्हॉ. २५, पृ. २५ इ.) 'मानपुरचे राष्ट्रकूट' या शीर्षकाचा लेख लिहिला. या लेखात डॉ. कृष्णांच्या वाचनातील अनेक चुका दाखवून देऊन खिस्तोत्तर सहाव्या शतकात महाराष्ट्रात विशाल राष्ट्रकूट साम्राज्य होते, ही त्यांची कल्पना कशी निर्मूल आहे हे दाखविले होते. तसेच बदामीच्या चालुक्यांच्या उदयापूर्वी महाराष्ट्रात राष्ट्रकूटांचे राज्यच नव्हते हे डॉ. अळतेकरांचे विधानही बरोबर नसून त्या काळी कृष्णा नदीच्या खोऱ्यात राष्ट्रकूट नृपति मानाङ्क याचे वंशज राज्य करीत होते, ते वाकाटकांचे समकालीन होते आणि त्यापैकी एका राजाच्या दरबारी कालिदासाला चन्द्रगुप्त विक्रमादित्याने दूत म्हणून पाठविले होते हे साधार दाखविले होते. माझा या विषयावरील इंग्रजी लेख माझ्या Studies in Indology, Vol. I pp. 178f मध्ये आणि मराठी लेख संशोधनमुक्तावलि, सर २, पृ. ९५–१०३ मध्ये असे पुनर्मुद्रित झाले आहेत. तथापि डॉ. कृष्णांच्या चुकीच्या वाचनावर आधारलेली अनुमाने अद्यापि मधून मधून विद्वानांच्या लेखात आढळतात. म्हणून त्या ताम्रपटाचे समग्र शुद्धवाचन प्रसिद्ध करणे अवश्य होते. डॉ. कृष्णांच्या लेखाबरोबर प्रसिद्ध झालेले छाप तितकेसे चांगले नव्हते. म्हणून मूळ ताम्रपट मिळवून तो समग्र वाचून उत्कृष्ट छापासह प्रसिद्ध करावा अशी माझी इच्छा होती. प्रो. कुंदनगार यांच्याकडे तपास करता तो ताम्रपट कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणगले तालुक्यातील कोरोची येथे सापडला होता अशी माहिती मिळाली. परंतु त्या ताम्रपटाचा पत्ता लागेना. मी अनेक मित्रांमार्फत तो मिळविण्याचा प्रयत्न गेल्या १०।१५ वर्षे

१. इंडियन ॲंटिक्करी, व्हॉ. १८, पृ. २३३.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

करीत होतो, पण त्यास यश आले नाही. शेवटी माझे मित्र कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातून अलीकडे सेवानिवृत्त झालेले डॉ. ए. एन्. उपाध्ये यांना तो कोरोची येथे कै. नरसगोंडा भीमगोंडा पाटील यांच्या पत्नी श्रीमती चित्राबाई यांच्याकडे मिळाला आणि त्यांनी तो मजकडे पाठविला. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. नागपूरच्या केंद्र संग्रहालयाचे क्यूरेटर श्री. वि. प्र. रोडे यांनी त्याचे उत्कृष्ट फोटो काढून दिले. त्यावरून सोबतचे छाप तयार केले आहेत. हा ताम्रपट अत्यंत निष्काळजीपणाने घसीटी लिपीत लिहिला असून घर्षणाने काही बाजूंनी अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. त्यांचे वाचन करणे दुर्घट काम होते. त्या कामात येथील सेवानिवृत्त गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट श्री एन्. एल्. राव यांचे सहाय्य झाले आहे. या सर्व मित्रांचा मी फार आभारी आहे–

ताम्रपटाचे वर्णन

प्रस्तुत ताम्रपटाचे तीन पत्रे असून त्यांवर भिन्न काळी दोन लेख कोरले आहेत. पहिला लेख पहिल्या पत्राची आतली बाजू, दुसऱ्या पत्राच्या दोन्ही बाजू आणि तिसऱ्या पत्राचा आतील बाजू यावर कोरला असून त्याच्या एकूण २९ ओळी आहेत. दुसरा लेख तिसऱ्या पत्र्याच्या बाहेरच्या बाजूवर कोरला असून त्याच्या फक्त अडीच ओळी आहत. पत्र्यांची लांबी ७·८ इंच आणि रुंदी ३·६ इंच आहे. हे पत्रे एका वर्तुळाकार सुमारे २·५ इंच व्यासाच्या कडीत अडकवले असून त्या कडीचा मध्यभाग चपटा करून त्यावर पुढला पाय उंच डावीकडे तोंड करून उभा राहिलेल्या सिंहाची आकृति आहे.

या पत्र्याच्या कडा जाड केल्या नव्हत्या आणि वाकवल्याही नव्हत्या. त्यामुळे काही ठिकाणी, विशेषतः दुसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवर, काही अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. त्यातील काही मोठ्या प्रयासाने वाचता आली, पण इतर काही वाचणे अशक्य झाले. याशिवाय लेखकाने किंवा कोरक्याने ताम्रपटावरील लेख अत्यंत निष्काळजीपणाने लिहिला किंवा कोरला असल्याने काही ठिकाणी त्याचे वाचन संदिग्ध आहे. तथापि त्याच्या एकंदर अर्थाविषयी संदेह नाही.

दानपत्राची लिपी व भाषा

या ताम्रपटावरील लेखाची लिपी कीलशीर्षक (Nail headed) प्रकाराची आहे. बऱ्याच अक्षराच्या डोक्यावर खाली टोक असलेला त्रिकोण दिसतो, पण इतर ठिकाणी त्याच्या ठिकाणी नागरी लिपीतल्या प्रमाणे आडवी लहान शिरोरेषा दिसते. काही अक्षरे घसीटी लिपीत लिहिल्यामुळे ओळखू येत नाहीत.

प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून त्याचा काही भाग पद्यात व इतर गद्यात आहे. रेफानंतर येणारे व्यंजनाचे काही ठिकाणी द्वित्व झाले आहे, एवढाच लेखनविशेष उल्लेखनीय आहे.

पूर्वकालीन राष्ट्रकूटांची वंशावळ

प्रस्तुत दानपत्र मानाङ्काचा नातू आणि देवराजाचा पुत्र अविधेय याने दिले होते. यात या राजवंशाचे नाव आले नाही, पण उंडिकवाटिका दानपत्रात ते राष्ट्रकूट म्हणून आले आहे. त्या दानपत्रातील वंशावळ मागे दिली आहे त्यावरून ह्या दोन दानपत्रात मानाङ्क आणि देवराज ही दोन राजनामे समान आहेत हे ध्यानात येईल. उंडिकवाटिका दानपत्रात देवराजाच्या दोन पुत्रांची नावे अनिर्दिष्ट होती त्यांपैकी एक अविधेय होता हे प्रस्तुत ताम्रपटावरून समजले. राहिलेल्या तिसऱ्या पुत्राचे नाव माण ऊर्फ विभुराज होते हे काही वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या दौंड जवळच्या हिंगणी बेरडी गावी सापडलेल्या ताम्रपटावरून ज्ञात झाले आहे[२]. तेव्हा या पूर्वकालीन राष्ट्रकूट वंशाची वंशावळ खालील प्रमाणे जुळविता येते–

मानाङ्क
|
देवराज
|
माण ऊर्फ विभुराज — अविधेय — भविष्य
भविष्य
|
अभिमन्यु

राष्ट्रकूट मानाङ्क याचे वर्णन

प्रस्तुत ताम्रपटात या वंशाचा मूळपुरुष मानाङ्क याचे वर्णन ' सविदर्भाश्मकविजेता आणि ' श्रीमत्कुन्त-

२. एपि. इंडिका. व्हॉ. २९, पृ. १७४ इ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लानां प्रशासिता ' या दोन विशेषणांनी केले आहे. पहिल्या विशेषणाचा अर्थ स्पष्ट आहे. त्यात मानाङ्काने विदर्भ व अश्मक या दोन देशांवर मिळविलेल्या विजयाचा उल्लेख आहे. यापैकी विदर्भ हा देश सुप्रसिद्ध आहे. त्याचा विस्तार उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरीपर्यंत आणि पश्चिमेस ऋषीक (खानदेश) पासून पूर्वेस दक्षिण कोसल (छत्तीसगड) पर्यंत होता. यातील दक्षिणेकडच्या-वत्सगुल्म राजधानी असलेल्या वाकाटकांच्या शाखेच्या अमलाखालच्या भागाला अश्मक म्हणत असे एका विद्वानाने प्रतिपादिले आहे पण ते चूक आहे. वत्सगुल्माच्या परिसरातील प्रदेश विदर्भातच अंतर्भूत होत होता हे राजशेखराच्या काव्यमीमांसेतील (दलाल द्वारा संपादित आवृत्ति, पृ. १०) 'तत्रास्ति मनोजन्मनो देवस्य क्रीडावासो विदर्भेषु वत्सगुल्मं नाम नगरम् ' या वचनावरून स्पष्ट आहे. अश्मक देशात गोदावरीच्या दक्षिणेचा—अहमदनगर व बीड या जिल्ह्यातील-प्रदेश मोडत होता असे पाली वाङ्मयातील उल्लेखावरून दाखविता येते. सुत्तनिपातात म्हटले आहे की गोदावरीतीरी अश्मक देशात बावरी नामक ऋषि राहत होता. त्याचे शिष्य उत्तरेत भगवान् बुद्धाला भेटण्याकरिता जाताना प्रतिष्ठानला प्रथम पोचले. (सुत्तनिपात पारायणवग्ग, वत्थुगाथा, ५, २ पाहा.) यावरूनही अश्मक देश विदर्भात नसून गोदावरीच्या दक्षिणेस होता हे स्पष्ट होईल.[३]

मानाङ्काला लावलेले दुसरे विशेषण ' श्रीमत्कुन्तलानां प्रशासिता ' हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचा सरळ अर्थ 'समृद्ध अशा कुन्तल देशावर राज्य करणारा' असा आहे. पण एका विद्वानाने मुद्दाम वेड पांघरून ' समृद्ध कुन्तल देशातील लोकांना शासन करणारा ' असा अर्थ केला आहे.[४] पण तो चूक आहे. संस्कृतात शास् (किंवा प्रशास् या धातूचे (१) राज्य करणे आणि (२) शासन करणे असे दोन अर्थ होतात खरे, पण त्यापैकी पहिला अर्थ जेव्हा त्या धातूचे कर्म देशवाचक किंवा राष्ट्रवाचक असते तेव्हा विवक्षित असतो आणि दुसरा जेव्हा ते सजीव प्राणी असते तेव्हा इष्ट असतो. याची हवी तितकी उदाहरणे संस्कृत वाङ्मयातून देता येतील.[५] येथे पहिला अर्थ विवक्षित आहे हे उघड आहे. दानपत्रलेखकाने श्रीमत् हे विशेषण मानाङ्काने जिंकलेल्या विदर्भ व अश्मक या शत्रुदेशांना न लावता ते स्वतःच्या कुंतलदेशाला लावले आहे त्यावरूनही वरील अर्थ सयुक्तिक दिसेल.

कुंतल देशाच्या मर्यादा

मानाङ्क ज्यावर राज्य करीत होता तो कुंतल देश कोठे होता याचा आता विचार करू. सामान्यतः कुंतल म्हणजे उत्तर कानडा जिल्हा- ज्याची राजधानी वैजयंती (हल्लीची वनवासी) होती तो- असे मानण्यात येते, पण प्राचीन काळी कुंतल देशात त्याचा समावेश होत नसून ते नाव कृष्णानदीच्या उत्तर खोऱ्यातील प्रदेशाचे होते हे दाखविता येते. उत्तरकालीन चालुक्य नृपति द्वितीय जयसिंह याच्या वर्णनपर खालील श्लोक पाहा—[६]

विख्यातकृष्णवर्णे तैलस्नेहोपलब्धसरलत्वे ।
कुन्तलविषये नितरां विराजते मल्लिकामोदः ।

या श्लोकातील अनेक शब्दांवर श्लेष आहेत. त्यामुळे त्याचे दोन अर्थ होतात— (१) कृष्णवर्णाबद्दल प्रख्यात असलेल्या आणि तेलाच्या स्निग्धतेने सरळ झालेल्या (युवतीच्या) केशपाशांत मोगरीचा सुवास अतिशय खुलतो; (२) ज्यामध्ये कृष्णवर्णा नामक प्रसिद्ध नदी आहे व तैलप राजा (उत्तरकालीन चालुक्य राजवंशाचा मूळ पुरुष) याच्या विषयींच्या निष्ठेने ज्यातील लोक सद्वर्तनी झाले आहेत अशा

३. हिस्टरी ॲंड कल्चर ऑफ दि इंडियन् पीपल्, व्हॉ. ३, पृ. २००.

४. पूर्वोक्त, व्हॉ. ३, पृ. २००.

५. पहिल्या अर्थाचे स्कन्दगुप्ताच्या गिरनार प्रस्तर लेखातील खालील उदाहरण पाहा— यो मे प्रशिष्यान्निखिलान् सुराष्ट्रान् । (गुप्त इन्स्क्रिप्शन्स् पृ. ६९) येथे ' जो माझ्या सर्व सुराष्ट्राला शासन करील ' हा अर्थ मूर्खपणाचा ठरेल, कारण हे वचन स्कन्दगुप्ताच्या तोंडी घातले आहे. दुसऱ्या अर्थाचे उदाहरण— ' तान् शिष्याच्चोरदण्डेन धार्मिकः पृथिवीपतिः । ' मनुस्मृति, अ. ८, श्लो. २९, पाहा.

६. एपि. इंडिका, व्हॉ. १२, पृ. १५३.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कुन्तल देशात (तैल्पाचा नातू) मल्लिकामोद ऊर्फ जयसिंह अतिशय शोभतो.

वरील श्लोकात कृष्णानदीच्या खोऱ्याचा कुन्तल देशात समावेश होत असे, असे स्पष्ट म्हटले आहे. किंबहुना पुढे कुन्तलदेशाची उत्तरमर्यादा गोदावरी तीरापर्यंत वाढली असे सोड्ढलाच्या (अकरावे शतक) उदयसुन्दरी कथेतील 'कुन्तलेषु तटे गोदावरीति महासरितः प्रतिष्ठानं नाम नगरम्' (पृ. २१) आणि प्रतिष्ठाननगरपरमेश्वरः कुन्तलानामधीश्वरो राजा मलयवाहनो भवान्' (पृ. ८३). या उताऱ्यांवरून स्पष्ट दिसते. दण्डीच्या दशकुमारचरिताच्या 'विश्रुतचरित' नामक आठव्या उच्छ्वासात कुन्तलदेशाधिपति हा विदर्भेश्वराचा प्रमुख मांडलिक होता पण वानवास्य (वनवासीचा राजा) हा विदर्भराजाचा शत्रु असून त्याने विदर्भावर आक्रमण केले होते अशी कथा आली आहे. त्यावरूनही वरील स्थलनिश्चय योग्य दिसेल.

मानपुर राजधानीचा शोध

तेव्हा या राष्ट्रकूट वंशाचा मूळपुरुष मानाङ्क हा कृष्णानदीच्या उत्तर खोऱ्यात राज्य करीत होता हे सिद्ध झाले. प्रस्तुत ताम्रपट कोल्हापूर जिल्ह्यात आणि याच वंशाचा मागे निर्देशिलेला दुसरा एक (हिंगणी-बेरडी) ताम्रपट पुणे जिल्ह्यात सापडला आहे, त्यावरूनही ही गोष्ट स्पष्ट होईल. उंडिकवाटिका ताम्रपटात उल्लेखिलेले मानपुर गाव मानाङ्काने स्थापिले असून ते त्याची राजधानी होते हे उघड आहे. याचा शोध वरील प्रदेशातच केला पाहिजे. तेव्हा मानपुर हे नगर सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्याचे मुख्य ठिकाण माण असावे असे अनुमान करण्यास हरकत नाही.

राष्ट्रकूटांचा काल

आता हे राष्ट्रकूट राजे केव्हा होऊन गेले याचा विचार करू. आतापर्यंत सापडलेल्या त्यांच्या तीनही ताम्रपटात कोणत्याही शकाचा उल्लेख नाही, फक्त त्यांच्या कारकीर्दीचीं वर्षे उल्लेखिली आहेत. तेव्हा त्यांचा काल अन्यप्रमाणावरून ठरविला पाहिजे हे उघड आहे. उंडिकवाटिका दानपत्राचे संपादन करीत असता पं. भगवानलाल इंद्रजींनी त्याच्या अक्षरवटिकेवरून त्याचा काळ खिस्तोत्तर पाचवे शतक हा ठरविला होता. तर फ्लीटच्या मते तो सातव्या शतकाचा उत्तरार्ध होता. पुढे सांगितल्याप्रमाणे प्रस्तुत ताम्रपटात बृहस्पतीच्या द्वादशसंवत्सरचक्रांतील भाद्रपद या संवत्सराचा उल्लेख आला आहे. त्यावरून पं. भगवानलालचे मत ग्राह्य दिसते. कारण या संवत्सरचक्रातील वर्षे दक्षिणभारतात खिस्तोत्तर सहाव्या शतकानंतर उल्लेखिलेली आढळत नाहीत. तेव्हां हे राजे खिस्तोत्तर चौथ्या–पाचव्या, शतकात होऊन गेले असावे असे अनुमान करता येते.

राष्ट्रकूट आणि वाकाटक यांचे संबंध

कुंतलाधिपति राष्ट्रकूट विदर्भाच्या वाकाटक नृपतींचे समकालीन होते. मागे सांगितल्याप्रमाणे मानाङ्काने विदर्भावर जय मिळवला होता. याच्या उलट अजंटा येथील क्रमांक १६ च्या लेण्यात वाकाटकांचा मंत्री वराहदेव याचा लेख आहे त्यात विन्ध्यसेन (किंवा द्वितीय विन्ध्यशक्ति) याने कुन्तलेशाचा पराजय केल्याचा निर्देश आहे.[८] वाकाटक आणि हे राष्ट्रकूट यांची राज्ये एकमेकांना लागून असल्यामुळे त्यांच्यात—सध्याच्या भारतपाकिस्तानातल्याप्रमाणे—वारंवार कटकटीचे प्रसंग उद्भवले असले तर त्यात आश्चर्य नाही. पण पुढे या दोन राजवंशाचे संबंध सुधारलेले दिसतात. कारण ज्येष्ठ वाकाटक शाखेच्या नरेन्द्रसेनाने कुन्तल राजकन्या आज्झितभट्टारिका हिच्याशी विवाह केला होता.[९] पुढे दाखविल्याप्रमाणे या दोन्ही राजवंशास गुप्तनृपति द्वितीयचन्द्रगुप्त याचा आश्रय होता, त्याच्या मध्यस्थीने हे सख्य घडून आले असावे.

कालिदासाचे कुन्तलेश्वरदौत्य

राजशेखराची काव्यमीमांसा,[१०] भोजाचा शृंगार-

७. पूर्वोक्त, व्हॉ. ८, पृ. १६४.

८. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. ३५१.

९. पूर्वोक्त, पृ. ३०६.

१०. काव्यमीमांसा (प्रथमावृत्ति), पृ. ६१–६२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्रकाश[११] आणि सरस्वतीकण्ठाभरण[१२] आणि क्षेमेन्द्राची औचित्यविचारचर्चा[१३] या संस्कृत अलंकारशास्त्रीय ग्रंथांवरून कालिदासाने कुन्तलेश्वरदौत्य नामक ग्रंथ रचला होता असे समजते. औचित्यविचारचर्चेत कालिदासकृत कुन्तलेश्वरदौत्यातून खालील श्लोक अधिकरणाच्या म्हणजे स्थानाच्या औचित्याचे उदाहरण म्हणून उद्धृत केला आहे

इह निवसति मेरुः शेखरः क्ष्माधराणा-
मिह विनिहितभाराः सागराः सप्त चान्ये
इदमहिपतिभोगस्तम्भविभ्राजमानं
धरणितलमिहैव स्थानमस्मद्विधानाम् ॥

या श्लोकातील स्थानौचित्याचे विवेचन करताना क्षेमेन्द्र म्हणतो –

' महाराजाचा दूत माण्डलिक राजाच्या दरबारी गेला असता त्याला आपल्या प्रभूच्या पदवीला अनुरूप अशी मानाची जागा मिळाली नाही. तेव्हा तो कार्यवशात् जमिनीवरच बसला आणि (इतर मानकऱ्यांनी चेष्टा केली तेव्हा) धीरंगभीर स्वराने म्हणतो, 'हे धरणितल शेषफणांरूपी स्तंभांनी निश्चल झालेले असे आसन आहे व हेच आमच्या सारख्यांना योग्य असे स्थान आहे. कारण पर्वतश्रेष्ठ मेरु आणि सात महासागरही याच आसनावर बसले आहेत आणि त्यांच्यासारखीच माझी योग्यता आहे.

हा दूत कोण आणि कोणत्या महाराजाचा दूत म्हणून कोणत्या सामन्ताच्या दरबारी गेला होता याचा उल्लेख क्षेमेन्द्राने केला नाही. पण उपरिनिर्दिष्ट अलंकारविषयक ग्रंथावरून या प्रश्नावर प्रकाश पडतो. त्या ग्रंथात खालील श्लोक आला आहे —

असकलहसितत्वात्क्षालितानीव कान्त्या
मुकुलितनयनत्वाद्व्यक्तकर्णोत्पलानि ।
पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥

[अर्थ– तुझ्यावर (राज्यकारभाराचा) भार टाकून कुन्तलदेशाचा राजा किंचित् हास्याने ज्यांच्यावर कांति पसरली आहे, नयन अर्धमीलित झाल्यामुळे ज्यांच्या कर्णावरची कमले स्पष्ट दिसत आहेत अशी सुरापानाने सुगन्धित झालेली आपल्या प्रियांची मुखे चुंबीत असतो.]

या श्लोकाचा सन्दर्भ देताना भोजाने आपल्या शृंगारप्रकाशात म्हटले आहे– ' तद्यथा कालिदासः ' किं कुन्तलेश्वरः करोति ' इति विक्रमादित्येन पृष्ठ उक्तवान् '। ' असकलहसितत्वात् ' – इत्यादि. (कुंतलेश्वर काय करत असतो हे विक्रमादित्याने विचारले असता कालिदासाने वरील ' असकलहसितत्वात् ' इत्यादि उत्तर दिले.) वरील श्लोकाच्या अर्थाकडे लक्ष देता तोही कालिदासाच्या कुंतलेश्वरदौत्यातून घेतला असावा हे स्पष्ट दिसते. कालिदासाचा रिपोर्ट ऐकून विक्रमादित्याने वरील श्लोकाच्या द्वितीयार्धात किंचित् फरक करून

' पिबतु मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
मयि विनिहितभारः कुंतलानामधीशः ॥ '

म्हणजे ' माझ्यावर (राज्यकारभाराचा) भार टाकून कुंतलेश आपल्या प्रियांची सुरापानाने सुगंधित झालेली मुखे चुंबीत राहो ' असे उत्तर दिले असे राजशेखर आणि भोज यांनी आपापल्या ग्रंथात म्हटले आहे.

कुंतलेश्वराचा शोध

विक्रमादित्य आणि कुंतलेश्वर याबद्दल यापूर्वी विद्वानांनी अनेक तर्क केले आहेत. कालिदासाच्या कालाविषयी अनेक मते प्रतिपादिली असली तरी त्यातील दोनच मुख्य आहेत– (१) तो खिस्तपूर्व सन ५७–५८ मध्ये सुरू होणाऱ्या तथाकथित विक्रमसंवताचा संस्थापक विक्रमादित्य याच्या दरबारी होता आणि (२) तो खिस्तोत्तर सन ३८०–४१३ या काळात होऊन गेलेल्या गुप्तनृपति द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य याच्या आश्रयास होता. यापैकी पहिल्या विक्रमादित्याच्या काळी ही घटना घडली असणे संभवनीय नाही कारण त्या काळी उज्जयिनीच्या विक्रमादित्याचा कुन्तलाधिपाशी काही संबंध आला होता याला पुरावा नाही. किंबहुना खिस्तपूर्व पहिल्या

११. शृंगारप्रकाश (प्रकरणे २१–२२), प्रस्तावना, पृ. २२.
१२. निर्णयसागर आवृत्ति, पृ. १६८.
१३. काव्यमाला, गुच्छ १, पृ. १३९–४०.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शतकात कोणी विक्रमादित्य नृपति माळव्यात राज्य करीत होता यालाही अविवाद्य प्रमाण नाही. त्याच्या नावाने सध्या प्रचलित असलेला संवत् त्याने स्थापला नसून तो कृत नामक राजाने प्रचलित केला होता असे कोरीव लेखांच्या पुराव्यावरून सिद्ध झाले आहे. तेव्हा हे पहिले मत मान्य करता येत नाही.

याच्या उलट गुप्तनृपति द्वितीय चन्द्रगुप्त विक्रमादित्य याचा दक्षिण भारताशी घनिष्ठ राजनैतिक संबंध होता हे सिद्ध करता येते. दिल्ली जवळच्या मेहरौली येथील लोहस्तंभावरील लेखात या चन्द्राच्या (म्हणजे द्वितीय चन्द्रगुप्ताच्या) वीर्यानिलाने त्याच्या निधनानंतरही दक्षिण समुद्र सुवासित झाला आहे असे आलंकारिक वर्णन आहे.[१४] तव्हा वरील घटना त्याच्या काळीच घडून आली असावी.

द्वितीय चन्द्रगुप्त विक्रमादित्याचा मांडलिक असलेला हा कुन्तलेश कोण याविषयी विविध मते मांडली गेली आहेत. मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजचे प्रोफेसर हेरास यांनी हा कुन्तलेश म्हणजे उत्तर कानडा प्रांतात वैजयन्ती (सध्याची वनवासी) येथे राज्य करणारा कदम्बनृपति काकुस्थवर्मन् असावा असे म्हटले आहे.[१५] या राजाच्या तालगुंड येथील शिलालेखात त्याने गुप्त व इतर काही राजवंशांना आपल्या मुली देऊन प्रसिद्धीस आणले असे म्हटले आहे. तेव्हा द्वितीय चन्द्रगुप्ताने या कदम्ब राजाची मुलगी आपल्या मुलाकरिता स्वीकारिली असावी आणि तो विवाहसंबंध जुळवून आणण्याच्या नाजूक कामगिरीवर कालिदासाची योजना केली असावी असा तर्क हेरास यांनी केला होता. पण हे मत संभवनीय दिसत नाही. कारण काकुस्थवर्मन् हा द्वितीय चन्द्रगुप्ताच्या काळानंतर सुमारे पन्नास वर्षांनी होऊन गेला. शिवाय त्याचे राज्य चन्द्रगुप्ताच्या तन्त्राने चालले होते याला पुरावा नाही.

मद्रास युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर कृष्णस्वामी ऐयंगार यांनी याविषयी दुसरेच मत प्रतिपादिले आहे. त्यांच्या मते हा कुन्तलेश वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन असावा.[१६] हा चन्द्रगुप्ताचा दौहित्र– प्रभावतीगुप्तेचा पुत्र–होता. याच्या काळी वाकाटकाच्या दरबारी गुप्तांचे प्रस्थ होते यात संशय नाही. कालिदास काही काळ विदर्भात राहिला असावा असे अनुमान करण्यास बळकट पुरावा उपलब्ध झाला आहे. मेघदूतात शापित यक्षाचे निवासस्थान म्हणून वर्णिलेला रामगिरि वाकाटक राजधानी नन्दिवर्धन पासून केवळ तीन मैलावर आहे. द्वितीय प्रवरसेनाच्या नावावर प्रसिद्ध असलेले सेतुबन्ध हे प्राकृत काव्य विक्रमादित्याच्या आज्ञेने कालिदासाने रचले अशी आख्यायिका त्या काव्याच्या एका टीकाकाराने दिली आहे.[१७] तेव्हा चन्द्रगुप्त–विक्रमादित्याचा दूत म्हणून कालिदास विदर्भात आला असणे असंभवनीय नाही. पण या मतावर मुख्य आक्षेप हा की वाकाटकाचे राज्य कुन्तलदेशावर नव्हते. आणि त्यांनी कुन्तलेश अशी पदवी कधीही धारण केली नव्हती. याच्या उलट त्यांची कुन्तलाधिपतीशी युद्धे होत आणि एकदा तर शरीरसंबंधही झाला होता हे कोरीव लेखावरून सिद्ध झाले आहे. शिवाय गुप्त–वाकाटकांचा घनिष्ठ वैवाहिक व राजकीय संबंध लक्षात घेता प्रथम भेटीच्या प्रसंगी वाकाटक-दरबारी मागे वर्णिला तसा कालिदासाचा अपमानही झाला असणे संभवनीय नाही.

कुन्तलेश्वर म्हणजे राष्ट्रकूट देवराज

कुन्तलेशाविषयीची वरील दोन्ही मते प्रस्तुत लेखकाने राष्ट्रकूटांचे राज्य दक्षिण महाराष्ट्रात खिस्तोत्तर चौथ्या-पाचव्या शतकात होते हे सिद्ध करण्यापूर्वीची आहेत. त्यांचे राज्य कुन्तल देशावर होते हे प्रस्तुत ताम्रपटातील राष्ट्रकूटनृपति मानाङ्क याच्या 'श्रीमत् कुन्तलानां प्रशासिता' या विशेषणावरून निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. तेव्हा चन्द्रगुप्ताने ज्या कुन्तलेशाकडे कालिदासाला दूत म्हणून पाठविले होते तो या राजकूट वंशातला असला पाहिजे. मानाङ्क खिस्तोत्तर ३५० च्या सुमारास उदयास आला असल्यास त्याचा

१४. गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ. १४१.

१५. जर्नल ऑफ बिहार अँड ओरिसा रीसर्च सोसायटी, व्हॉ. १२, भाग ४.

१६. प्रो. ऐयंगार यांचे समग्र लेख (ओ. बु. ए. ने प्रकाशित केलेले), भाग १, पृ. २७१–२७४.

१७. मिराशी, कालिदास (द्वितीयावृत्ति), पृ. १२५–१२६.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मुलगा देवराज हा चन्द्रगुप्ताचा समकालीन होईल. याच्याच दरबारी कालिदास दूत म्हणून गेला असावा. प्रस्तुत दानपत्रातील ऐतिहासिक उल्लेखांची चर्चा केल्यावर आता आपण त्यातील इतर माहितीकडे वळू.

पांडरंगपल्ली दानपत्रातील माहिती

प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश अविधेय राजाने महादेव गिरीच्या पूर्वेस अनेनदीच्या तीरी असलेला पांडरंगपल्ली हा गाव जवळच्या काम्यक व जाउली या वाड्यासह पविद्धक नामक स्थानाहून आलेल्या भार्गव गोत्री आणि त्रिप्रवरी शंभु नामक सामवेदी ब्राह्मणाला वैश्वदेव व अग्निहोत्र यांच्या अनुष्ठानाकरिता कार्तिकी पौर्णिमेस दान दिला होता, हे नमूद करण्याचा होता. दान देण्याच्या वेळी त्या राजाचा मुक्काम ज्या ठिकाणी होता त्याचे नाव आरंभी आले आहे. पण त्याचे वाचन निश्चित नाही. मी ते वासद असे वाचतो. दानपत्राच्या शेवटी नेहेमीप्रमाणे शापाशीर्वादात्मक श्लोक आले आहेत. त्यानंतर देवदत्ताने राजाच्या अनुज्ञेने हे दानपत्र त्याच्या कारकीर्दीच्या पंधराव्या वर्षी[१८] भाद्रपद संवत्सरी कार्तिक महिन्याच्या कृष्ण-पक्षातील पंचमीस लिहिले असे म्हटले आहे. हाच कालनिर्देश पुढे संख्याचिन्हांनी सं १० (+) ५, कार्त्तिक व. ५ असा दिला आहे. अशा प्रकारे कालनिर्देश पुनः संख्या चिन्हांनी सांगण्याची पद्धत इतर काही प्राचीन ताम्रपटात आढळते. पण डॉ. कृष्णांना येथील अक्षरे वाचता न आल्याने त्यांनी ती 'पण्डराद्रिशेन' अशी वाचली आणि येथे 'पण्ड-राधीशेन' विवक्षित आहे असे मानून प्रस्तुत दान-पत्राचा लेखक देवदत्त हा पण्डराचा (म्हणजे सध्याच्या पंढरपुराचा) अधिपति होता असा अर्थ केला आणि या उल्लेखावरून पंढरपुराची प्राचीनता खिस्तोत्तर पांचव्या शतकाइतकी मागे जाते असे प्रतिपादिले आहे.

'पण्डराधीशेन' आणि 'जयद्विट्ठ' ह्यांचे वाचन चुकीचे

डॉ. कृष्णांचे हे वाचन चुकीचे आहे. त्या ठिकाणी या ताम्रपटाच्या कालाचा निर्देश आहे, पण्डराचा (किंवा पंढरपुरचा) नाही हे मी वीस वर्षांपूर्वी सन १९४४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मानपुरचे राष्ट्रकूट' या माझ्या इंग्रजी लेखात दाखविले होते तरी त्यानंतर डॉ. सालेतोर,[१९] श्री. ग. ह. खरे[२०] आणि अलिकडे डॉ. शं. गो. तुळपुळे[२१] यांनी आपल्या लेखात आणि ग्रंथात डॉ. कृष्णांच्या चुकीच्या वाचनाचा आधार घेऊन अनुमाने केली आहेत. डॉ. कृष्णांच्या आणखी एका वाचनाने संशोधकांना चकविले आहे. १४ व्या ओळीत भार्गवसगोत्राय या-नंतर ते जयद्विट्ठाय असे वाचतात आणि त्यावरून त्या काळी (खिस्तोत्तर पाचव्या शतकात) पंढरपूरच्या देवाचे विठ्ठल हे नाव प्रसिद्ध असून त्याची विठ्ठ या सारखी नावे मुलांना ठेवली जात असे अनुमान त्यांनी केले आहे. त्याचीच री काही इतर संशोधकांनी ओढली आहे. पण हे वाचनही असेच चुकीचे आहे. या ठिकाणची अक्षरे घर्षणाने अगदी अस्पष्ट झाली आहेत. या ठिकाणी 'त्रिप्रवराय' यासारखे विशेषण आले असावे. दान ज्याला दिले होते त्या ब्राह्मणाचे नाव त्याच्या वर्णनपर सर्व विशेषणे १४ व १५ ओळीत लावून झाल्यावर सोळाव्या ओळीत 'ब्राह्मण' शब्दानंतर आले असले पाहिजे. तत्कालीन इतर अनेक ताम्रपटात ज्याला दान दिले त्या ब्राह्मणाच्या नावा-मागे ब्राह्मण हा शब्द लावलेला आढळतो.[२२] तेव्हा चौदाव्या ओळीत जयद्विट्ठ हे ब्राह्मणनाम आले असणे शक्य नाही. सोळाव्या सतराव्या ओळीत ब्राह्मण शब्दानंतर डॉ. कृष्णांनी 'शतामधैशद् त्रिरिद-विनयाद्यष्टभरतवाक्यादमष्टर्धमासपिण्डादात्मनः प्रजा-यशोभिवृद्धये' असे काही तरी वाचले आहे.

---

१८. डॉ. कृष्णांनी येथे 'षोडशे' असे वाचले, पण ते वाचन चूक आहे.

१९. इंडियन् हिस्टॉरिकल क्वॉर्टर्ली, व्हॉ. ११, ट. ७६९–७७८.

२०. श्रीविठ्ठल आणि पंढरपुर (प्रथमावृत्ति) पृ. ७.

२१. प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ. ८९.

२२. 'अगस्त्यसगोत्रब्राह्मणाय नन्नस्वामिने' हा हिंगणी-बेरडी ताम्रपटांतील उतारा पाहा. त्याप्रमाणेच 'ब्राह्मणबोधस्वामिने' आणि 'ब्राह्मणभट्टपुत्रबप्पस्वामिने' हे कलचुरीच्या अनुक्रमे वडनेर आणि सरसवणी ताम्रपटातील ब्राह्मणनामांचे निर्देश पाहा. इन्स्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि चेदि ईरा, पृ. ५० व ५५).


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई



राष्ट्रकूट नृपति अविधेय याचें पांडरंगपल्ली दानपत्र
[पहिला पत्रा : आंतील बाजू]




राष्ट्रकूट नृपति अविधेय याचें पांडरंगपल्ली दानपत्र
[दुसरा पत्रा : पहिली बाजू]



राष्ट्रकूट नृपति अविधेय याचें पांडरंगपल्ली दानपत्र
[दुसरा पत्रा : दुसरी बाजू]


अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई



राष्ट्रकूट नृपति अविधेय याचें पांडरंगपल्ली दानपत्र

[तिसरा पत्रा : पहिली बाजू]



राष्ट्रकूट नृपति अविधेय याचें पांडरंगपल्ली दानपत्र

[तिसरा पत्रा : दुसरी बाजू]



पांडरंगपल्ली दानपत्राची कडी व मुद्रा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

त्याचा काहीच अर्थ होत नाही. शुद्धवाचन 'ब्राह्मण-शभाव (? शंभवे) वैश्वदेवाग्निहोत्रक्रियाद्युत्सर्गाय कार्तिक्यामुदकपूर्व्वं मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये' असे आहे व त्याचा उत्तम अर्थ लागतो. तेव्हा 'जयद्विठ्ठ' हे ब्राह्मणनाम आणि त्यावर आधारलेले विठ्ठल या देवनामाच्या प्राचीनतेबद्दलचे अनुमान ही दोन्ही भ्रामक आहेत हे स्पष्ट दिसेल.

स्थलनिश्चय—

प्रस्तुत दानपत्रात उल्लेखिलेल्या विदर्भ, अश्मक आणि कुन्तल या प्रदेशाची भौगोलिक स्थाने वर निश्चित केली आहेत. ते दानपत्र जेथून दिले त्या स्थलाचे नाव वासट असल्यास ते सध्याचे सातारा जिल्ह्याच्या जावळी तालुक्यातील वासोटा गाव असावे. त्या जवळच्या डोंगरावर वासोटा किल्ला आहे तो कोल्हापूरचा शिलाहार नृपति द्वितीय भोज याने बांधला असे म्हणतात.[२३] ज्याला प्रस्तुत दान दिले होते तो ब्राह्मण मूळचा पविद्धक नामक गावचा. हे गाव विजापुर जिल्ह्याच्या इंदी तालुक्यातील प्राचीन पवित्तगे (सध्याचे सालोटगे) असावे, असे श्री. लक्ष्मीनारायण राव सुचवितात. महादेवगिरि म्हणजे महाबळेश्वर पर्वत. याच्या पूर्वी अनेनदी म्हणजे सध्याची कृष्णानदीस मिळणारी येन्ना किंवा वेणा असावी. हिच्या काठी काम्यक आणि जाऊली या वाड्यासहित दान दिलेले पांडरंगपल्ली गाव होते. त्याचा पत्ता सध्या लागत नाही. जावली तालुक्याचे मुख्य गाव जावली हे जाऊली असावे असे सकृद्दर्शनी वाटते, पण ते कोयनानदीच्या काठी आहे.

दुसरा लेख

मागे सांगितल्याप्रमाणे हा लेख सुमारे अडीच ओळींचा आहे. तो जुन्या कानडी लिपीत लिहिला असून त्याची भाषा कानडी आहे.

डॉ. कृष्णांचे चुकीचे वाचन व विवेचन

डॉ. कृष्णांनी या लेखाचे भाषांतर पुढील प्रमाणे केले होते— कन्नवाड, गंगवाड, बळेयवाड, रेर्णाडाळ आणि सियळार याचा अधिपति सर्बरस याने हे दान दिले. त्याचे पत्रे शिंतर्गेचा शैबाज याने तयार केले होते.

या लेखात उल्लेखिलेला सर्बरस हा राष्ट्रकूट नृपति शर्व ऊर्फ पहिला अमोघवर्ष (ख्रिस्तोत्तर नववे शतक) होय असे डॉ. कृष्णांचे मत होते. यामध्ये त्याची परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर यासारखी बिरुदे दिसत नाहीत; याचे कारण त्यानी असे दिले होते की हा लेख अमोघवर्षाच्या माळवा, वेंगी इत्यादि ठिकाणच्या विजयापूर्वी कोरला होता. डॉ. कृष्णांनी यात उल्लेखिलेल्या स्थलनामांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले होते –

(१) कन्नवाड म्हणजे कन्नदेश. यात सोलापूर जवळचा प्रदेश अंतर्भूत होता. (२) गंगवाड म्हणजे म्हैसूरजवळचा गंगांचा प्रदेश. (३) बळेयवाड म्हणजे नाशिकजवळचे बेळगाव तऱ्हाळे किंवा तुंगभद्रेच्या काठचा प्रदेश. (४) रेर्णाडाळ म्हणजे कोल्हापूरजवळचे रेंदाळ. (५) सीयळार म्हणजे शिलाहारांचा कोल्हापूरजवळचा प्रदेश.

डॉ. कृष्णांचे या लेखाचे विवेचन आणि स्थलनामांचे शोध चुकले आहेत. हा लेख कोरविणारा सर्बरस राष्ट्रकूट सम्राट शर्व किंवा पहिला अमोघवर्ष असणे शक्य नाही. कारण त्याच्या नावापूर्वी सम्राटपदनिदर्शक बिरुदे नाहीत. ती न लावण्याचे डॉ. कृष्णांनी सांगितलेले कारण समर्पक नाही. कारण ती बिरुदे त्याच्या कारकीर्दीच्या आरंभीच्या लेखातही आढळतात. हा सर्बरस कोल्हापूरजवळच्या काही खेड्यांचा मालक किंवा इनामदार होता. ती खेडी कोल्हापूर जिल्ह्यात आजही ओळखता येतात. उदाहरणार्थ, कन्नवाड म्हणजे शिरोळ तालुक्यातील कनवाड, गंगवाड हे करवीर तालुक्यातील घानवडे, बळेयवाड हे कागल तालुक्यातील बेळेवाडी; रेर्णाडाळ हे हातकणगले तालुक्यातील रेंदाळ; सियळार हे शाहुवाडी तालुक्यातील शिराळे.[२४]

या लेखाचा उद्देश

या लेखाचा उद्देश शर्व– अमोघवर्षाने या दानपत्रातील दान पुनः कायम करण्याचा असणे शक्य नाही. तसेच या लेखाच्या शेवटी डॉ. कृष्ण म्हणतात त्याप्रमाणे हे पत्रे तयार करणाऱ्याचे नाव येणे शक्य

२३. सातारा डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर (नवी आवृत्ति), पृ. ९२७–९२९.

२४. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर (नवी आवृत्ति) यातील गांवांची यादी पाहा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नाही. कारण पहिल्या व दुसऱ्या लेखात चारशे वर्षांचे दीर्घ अंतर आहे. इतक्या अवधीनंतर ही माहिती स्मरणात राहिली असणे शक्य नाही. श्री. लक्ष्मी-नारायणराव यांनी केलेले याचे वाचन पुढे दिले आहे त्यावरून या लेखाचा उद्देश आरुंबाळिके यासह शितर्गे हा गाव सर्बरस याने दान दिला हे नमूद करण्याचा होता. यातील शितर्गे हे शाहुवाडी तालुक्यातील शितूर आणि आरुंबालिगे हे करवीर तालुक्यातील बालिंगे असावे. ते दान कोणास दिले याचा या लेखात निर्देश नाही. कदाचित् हा ताम्रपट ज्याच्या ताब्यात होता त्याला ते दान केले असावे. सर्बरस याने आपल्या दानाच्या नोंदणीकरिता नवीन ताम्रपट तयार न कर-विता पूर्वीच्या ताम्रपटाच्या तिसऱ्या पत्र्याच्या बाहे-रच्या कोऱ्या बाजूचा उपयोग केलेला दिसतो.

वाचन[१] पहिला पत्रा

१. सिद्धम्[२] [।*] [स्वस्ति] [।*] वास [वा] धि [वा] स [का] [त्*][३] सविदभा (र्भा) श्मकविजेता मानाङ्कनृपतिः

२. श्रीमत्कुन्तलानां प्र [शा] सिता[४] [।*] प्रजासु शान्त्या विनयेन साध (धु) षु.

३. द्विषत्सु शौर्य्येण नयेन राजसु [।*] त्यागेन सर्व्वत्र च यः प्र–

४. का [श] ते लोकान्तरस्थोपि गुणैरिह स्थितः [॥ १ ॥ *] देवराजः सुत–

५. स्तस्य[५] देवराज इवाधितात् (न्) [।*] चकारासमसंपत्तीनि (नि) रत्या य [:*] सु–

६. खोदयान्[६] [॥२॥ *] छद्मव्यतीतं विनयेन शौर्य्यं त्यागोर्थिनाँ सूरि [भि] रप्र–

७. मेयः [।*] सत्यं क्रियाभिश्छलविप्रयुक्तं शुद्धा गुणा [स्तस्य] प [रैः] प्रकाशः[८] [॥ ३ ॥*]

दुसरा पत्राः पहिली बाजू

८. तस्यापि सूनुर्नृपतिन्विजेता प्रत्नान्नवीनोपि गुणै-र्व्विशुद्धैः [।*]

९. षड्वर्गशत्रोरविधेयकारी राजा यतस्तेन किला-विधेयः [॥ ४ ॥ *]

१०. अर्थितमात्रदा [न] स्य[९] तस्य दातुर्गुणोचितं (तम्) [।*] कृतं प्रणयिलो [क]–

११. स्य[१०] स्त्वस्याद्यापि दुनोति[११] यं (यम्) [॥५॥ *] प्रदातुः प्रियमस्यातिपूरिताशोपि

१२. याचकः।[१२] सेवया[१३] ...वाञ्छया [॥६॥*] तेन विप्रो–

१३. [समायेह][१४]...[।*]... षडङ्गविदे सार्थं तत्व (त्त्व) ज्ञानवि–

१४. पश्चिते [॥ ७॥*] [भार्ग्गवसगोत्राय] [त्रिप्र-वराय[१५]] पविद्धकस्थानाभि–

---

१. मूळ ताम्रपटावरून. २. हा शब्द चिन्हाने दर्शविला आहे. ३. येथील स्थलनामाचे वाचन निश्चित नाही. डॉ. कृष्ण यांनी येथे वसुधाधिबधि असे वाचले आणि त्याची 'वसुधाधिपतिः' अशी दुरुस्ती केली. पण ह्या वाचनास मुळात आधार नाही. ताम्रपटाच्या आरंभी तो जेथून दिला त्या स्थानाचा निर्देश असतो. तसा येथेही असावा. ४ डॉ. कृष्ण यांनी येथे 'श्रीसात्कुन्त धरा नः' असे वाचले, पण त्याचा काही अर्थ होत नाही. ५ वृत्त वंशस्थ ६. डॉ. कृष्णांच्या 'चकारासमसंपत्ति धीरत्वे यः स्वतोजयान्।' या वाचनाचा काहीच अर्थ होत नाही. ७. डॉ. कृष्णांच्या 'शौर्य्यत्यागादिना' या वाचनाचा अर्थ लागत नाही. ८. डॉ. कृष्ण येथे 'बभुः प्रकाशाः' असे वाचतात, पण त्यातील पहिले अक्षर 'ब' दिसत नाही. वृत्त–इंद्रवज्रा. ९. डॉ. कृष्णांनी येथे 'अथीतमात्रदात्ता' असे वाचले, पण त्यांना त्यापुढील नऊ अक्षरे लागली नाहीत. मूळ ताम्रपटा-वरून ती प्रयासाने वाचता येतात.

१०. डॉ. कृष्णांचे 'कृतप्रणयनैनृपैः' हे वाचन संदर्भास जुळत नाही. ११. डॉ. कृष्णांचे 'प्रणौती यम्' हे वाचन संदर्भास आणि वृत्तासहि जुळत नाही. १२. डॉ. कृष्णांच्या 'प्रदातुं प्रियमस्य गीः पूरिताशोपि सच्चकः' या वाचनाचा अर्थ नीट लागत नाही. १३. यानंतरची दहा अक्षरे अगदीच अस्पष्ट झाली आहेत. डॉ. कृष्णांनीही ती वाचली नाहीत. त्यापैकी शेवटची दोन 'न तु' अशी अनुमानाने सुचविता येतील. १४. डॉ. कृष्णांनी येथे 'विप्राय' असे वाचले. या ओळीतील शेवटची काही अक्षरे मात्र वाचता येतात. बाकीची अगदी अस्पष्ट झाली आहेत. १५. हे वाचन निःसंदिग्ध नाही. डॉ कृष्णांचे वाचन 'जयद्विष्ठायो–' संभवत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१५. जनायच्छन्दो[16] [गा] य [त्रिसहस्र] वि [द्या]
यें[17] चतुःवेद (चतुर्वेद) [पण्डिताया] तिथि [ध*]-
१६. मिने (णे)[18] ब्राह्मणशभाव (शंभवे)[19] वै
[श्व] देव (वा) [ग्नि] होत्र [क्रि]य (या)
द्यु [त्स] ग (र्गा) [य][20] [का] र्त्ति–
१७. क्या [मु] दकपूर्व्वं मा [ता] पि [त्रो] रात्म-
नश्च पुण्ययशोभि [वृद्धये][21] [म] हादे [व*][22]
१८. गिरेः पूर्व्वतः अने [नदी][23] कूले काम्यकजा
[ठ] ल [वाटि*] का [स] हितो[24]
१९. पाण्डरङ्गपल्ली प्रति [पा] दितेत्य [वगं] त
[व्य]–मिति [। *] अस्मस (त्स) गोत्रा-
नन्यांश्च[25]
२०. राज्ञो भोगिकांश्चाज्ञापयति ॥ वि [दि] तमस्तु
वो यथा भू [दानं] [सर्वे]–[26]
२१. भ्यो गरीव इति मत्वा न केनचिद्विलोपः करणीय
[इ] ति [। *] [उ] क्तञ्च.

तिसरा पत्रा : पहिली बाजू

२२. भगवता मनुना । त्रीण्याहुरतिदानानि गावः
[पृथ्वी] [स] रस्वती [। *] आस (शं) –
२३. तं त (ता) स्यंत्येत (ते) ज्ञानवाहनदोह
[नैः][27] [॥ ८ ॥ *] षष्टिं (ष्टिं) [व] र्ष
सह [स्रा] णि [स्व] र्गे मा–
२४. दति भु (भू) मिदः [। *] आ [च्छे] त्ता
चानुमन्ता [च *] तान्येव नरके वसेत् [॥९॥*]
वेदव्या –
२५. सेन वा (व्या) सेना [प्यु] क्तम् [। *]
[बहुभि] [र्व] सुधा (धा) भुक्ता राजभि-
स्सगरादिभि [: । *]
२६. य [स्य] यस्य यदा भू [मि] स्तस्य तस्य तदा
फलम् [॥ १० ॥ *] स्वद [त्तां] परदत्तां
[वा][28]
२७. य [त्ना] द्रक्ष य (यु) धिष्ठिर [। *] महि
(हीं) महि (ही) भ (भु) जां श्रेष्ठ दाता
[च्छ्रेयो] नु [पा] लनामिति (पालनम् ॥ ११ ॥
इति ।)
२८. लिखितञ्चेदं राज्यसंव [त्स] रे प [ञ्च]
दशे[29] भाद्रपदे कार्तिकस्य ब–
२९. हुलपञ्चम्यां राजानु [ज्ञा] तेन देवदत्तेन । सं १०
(+) ५ [कार्त्तिक] ब ५[30] [॥ *]

---

१६. डॉ. कृष्ण ‘ जयाद्विष्ठायोपविद्वरस्थानाभिषिक्ताय ’ असे वाचतात आणि ‘ जयद्विष्ठ ’ हे ब्राह्मणनाम समजून ते विठ्ठलापासून व्युत्पादितात, पण या तर्काला आधार नाही. ‘ स्थानाभिषिक्ताय ’ हे तर प्रस्तुत संदर्भात अगदीच असंभवनीय आहे. १७. येथील अक्षरे अगदी निष्काळजीपणाने लिहिली किंवा कोरली असल्याने हे वाचन असंदिग्ध नाही. डॉ. कृष्ण येथे ‘ विसदत्रिविद्याय असे वाचतात, पण त्याचाही अर्थ लागत नाही. १८. डॉ. कृष्णांचे वाचन ‘ पण्डितायति धर्मिणे ’. १९. ‘ ब्राह्मण ’ या शब्दापुढे त्या ब्राह्मणाचे नाव. २०. सामान्यतः ‘ क्रियाद्युत्सर्पणार्थम् ’ असे शब्द असतात. २१. डॉ. कृष्णांच्या ‘ क्या एदमष्टर्थमासपिण्डात्मनः प्रजायशोवृद्धये ’ या वाचनाचा काहीच अर्थ होत नाही. २२. डॉ. कृष्णांनीही येथे ‘ महादेव ’ असेच वाचले, पण येथील अक्षरे अत्यंत निष्काळजीपणाने लिहिली किंवा कोरली असल्यामुळे हे वाचन असंदिग्ध नाही.

२३. ही अक्षरे नीट कोरली नाहीत, पुढील ‘ कूले ’ हा शब्द ती ‘ नदी ’ अशी असावीत असे सुचवितो. २४. डॉ. कृष्णांनी येथे ‘ अनेवारिचालकन्दकदुद्दीपल्लिसहिता ’ असे वाचले आहे. २५. डॉ, कृष्णांच्या ‘ जात्यां सच्छात्रानन्यांश्च ’ या वाचनाचा काहीच अर्थ होत नाही. २६. डॉ. कृष्णांनी येथे ‘ यागिभ्यः दानम्परेभ्यो असे वाचले आणि येथील लेखन अस्पष्ट आहे असे म्हटले. आमच्या वाचनाचा अर्थ चांगला लागतो.

२७. हा श्लोक मनुस्मृतीत आढळत नाही. चाहमान रत्नपाल याच्या विक्रमसंवत् ११७६ च्या सेवडी ताम्रपटात तो आला आहे, पण तेथे द्वितीयार्धाचे वाचन ‘ आसप्तमं फलन्त्येते दानवाहनिवेदनैः ’ असे आहे. एपि. इ. व्हॉ. ११, पृ. ३१२ पाहा. डॉ. कृष्णांनी येथे ‘ त्रीण्यंहरति दानानि गाव ’ असे वाचले आहे. या व पुढील श्लोकाचे वृत्त–अनुष्टुभ्.

२८. डॉ. कृष्णांचे येथील वाचन ‘ पूर्वदत्तां द्विजानिभ्यो ’ मूळास धरून नाही. २९. डॉ. कृष्णांचे वाचन राज्यकरवरिसे षोडशे हे अगदीच चूक आहे. ३०. येथे डॉ. कृष्णांनी ‘ पण्डराद्रिशेन ’ असे वाचून त्यात ‘ पण्डराधीशेन ’ अशी दुरुस्ती सुचविली, पण हे वाचनही अगदीच चूक आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तिसरा पत्रा : दुसरी बाजू[३१]

१. कन्नवाड गंगवाड बळेयवाड रेर्णाडाळ
२. सियळार सामि सर्बरसरकोटोर शिंतर्गे आरुं–
३. बाळिगे योडं [। *]

भाषांतर पहिला लेख

सिद्धम्. स्वस्ति. वासव[१] येथील शिबिरातून–

विदर्भासहित अश्मक देश जिंकणारा आणि ऐश्वर्य-संपन्न अशा कुन्तलदेशाचा अधिपति मानाङ्क नामक राजा होऊन गेला.

(श्लो. १) तो प्रजेमध्ये आपल्या शान्ततामय वर्तनाने साधूंमध्ये विनयाने, शत्रूंमध्ये शौर्याने, राजांमध्ये राजनीतीने आणि सर्वत्र आपल्या दातृत्वाने शोभत असे. तो परलोकी गेला असला तरी आपल्या गुणांनी या जगात राहत आहे.

(श्लो. २) त्याचा पुत्र देवराज ह्याने देवराज इन्द्राप्रमाणे आपल्या आश्रितांना त्याच्या स्वामिनिष्ठेस्तव अनुपम संपत्ति दिली आणि सुखी केले.

(श्लो. ३) त्याचे कपटरहित शौर्य विनयाने, याचकांना दिलेली त्याची असंख्य दाने कवींच्या योगे, त्याचे छलरहित सत्यवादित्व त्याच्या कृत्यांनी याप्रमाणे त्याचे शुद्ध गुण इतरांच्यामुळे प्रकाशित होत असत.

(श्लो. ४) त्याच्या पुत्रानेही राजावर विजय मिळविले आहेत, स्वतः तरुण असला तरी त्याने पूर्ववृद्धांना आपल्या गुणांनी मागे टाकले आहे. तो आपल्या (कामक्रोधादि) शत्रूंचा आज्ञाधारक होत नसल्याने लोकांमध्ये ' अविधेय[२] ' नांवाने ज्ञात झाला आहे.

(श्लो. ५) याचकांनी मागितल्याबरोबर तो (त्यांना) दान देतो. याचकांनी त्याच्या गुणांना योग्य असे त्याला आशीर्वादादि दिले तरी त्यायोगे त्याला खेद होतो.

(श्लो. ६) याचकांना इष्ट असे दान करणाऱ्या या राजाजवळ याचक आपल्या इच्छा अत्यन्त तृप्त झाल्या असताही राहतात ते त्याची (आपल्या हातून) काही सेवा व्हावी म्हणून– (अधिक धनाच्या आशेने (नव्हे).

(श्लो. ७) त्याने येथे सहा वेदांगे ज्याला अर्थासह ज्ञात आहेत, जो तत्त्वज्ञानात निष्णात आहे... ... अशा विप्रश्रेष्ठाला [हे दान दिले आहे.] आम्ही कार्तिकी पूर्णिमेला आमचे माता–पिता यांच्या आणि स्वतःच्या पुण्य आणि कीर्ति यांच्या वृद्धीकरितां [महादेव[३]] पर्वताच्या पूर्वेस अने नदीच्या तीरावरील काम्यक आणि जाउल या वाड्यासहित पांडरंगपल्ली (हा गाव) भार्गवगोत्री आणि त्रिप्रवरी अशा, पविद्धर नामक स्थानाहून अतिथि म्हणून आलेल्या [तीन सहस्र[४]] विद्या जाणणाऱ्या चतुर्वेदपंडित अशा शंभु नामक सामवेदी ब्राह्मणाला दान दिला आहे असे जाणावे.

आम्ही आमच्या वंशातील आणि इतरही राजांना आणि अधिकाऱ्यांना (खालील) आज्ञा करतो–

तुम्हाला माहीत व्हावे की भूमिदान हे इतर सर्व दानांहून श्रेष्ठ आहे हे जाणून कोणीही या दानाचा लोप करू नये.

भगवान् मनूने म्हटले आहे–

(श्लो. ८) गाई, पृथ्वी आणि विद्या ही तीन दाने सर्वश्रेष्ठ मानली जातात. ही दाने शंभर (पिढ्या) पर्यंत (अनुक्रमे) दोहन, वाहन आणि ज्ञान यांच्या योगे तारण करतात.

(श्लो. ९) भूमिदान करणारा साठ हजार वर्षांपर्यंत स्वर्गात आनंदाने राहतो. पण ते दान हिरावून घेणारा आणि त्याला संमति देणारा (हे दोघे) तितकीच वर्षे नरकात राहतील.

वेदांचा विस्तार करणाऱ्या व्यासऋषींनीही म्हटले आहे.–

(श्लो. १०) सगरादि अनेक राजांनी पृथ्वीचा उपभोग घेतला आहे. ज्याची ज्यावेळी भूमि असते त्याला त्या काळी (तिच्या दानाचे) फळ मिळते.

(श्लो. ११) युधिष्ठिरा, स्वतः किंवा परक्याने दिलेल्या भूमिदानाचे प्रयत्नाने रक्षण कर. हे राजश्रेष्ठा, स्वतः दान करण्यापेक्षा (इतरांनी केलेल्या) दानाचे रक्षण करणे हे जास्त श्रेयस्कर आहे.

हे (दान पत्र) पंधराव्या राज्यसंवत्सरी भाद्रपद (यावर्षी) कार्तिक वद्य पंचमीला राजाच्या अनुज्ञेने देवदत्ताने लिहिले आहे. सं. १० (आणि) ५, कार्तिक बहुल (पक्ष) ५.

दुसरा लेख

कन्नवाड, गंगवाड, बलियवाड, रेर्णाडाळ आणि सियळार या (गावांचा) मालक सर्बरस याने आरूं-बाळिगे यासह शिंतर्गे (हा गाव) दान दिला.

---

३१. हें वाचन श्री. लक्ष्मीनारायणराव यांच्या साहाय्याने केले आहे.

१. ह्या स्थलनामाचे वाचन असंदिग्ध नाही. कदाचित ' वासटाधिवासकात ' असे इष्ट वाचन असेल. तसे ' वासटा ' हा जावली तालुक्यातील वासाटा हा किल्ला असेल. हा किल्ला अत्यंत प्राचीन असून तो कोल्हापूरच्या शिलाहर वंशी द्वितीय भोजराजाने बांधला असे म्हणतात. (सातारा गॅझेटियर, पृ. ९२९) २. ' अविधेय ' म्हणजे आज्ञाधारक नसलेला. ३. हे पर्वताचे नांव असंदिग्ध नाही. ४. येथल वाचन असंदिग्ध नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्रा. रा. ग. जाधव

कलात्मक आविष्काराचे पोत : काही विचार !

' पोत ' या नावाच्या आपल्या पुस्तकात श्री. द. ग. गोडसे यांनी कोणत्याही कलात्मक आविष्काराविषयी एक प्रमेय मांडले आहे. त्यांच्याच शब्दात या प्रमेयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

"कलात्मक आविष्करात प्रतीत होणारे जीवनविषयक तत्त्व– ज्या जाणिवांच्यातर्फे हे तत्त्व प्रतीत होते त्या जाणिवा व ज्या माध्यमांच्या यंत्रणेतून जीवनविषयक जाणिवांचा आविष्कार विणण्यात येतो ती माध्यमाची यंत्रणा इत्यादि गोष्टी कलात्मक आविष्काराच्या पोताचे घटक व आविष्काराच्या पोतातील घटक याचे समीकरण पुढीलप्रमाणे ठरेल.

कापड ज्या पदार्थाचे बनविण्यात येते तो मूळ पदार्थ = जीवनविषयक तत्त्व.

धागा = तत्त्व विशद करणारी जाणीव.

ताणाबाणा = या जाणिवांची आडवी उभी वीण.

यंत्रणा = जाणिवांचा आविष्कार घडवून आणणारे माध्यम (भाषेचे, चित्राचे, शिल्पाचे). प्रत्येक कलात्मक आविष्कार म्हणजे कलावंताने जीवनावर केलेले भाष्य ठरते. हे भाष्य तत्कालीन जीवनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे निरीक्षण करून केलेले असते. म्हणूनच प्रत्येक कलात्मक आविष्काराचे पोत तपासून पाहिल्यास त्यात आपल्याला स्थितिसापेक्ष जीवनाचे दर्शन घडते; मग त्या आविष्काराची सौंदर्यदृष्ट्या प्रतवारी कोणतीही असो– आविष्कार निर्मितीचे स्थल, कण, व्यक्ति अथवा माध्यम कोणतेही असो. "

[' पोत '– पृष्ठ ६–७]

––या कलाविषयक उपपत्तीचे उपपादन करीत असताना लेखकाने ' छद्दंत ' जातकथेच्या सहा भिन्नकालीन शिल्पचित्रांकित आविष्कारांचा आपला अभ्यास प्रस्तुत पुस्तकात नमूद केला आहे. आणि व्यासकृत भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायाची ज्ञानेश्वरी भाष्याशी तपशीलाने तुलना करून उत्तर यादवकालीन मराठीतील वाङ्मयीन आविष्काराविषयी काही अभिप्राय व काही प्रश्न मांडले आहेत.

या उपपादनातील एक महत्त्वाचे उपप्रमेय म्हणजे मूलभूत जीवनविषयक व कलात्मक जाणिवा व त्यांच्या आविष्कारासाठी राबविलेली माध्यमाची यंत्रणा या दोहोंची उत्क्रांति व्यस्त प्रमाणात होत असते, असे आहे व याचेही विवेचन लेखकाने सोदाहरण केलेले आहे.

कलाविषयक कोणतीही उपपत्ति ही निर्विवाद व निरपवाद नसते. याचा अर्थ एवढाच की कलाविषयक विविध विचारसरणी काही मर्यादात उपयुक्त असतात. हे नमूद करूनच श्री. गोडसे यांच्या प्रमेयाविषयी काही विचार मांडत आहे–

(१) श्री. गोडसे यांची संपूर्ण विचारसरणी कलावाङ्मयाच्या इतिहासावर भर देणारी व म्हणून स्वतंत्र व श्रेष्ठ कलाकृतीकडे दुर्लक्ष करणारी आहे. या ऐतिहासिक दृष्टिकोनाला एका बाजूने उत्क्रांतिवादाच्या मूळच्या जीवशास्त्रीय कल्पनेने व दुसऱ्या बाजूने अतिसुलभीकरण करणाऱ्या स्थितिसापेक्षतावादाने पूर्णतः पंगू केले आहे. ऐतिहासिक दृष्टि ही शेवटी कलावाङ्मयाची सरासरी शोधित असते. कलावाङ्मयातील उत्क्रांतिवाद हाही एक भ्रमच (myth) आहे. या संज्ञेचा समीक्षेतील वापर मुळात आलंकारिक (metaphorical) स्वरूपाचा परंतु ही आलंकारिकता विसरून या आलंकारालाच भ्रमाने अंग मानण्यात येऊ लागले. सजीव सृष्टीची उत्क्रांति ही तिच्या बाह्य, भौतिक व म्हणून एका दृष्टीने निर्जीव अंगांची उत्क्रांति असते. म्हणजे मग ही कल्पना माणसांच्या आंतरिक गूढ सर्जनशीलतेला लावणे व तिच्यावरून काही निष्कर्ष सांगणे हे उघडपणे सदोषच ठरते. याचे एक गमक असे की उत्क्रांतिवादाच्या दृष्टीने जीवसृष्टीत काही गोष्टी या कायमच्या लोप पावतात, किंबहुना या काही गोष्टींचे एक टिकाऊ परिवर्तन कालौघात रूपास येते. उत्क्रांतिक्रमातील कालच्युत गोष्टी या कदापि त्यांच्या मुळच्या स्वरूपात अवतरत नाहीत. त्या संपूर्णपणे नष्ट होतात. या उलट कलावाङ्मयाच्या क्षेत्रातील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काहीही कधीही संपूर्णपणे नष्ट होत नाही. काल निर्माण होणारा आशय व आकृति याचा आलेख व या आलेखात अनुस्यूत असलेल्या अनंत घटक वस्तू या अक्षर असतात. म्हणजे त्याची मूळची व बदललेली सर्व वळणे व व्यवस्था ही निरंतर उपयोगक्षम असतात. या ठिकाणी उदाहरणच घ्यावयाचे तर आपल्या समीक्षेत १९३०-४० च्या दरम्यान महाकाव्यासंबंधी झालेल्या चर्चेचे स्मरण करावे. महाकाव्य आजच्या काळात उपलब्ध नाही हे खरे पण ते तसे उपलब्ध होत नाही याचे कारण उत्क्रांतिवादाचा अटकाव हे नसून दुसरेच काहीतरी आहे असाच या चर्चेचा निष्कर्ष आहे.

उत्क्रांतिवादाप्रमाणेच समीक्षेतील स्थितिसापेक्षतावाद हाही भ्रामक आहे म्हणजे कलावाङ्मय व जीवनविषयक परिस्थिति यांच्यात काडीमोड झाली आहे असा याचा अर्थ नव्हे. कलावाङ्मय व जीवनस्थिति यांच्यात अभावरूप संबंध कधीही शक्य नाहीत. पण खरा कूटप्रश्न या भावरूप (Positive) संबंधाच्या अस्तित्वाचा नसून त्याच्या अर्थाचाच आहे. श्री. गोडसे यांनी हा अर्थ लावताना जीवनविषयक परिस्थितीचे संदर्भचित्र उभे करून त्याच्या पार्श्वभूमीवर कलात्मक आविष्काराचे पोत पारखण्याचा प्रयत्न केला आहे. याचाही अर्थ असा की समीक्षाविचारात आणखी एक शास्त्रीय अभ्यासाची अट निर्माण करून समीक्षेच्या प्रयोजनात व परिणामात शबलता उत्पन्न केली आहे. गोडसे यांनी जीवनस्थितीचे निरूपण मांडताना इतिहास व समाजशास्त्र यांचा आधार घेतला आहे. उत्क्रांतिवादाची मूळची बैठक तर याही निरूपणात आहेच. या सगळ्या साधनांच्या आधारे त्यांनी वस्तुरूप जाणीवा, आदर्शवादी जाणीवा व संकेतस्वरूप जाणीवा या प्रकारे भिन्नकालीन जीवनस्थितीचे गुणरूप वर्गीकरण चढत्या श्रेणीने केले आहे व त्यात कलात्मक आविष्काराचा अभ्यास कोंबून बसविला आहे.

मानवी मनातील जाणीवव्यवस्था या पद्धतीने खंडित करता येईल काय ? एखाद्या काळातील सर्वसामान्य जाणीवांचे एकच एक विशेषण व क्रियाविशेषण असू शकतात काय ? मानवी जाणिवा या मानवी देहाप्रमाणे उत्क्रांतक्षम- विशेषतः कलावाङ्मयाच्या आविष्काराच्या संदर्भात- असतात काय ? जाणिवा म्हणजे तरी काय ? जाणिवा या जड वस्तूसारख्या असतात काय ? त्यांचे अस्तित्व हे विभागशः व प्रकारशः ठरविता येते काय ? कलावाङ्मय हें काय केवळ प्रकटपणे ज्ञात असलेल्या जाणिवांचाच आविष्कार करते काय ? मग कालच्या काळातील श्रेष्ठ कलाकृति सतत वादग्रस्त होतात व नवनव्या जाणीवा त्यांच्यातून जाणवतात ही वस्तुस्थिति भ्रामक म्हणावयाची काय ?

— हे नमूद केलेले प्रश्न हे खरोखरच प्रश्न मानता आले तर लेखकाचे जाणीवांचे वर्गीकरण व त्यानुसार जीवनस्थितीचे केलेले स्वरूपदिग्दर्शन सदोष म्हणावे लागेल. वर दिलेल्या सर्व प्रश्नोपप्रश्नांची माझी व्यक्तिगत उत्तरे होकारार्थी आहेत. व म्हणून स्थितिसापेक्षतावादाचे श्री. गोडसे यांचे विवेचन व त्यातून त्यांनी मांडलेले कलात्मक आविष्काराच्या पोताचे निष्कर्ष मला एकांगी एवढेच नव्हे तर अर्थशून्य वाटतात.

पण यापेक्षाही खरी भ्रामकता वेगळ्याच प्रकारची आहे. कलावाङ्मयसमीक्षेत इतिहास व समाजशास्त्र यांच्या शिस्ती निर्माण केल्या की त्या समीक्षेचे प्रयोजनच बाधित होते. इतिहास व समाजशास्त्र या अभ्यासपद्धति मानवी जीवनाचे एकेरी सत्यच वा सत्येच सांगत असतात. आणि कलावाङ्मय हे एका अर्थाने स्वतंत्र किंवा प्रतिमानवी जीवनच असते. कलावाङ्मयाचे सत्य शोधून काढणारे एकमेव वा एकमेवाद्वितीय शास्त्र म्हणजे समीक्षाशास्त्र होय. समिक्षाशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट कलावाङ्मयाचे अंगभूत आनंदप्रयोजन यथार्थपणे व यथार्थ कारणासाठी समजावून घेणे हे असते- असले पाहिजे. श्री गोडसे यांच्या विवेचनापासून आनंद होतो परंतु हा आनंद कलावाङ्मयाचे ऐतिहासिक व सामाजिक एकेरी सत्य समजल्याने होत असतो. इतिहास व समाजशास्त्र यांच्या मूलभूत अस्थिरतेमुळे हा आनंद फारसा टिकतही नाही व शेवटी समीक्षेचे मूळचे प्रयोजनही दूर सरकल्याचे आपल्या लक्षात येते. समीक्षेचे खरे कार्य इतिहास व समाजशास्त्र यांच्यापासून कलावाङ्मय अलग करण्याचे असले पाहिजे. याचा अर्थ असा की ऐतिहासिक व सामाजिक जीवनाच्या संदर्भात कलावाङ्मयाने स्वतःसाठी स्वतंत्रपणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

थाटलेला संसार समीक्षेला समजावून घेता आला पाहिजे. जीवनाशी कलावाङ्‌मयाचे कितपत साम्य आहे हे दाखविण्यासाठी समीक्षेचा अवतार नसावा असे मला वाटते. याचे कारण असे की कलावाङ्‌मय हे नेहमीच समकालीनांसाठी निर्माण होते. समकालातून निर्माण होते व समकालीनांना ते समकालाच्या संदर्भात समजावूनही घेता येते. विशेषतः ही वस्तुस्थिति कालच्या व प्राचीन वाङ्‌मयाचा विचार मांडणाऱ्या समीक्षकाने अधिकच लक्षात घेतली पाहिजे. कालचे कलावाङ्‌मय आमच्या समीक्षकाला कालच्या रसिकाप्रमाणे समजावून घेणे कठीण आहे व अनावश्यकही आहे. कालचे कलावाङ्‌मय हे कालच्या काळाहून कसे अलग, अलिप्त व वेगळे होते व म्हणूनच की काय ते आजच्या काळात कसे आकलनसुलभ व आस्वाद्य आहे, हेच प्रश्न खऱ्याखुऱ्या समीक्षेचे आहेत.

मला वाटते, कलावाङ्‌मयाचे विशेषतः प्राचीन कलावाङ्‌मयाचे प्रश्नच श्री. गोडसे यांनी नकळतपणे चुकीचे गृहीत धरले व त्यामुळे ते सोडविण्यासाठी इतर अभ्यासपद्धतींचा सदोष व अति सुलभीकरण केलेला आधार त्यांनी घेतला आहे.

या ठिकाणी मला प्रा. म. वा. धोंड यांच्या 'मऱ्हारी लावणी' या ग्रंथातील विवेचनाकडे वाचकांचे लक्ष वेधावेसे वाटते. मराठी शाहिराची कविता प्रा. धोंड यांनी प्रस्तुत लेखकाप्रमाणेच ऐतिहासिक व सामाजिक संदर्भात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे शाहिरी कविता तत्कालीन परिस्थितीशी कशी व्यस्त प्रमाणात उद्‌भुत झाली व म्हणून कशी स्वप्नरंजनवादी ठरली हे आपल्या लक्षात येते. मला अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, स्वप्नरंजनवाद, आदर्शवाद, या संज्ञांच्या समीक्षेतील उपयुक्ततेचीच शंका व्यक्त करावयाची आहे. या मूलभूत जीवनविषयक प्रवृत्तींच्या आधारे व्यक्तिजीवन समजले व तेही काही प्रमाणात, तरी कलात्मक आविष्कार व तेही एका कालखंडातील अनेकांचे, कसे समजतील याविषयीच संशय वाटतो. आम्ही समीक्षक शेवटी असेही म्हणतो की, हे जीवनविषयक विविध दृष्टिकोन एकाच व्यक्तीत भिन्न अवस्थात व एकाच समाजात एकाच काळी एकत्रितपणे आढळू शकतात. मग या म्हणण्याचा खरा अर्थ तरी काय? आम्ही खरोखरच असे गंभीरपणे म्हणत असतो काय? का समीक्षेची खरी कर्तव्ये टाळण्याचा हा प्रयत्न म्हणावयाचा? का पराभूत व अगतिक समीक्षासामर्थ्याची ही कबुली मानावयाची?

(२) श्री. गोडसे यांच्या विवेचनात उपेक्षित राहिलेला वा ठेवलेला आणखी एक घटक म्हणजे भिन्न कलावंतांच्या भिन्न प्रतिभापिंडाचा! ज्ञानेश्वर, भास्करभट्ट, नरेंद्र, दामोदरपंडित या सर्वांना कवि म्हणून एकाच पंक्तीत बसवायचे काय? यांची जणू सरासरीच लक्षात घ्यावयाची काय? कलावाङ्‌मयाचे खरे रहस्य सरासरीमापनात नसते. म्हणजे हे सरासरीमापन करण्याची वास्तविक गरजही नसते व त्यात लक्षणीयताही नसते. एकाच काळातील समकालीन कलावंतांना समाजस्थितीचे प्रतिबिंब उमटविणारी कळसूत्री बाहुली मानले, तरच हे सरासरीमापन योग्य म्हणावे लागेल. एरव्ही नाही. सर्वच कलावंत स्वकालातील प्रेरणा व प्रवृत्तीच आविष्कृत करत असतात. (खरे म्हणजे हेही विधान एका अर्थाने अर्थशून्यच म्हणावयाचे!) आणि स्वकाळाला आविष्कृत करणे हे खरे म्हणजे वाटते तितके सोपे नाही. स्वकाळ हा एकाच वेळी भूत—वर्तमान व भविष्य या तीनही काळात घट्ट पाय रोवून बसलेला असतो. या विराट स्वकाळाचे समग्र व साकल्यात्मक आविष्करण श्रेष्ठ प्रतिभाच करू शकते. मुकुंदराज, भास्करभट्ट व नरेंद्र यापेक्षा ज्ञानेश्वर श्रेष्ठ आहेत याचे कारण असे समग्र व साकल्यात्मक स्वकालचित्र ते आपल्या काव्यातून निर्माण करू शकले. कलावाङ्‌मयाच्या क्षेत्रातील स्थितिसापेक्षता याचा अर्थ समाजशास्त्रातल्या या संज्ञेच्या अर्थापेक्षा खरोखरच वेगळा आहे हे श्री गोडसे यांनी लक्षात घेतले नाही. म्हणूनच मुक्तेश्वराच्या स्वकालरेखाटनाचे त्यांनी भाव्यांच्या आधारे निसटते धावते समर्थन केले. मुक्तेश्वराने स्वकाळ आणला पण तो त्याला पूर्णपणे आणता आला नाही. स्वकाळाची शालेय मुलाला समजतील व पचतील एवढीच तुटपुंजी बहिरंगे मुक्तेश्वराने आपल्या भारतरचनेत आणली. म्हणूनच मुक्तेश्वर धड व्यासकालीनही ठरला नाही व धड स्वकालीनहि ठरला नाही. स्वतःच्या काळात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. कृ. रा. सावंत

' रोमन रंगभूमीचे स्वरूप '

रंगभूमीचा गुलाम जनक

फार प्राचीन काळी इटालीत 'लुडी' नावाचे समारंभ होत. ते राज्याश्रयी असून सर्व लोकास विनामूल्य खुले असत. त्यात अचकट विचकट विदुषकी खेळ, पशुपक्षांच्या आवाजाच्या नकला, जनावरांच्या झुंजी, कसरतीचे प्रयोग, द्वंद्वे इत्यादि कामणूकीचे प्रकार असत. या समारंभात इ. स. पूर्वी २४० पासून अॅन्ड्रोनिकस नावाच्या गुलामाने ग्रीक नाटकाच्या लॅटिन भाषांतरचे प्रयोग करण्यास सुरवात केली. ज्यांना नाटके म्हणता येतील अशी रचना रोमच्या रंगभूमीवर आणणारा हाच पहिला नाटककार आहे. त्यापूर्वीचे लोकनाट्यासारखे प्रयोग अगदीच अविकसित स्वरूपाचे होते. अॅन्ड्रोनिकसने रोम रंगभूमीला नवे तेज प्राप्त करून देताच झपाट्याने ग्रीक कलाकृतींची भाषांतरे झाली. रंगभूमीचा दर्जा उंचावला. परन्तु ग्रीक रंगभूमीच्या मागे जी एक धार्मिक प्रेरणा होती, नट–नाटककारांना जी सामाजिक प्रतिष्ठा होती ती रोम रंगभूमीवर पाहायला मिळत नाही. प्रथम प्रथम ईश्वरीप्रकोप शांत करण्यासाठी नाट्यसदृश जे प्रयोग करण्यात येत त्यामागीलही खरी भूमिका मनोरंजनाचीच होती असेही सांगतात. अगदी प्रथम हा धंदा गुलामांचा किंवा परदेशातून आलेल्या लोकांचा मानला जाई. म्हणूनच रोमन रंगभूमीवर नाटक आणणारा हा एक गुलाम होता.

लोकप्रिय सुखांतिका

रोमन रंगभूमीवर शोकात्मिका व सुखात्मिका या दोघाचेही प्रयोग करण्यात आले; परन्तु शोकात्मिका तिथे पाळे धरू शकली नाही. इनिअस, पॅकव्हिअस, अकिअस हे याप्रकारची विशेष रचना करणारे नाटककार. त्यांची नाटके आज संपूर्ण स्वरूपात उपलब्ध नाहीत. त्यांच्या बहुतेक नाटकांची नावेच हाती लागली आहेत. अगदी याच्या उलट स्थिति सुखात्मिकेची झाली. अल्पावधीत ती फारच लोकप्रिय झाली व तिचा विकास झपाट्याने होऊ लागला. प्लॅटस व टेरेन्स यांनी तर फारच मोठा उच्चांक गाठला. त्या दोघांनी बरीच नाटके लिहिली. परन्तु आज प्लॅटसची २१ व टेरेन्सची ६ मिळून फक्त २७ नाटकेच संपूर्णस्वरूपात उपलब्ध आहेत. हीच ती उपलब्ध रोमन सुखात्मिका. तिला जागतिक रंगभूमीच्या इतिहासात फार मोठे स्थान आहे. ग्रीक सुखात्मिका आणि रेनेसान्स काळानंतरची सुखात्मिका यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून तिचा नेहमी विचार केला जातो.

प्लॅटस आणी टेरेन्स

प्लॅटस हा एक गुलामाचा मुलगा होता. प्रथम तो जुन्या प्रहसनातून कामे करी. पुढे हास्यप्रचुर प्रहसनात्मक रचना करायला त्याने प्रारंभ केला. हा इतका लोकप्रिय मित्र झाला की कित्येक निर्मात्यांना दुसऱ्यांची नाटके सुद्धा त्याच्या नावावर प्रयोगित करण्याचा मोह आवरता आला नाही. टेरेन्सने प्लॅटसनंतर जवळ जवळ पन्नास वर्षांनी लिहायला सुरवात केली. हा स्वतः गुलाम होता व पुढे आपल्या नाट्यकौशल्याच्या जोरावर मुक्त झाला. काही नाटके लिहिल्यावर तो ग्रीसमध्ये गेला व तिथे मिनॅन्डरच्या जवळजवळ शंभर नाटकांची त्याने भाषांतरे केली. तिथून परत येत असता वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षीच त्याला जलसमाधि मिळाली. प्राचीन नाट्यवाङ्मयात ज्याच्या अधिक प्रमाणात कलाकृती आज उपलब्ध आहेत असा हा प्लॅटस, व उच्च अभिरुचीला अनुसरून सफाईदार रचना केल्यामुळे ज्याच्या कलाकृतींची कदर नाट्यविरोधकांनीही वेळोवेळी केली तो टेरेन्स हे रोमरंगभूमीवरील श्रेष्ठ नाटककार होत. आश्चर्याची गोष्ट अशी की हे दोघे जेव्हा रोम रंगभूमि गाजवित होते तेव्हा कायमस्वरूपाची नाट्यगृहे नव्हती व जेव्हा नाव घेण्यासारखा नाटककारच उरला नाही, (एक सिनेका अपवाद सोडता) तेव्हा उत्तमोत्तम नाट्यगृहे अस्तित्वात आली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

स्थळ, रस्ता :

टेरेन्सपर्यंतच्या काळात (इ. स. पू. २ रे शतक) रोम मध्ये रंगभूमीच्याबाबतीत काही खास बदल झालेला नसल्यामुळे व तत्कालीन सुखात्मिका ही सर्वस्वी ग्रीक नव्या सुखात्मिकेवरच आधारित असल्यामुळे एकंदर नाट्य रचनेचे स्वरूपही तसेच राहिले. उदाहरणार्थ त्यावेळी नाट्यघटनेला रस्त्याचे दृश्य सोईस्कर वाटे. त्यातल्या त्यात आवश्यक तेव्हा काही पात्रांना दुसऱ्यांचे रंगमंचावरील अस्तित्व जाणवत नाही असे भासविण्यासाठी, स्वाभाविकतेच्या दृष्टीने दोन–तीन रस्ते एकत्र मिळत असल्याचे दृश्य अधिक फायद्याचे वाटे. (तशी वेळच आलीतर स्वाभाविकतेलाही धाब्यावर बसविण्यास त्यांनी कमी केलेले नाही म्हणा!) या रस्त्यालाच लागून दोन–तीन दारांच्या द्वारे घरांची सूचनाही केलेली दिसते. ही घरे रस्त्यालाच लागून असल्यामुळे घरातील बोलणे किंवा हसणे-रडणे आवश्यक तर, रस्त्याच्या अलिकडल्या फूट-पाथवर असल्याप्रमाणे दिसणाऱ्या प्रेक्षकांना ऐकू जाईल अशीही योजना असे. थोडक्यात नाट्य घटनेचे स्थळ विशेषत्वाने रस्ता असे.

नाट्यवस्तू

ग्रीक लोकशाही संपुष्टात आल्यावर तिथे जी मिनन्डरादिकांनी नवी सुखात्मिका लिहिली त्यावरच प्लॅटस टेरेन्स यांची सुखात्मिका आधारलेली असल्यामुळे त्यात मुलांना उपदेशांमृत पाजणारे म्हातारे आई–बाप, प्रेमलोलूप व उधळे तरुण, त्या तरुणांच्यावर प्रेम करणाऱ्या तरुणी, थापेबाज शिपाई, खादाड पॅरसाईट, बदमाश व हुशार गुलाम अशी ठराविक ठशाचीच पात्रे आढळतात. तसेच तरुणांनी कमी प्रतीच्या तरुणीवर प्रेम करणे, आई-वडिलांनी त्यांना विरोध करणे, परंतु प्रेमसंबंधात गुलामांनी तरुण मालकाला साहाय्य करणे व म्हाताऱ्याला बनविणे; अखेर ती तरुणी उच्च कुलीन असल्याचे व आईवडीलापासून काही कारणामुळे दुरावल्याचे उघडकीस येणे, यासारखी टराविक साच्याची कथानकेही दिसतात. तरीपण वृत्तीचे विडंबन, परिहासात्मक टीका, शारीरिक तसेच स्वभावांतर्गत विविध विसंगतीचे व्यंग चित्रणात्मक दर्शन; गुंतागुंतीच्या, योगायोगाच्या चमत्कृतिपूर्ण किंवा अंती स्फोट करणाऱ्या घटना; गैरसमज, संभ्रम, गोंधळ इत्यादीस आधारभूत ठरणाऱ्या अस्वाभाविक परन्तु स्वीकृत कल्पना; वेषांतरादि प्रकार, अश्लील सूचना व कोटीप्रचुर भाषा; विरूप वेशभूषा या सारख्या क्लृप्त्यांचा वापर करून त्या नाटककारांनी उत्तम विनोदनिर्मिति साधली आहे. त्यात विविधता आहे. या प्रकारच्या युक्त्यांचा कमी जास्त प्रमाणात अवलंब करून प्रथम ॲरिस्टोफेनिस व मिनॅन्डर या ग्रीक नाटककारांनी सुखात्मिका लिहिली तिलाच प्लॅटस व टेरेन्स यांनी हातभार लावला व फार मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. पुढे शेक्सपिअर, मोलीअर, कॉंग्रीव्ह, वायचर्ली या सारख्यांनीही या मधून स्फूर्ति घेऊन तशीच श्रेष्ठ दर्जाची सुखात्मिका लिहिली. हीच विनोदनिर्मितीच्या वक्लुप्त्यांची परंपरा अद्यापही चालू आहे. मिनॅन्डरच्या नाटकात कौटुंबिक घटना दर्शविणारे विषय व गुंतागुंतीची रचना दिसते. या दोन्हीचेही आकर्षण पुढे फारच वाढत गेले. बहुधा रोमन नाटककार आपल्या नाटकांचे कथानक ग्रीक दोन–तीन नाटकांवरून विणताना दिसतो. टेरेन्सचे 'मदर-इन्-लॉ' सोडले तर त्याच्या उपलब्ध नाटकांपैकी प्रत्येक नाटक ग्रीक दोन-तीन नाटकांवरून बनविलेले आहे. पुढे रेनेसान्स काळानंतर या प्रकारच्या गुंतागुंतीच्या सुखात्मिकेने फारच मोठा उच्चांक गाठला. प्लॅटसच्या 'टू मेनेकमसेस' वर आधारलेले शेक्सपिअरचे 'कॉमेडी ऑफ एरर्स' आणि 'पॉट ऑफ गोल्ड' वर आधारलेले मोलीअरचे 'मायझर' ही जागतीक रंगभूमीवरील अत्यंत देखणी प्रहसने याची उत्तम साक्ष देतात.

मुखवटे आणि वेशभूषा

वर एकदा म्हटल्याप्रमाणे स्वभावचित्रणाच्या बाबतीत नाटकात जो सारखा तोचतोचपणा जाणवतो याचे कारण त्यावेळचे सामाजिक जीवन आजच्या इतके वैचित्र्यपूर्ण नव्हते हेही सांगता येईल. शिवाय या स्वभाव-वैचित्र्याच्या आड तत्कालीन रंगभूमीची स्थितीही आली असावी. त्याकाळी प्रचंड जनसमुदायापुढे नाटक होत असल्यामुळे सर्वांना दिसण्यासाठी मुखवट्यांचा वापर सोईस्कर असला तरी स्वभावचित्रणांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ठराविकपणा आणायला तो कारण झाला असावा. ग्रीक मिनॅन्डरच्या काळात निरनिराळया वृद्धांचे ९, तरुणांचे १०, गुलामांचे ७, तरुण स्त्रियांचे १४, व इतर वृद्ध स्त्रियांचे ३ असे काही ठराविकच मुखवटे तयार केले जात असून त्यांचा नाटकात वापर होई. मिनॅन्डरादिकांच्या नाटकांची भाषांतरे होताच रोमन रंगभूमीवरही अशा ठराविक मुखवट्यांची आयात झाली. सुखात्मिकेत हे मुखवटे कधी कमालीचे वास्तवपूर्ण तर कधी अत्यंत भडक असत.

ग्रीकांच्या प्रमाणे रोम रंगभूमीवरही पोषाखांचे आणि रंगाचे काही संकेत होते. शोकांतिकेतील पात्रांचे पोषाख लांब झग्याचे असत तर सुखांतिकेत ते आखूड असत. तसेच म्हाताऱ्या व्यक्तींचे पांढरे, तरुणांचे जांभळे, गणीकांचे पिवळे व पॅरसाईटचे करडे असे पात्रांच्या कपड्यांचे रंग असत. गुलामांचे केस नेहमी तांबडे दाखविले जात.

प्रोलॉग

प्लॉटस व टेरेन्स यांच्या नाट्कातील प्रोलॉग हे तत्कालीन रंगभूमीच्या स्वरूपावर तसेच सामाजिक स्थितीवर विशेष प्रकाश टाकणारे असल्यामुळे त्यांचा विचार उपयोगी ठरतो. मात्र हे प्रोलॉग वरील दोन्ही नाटककारांनी वेगवेगळया हेतूंनी वापरले आहेत. नाट्यदृष्ट्या प्लॉटसला प्रोलॉग मंजूर होता तर टेरेन्सला तो नव्हता. टेरेन्स आपल्या टीकाकारांना उत्तरे देण्यासाठीच त्यांचा वापर करतो.

प्लॉटसच्या प्रोलॉगवर आजचे टीकाकार तुटून पडतात. हे प्रोलॉग युरिपिडीसच्या प्रोलॉग इतके कलात्मक नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. काही अंशी ते बरोबरही आहे. परंतु त्यावेळचा प्रेक्षकवर्ग, रंगभूमीची स्थिति आणि प्लॉटसच्या नाटकांचे काही एक बाबतीतले वेगळेपण लक्षात घेता प्रोलॉग हा अपरिहार्य वाटतो. या प्रोलॉगने मधूनमधून आपल्या विनोदपूर्ण वक्तव्यातून प्रेक्षकांना केलेल्या सूचना वाचल्या म्हणजे तत्कालीन प्रेक्षकवर्गाची उत्तम कल्पना येते. तो प्रोलॉग काही ठिकाणी म्हणतो, बायकांनी सारखी गडबड करून नटांना आणि आपल्या नवऱ्यांना त्रास देऊ नये. बायकांनी आपल्या लहानमुलांना दायांच्याकडे घरी ठेवून नाटकास येणे– गुलामांनी त्यांच्यासाठी नसलेल्या जागेवर बसू नये– लोकांनी आपल्या आवडत्या नटालाच टाळया देऊन इतरांवर अन्याय करू नये– ज्यांना नाटक पाहायचे नाही त्यांनी तिथून जावे म्हणजे पाहाणाऱ्यांना जागा होईल. हा असला सर्व वयाचा व दर्जाचा स्त्रीपुरुष प्रेक्षकवर्ग नाटक पाहायला येत होता. साहजिकच या सर्वांना कथानक नीट कळावे, गुंतागुंत उलगडत जावी, त्या त्या पात्रांच्या स्थितीवर किंवा विनोदपूर्ण प्रसंगावर प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित व्हावे ही प्लॉटसची अपेक्षा होती. याशिवाय पुढला पडदा नसलेला उघडा रंगमंच व बहुधा गृहित प्रमेयावर आधारित अशी गुंतागुंतीच्या प्रसंगांनी युक्त अशी प्रहसने यामुळे प्रोलॉगची उपयुक्तता त्याला वाटणे अगदी बरोबर आहे. हा प्रोलॉग नेहमीच आणि प्रथम येतो असे नाही. बहुधा तो नाटकात असतो आणि क्वचित मध्येही त्याचा वापर केला जातो. तसेच प्लॉटसच्या नाटकात बऱ्याचदा इपिलॉगही आहे. एकंदरीत सुरवातीस प्रेक्षकांना अवधान देण्यास विनंती आणि सर्वच नाटकाच्या शेवटी, न चुकता, टाळया देण्यास आठवण करताना प्लॉटस दिसतो.

टेरेन्सला मात्र वरील कारणासाठी प्रोलॉग मंजूर नव्हता. त्याची भूमिका पुष्कळच कलात्मक होती. नाट्यप्रयोग पाहात असता आपोआपच गुंतागुंत उलगडत जावी असे त्याला वाटे. परन्तु लॅनुविअस सारख्या विरोधकांनी, टेरेन्सने स्वतःच्या एका नाटकासाठी ग्रीक दोन–तीन नाटके बाटविली (Contaminated) व जुन्या लॅटिन नाटकातील पात्रे चोरली असे आरोप केल्यामुळे (या विरोधकांनी त्याच्या 'मदर इन् लॉ' नाटकाचे दोन प्रयोगही पाडले होते अशी माहिती आहे.) त्यांना उत्तरे देण्यासाठी व मुख्य म्हणजे प्रेक्षकांचा ग्रह कलुशीत होवू नये यासाठी टेरेन्सने आपल्या नाटकांना प्रोलॉग नाईलाजाने जोडले. त्यातून कथानक अर्थातच निवेदन केले नाही. प्रेक्षकांची उत्कंठा वाढत जावी, रहस्यस्फोट होताच त्यांना आश्चर्य वाटावे याची त्याने कथारचनेत खबरदारी घेतलेली आहे. त्या शिवाय उच्चवर्गीय किंवा मोजकाच प्रेक्षकवर्ग डोळयासमोर ठेवून त्याने नाटके लिहिली

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

असल्यामुळे त्या लोकांना ती कळतील असा त्याला विश्वास होता. दोघा नाटककारांचे हे प्रोलॉग म्हणूनच ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे आहेत.

काही नाट्यप्रकार

रोमरंगभूमीवर काही ठळक नाट्यप्रकार किंवा नाट्यशाखा दिसतात त्यांचाही इथे थोडक्यात विचार करणे आवश्यक आहे. ग्रीक नाटकावरून भाषांतरीत केलेली जी नाटके आढळतात त्यांना फॅबूला पॅलिआटा (Fabula palliata) म्हणतात. या प्रकारचे नाट्य निर्माण करणारे ॲन्ड्रोनिकस, सेसोलिअस, नेविअस, प्लॉटस व टेरेन्स हे महत्त्वाचे नाटककार होत. याच्याही फार पूर्वी ओस्कन नावाच्या बोली भाषेत काही प्रहसने होत होती. त्यामधून फॅबूला अटेलिना (Fabula Atellana) नावाचे नाट्य विकास पावले. इ. स. पूर्वी पहिल्या शतकात नोविअस, पॉम्फोनिअस यांनी त्याला वाङ्मयीन दर्जा प्राप्त करून दिला. हे नाट्य ग्रीक नाटकावरून भाषांतरीत केलेले नसले तरी ग्रीक वारसा सिद्ध करणारे होते. प्लॉटस–टेरेन्सच्या नाटकात व या नाटकात बरेच साम्य आहे. मॅक्स, बक्को, पॅप्पस इत्यादी पात्रे ग्रीक नाटकावरूनच घेतलेली वाटतात. तिसरे महत्वाचे नाट्य म्हणजे' फॅबूला टोगाटा' (Fabula Togata) हे होय. सामान्य लोकांच्या जीवनाचे त्यात दर्शन असे. ते ग्रीक नाट्यावरून भाषांतरीत नसून त्यात स्त्रियांच्या भूमिकांवर भर दिलेला व गुलाम नायकांपेक्षा कमी हुशार दाखविलेला असे. टोगाटा लिहिणारे प्रसिद्ध नाटककार टिटिनिअस अट्टा (Atta) व अफ्रानिअस हे होत. पहिल्याचा काळ कळत नाही परन्तु नंतरचे दोघेही इ. स. पू. दुसऱ्या शतकात होऊन गेले. अफ्रानिअस टेरेन्सची स्तुति करतो तेव्हा तो टेरेन्सनंतर होता हे स्पष्ट आहे. 'फॅबुला' टॅबर्नारिआ' (Fabula Tabernaria) नावाचेही टोगाटाच्या धर्तीचे नाट्य होते. परन्तु 'टोगाटा' आणि 'टॅबर्नारिआ' या दोन्हींचाही लवकरच विकास खुंटला. त्यानंतर मुखवटेविरहीत अशा मूकनाट्याचे प्रयोग फारच लोकप्रिय झाले. या प्रयोगांनी 'अटेलिना 'लाही उधळून लावले असे सिसेरो म्हणतो. काहीसा ओबड-धोबड असा आणि अश्लीलतेकडे बराच झुकणारा हा प्रकार होता, तरीपण त्यात कलेचा व शिक्षणाचाही भाग असे. उत्तम अभिनय आणि औपरोधिक सूचना त्यात असल्यामुळे सिनेटर्सही या प्रयोगांना जातीने हजर राहात व पथ्यकर सल्ला स्वीकारीत असे म्हणतात. हेच मूक-नाट्य पुढे अंधारयुगातही वाटचाल करीत राहिले व अखेर मोलिअर आणि शेक्सपिअर सारख्या जगप्रसिद्ध नाटककारांना स्फुर्तिप्रद ठरणाऱ्या 'कॉमेडी डेल आर्ट' सारख्या एका श्रेष्ठ नाट्य–कला प्रकारात पर्यवसित झाले.

नाट्यगृहे

रोमरंगभूमीवर कायम स्वरूपाचे पहिले नाट्यगृह इ. स. पू. ५५–५२ ला झाले. त्यापूर्वी नाट्यप्रयोगास किंवा करमणूकीस लाकडाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची इमारत उभारण्यास सिनेटर्स विरोध करीत. इ. स. पू. १५४ मध्ये बांधलेले एक नाट्यगृह सुद्धा त्यांनी कोसळून टाकले होते. नंतरच्या कालात मात्र भराभर नाट्यगृहे उभारायला सुरवात झाली. उलट यावेळी चांगले नाटककारच उरले नाहीत. नाही म्हणायला सिनेकाने काही उत्तम शोकान्तिका लिहिल्या. परन्तु त्या प्रयोगानुकूल नव्हत्या. रोमन नाट्यगृहे ही ग्रीक नाट्यगृहापेक्षा वेगळी होती. एखाद् दुसरा अपवाद सोडता ती सपाट जमीनीवर उभारलेली असत. या इमारतीच्या बाह्य सजावटीकडे फारच लक्ष दिलेले असे. त्यात अगदी बरोबर अर्धवर्तुळाकृति प्रेक्षागार असे. वृंदालयसुद्धा अर्धवर्तुळाकार असून रंगमंचापुढे आणि थोडे खाली असे. या वृंदालयाचा, कधी जादा बैठकीसाठी तर कधी जलयुद्धांच्या मूक-नाट्य प्रयोगासाठी उपयोग करीत. तसेच रंगमंचाच्या कठड्यावर व इतर भिंतीवर भरपूर नक्षिकाम केलेले असे. याच कलात रंगभूमीवर पडद्याचाही वापर होऊ लागला होता असे कळते.

नंतरच्या काळात वास्तुकलेच्या प्रगतीमुळे सुसज्ज व सुंदर नाट्यगृहे निर्माण झाली तरी रंगभूमीचा मात्र ऱ्हासच होत गेला. तसे पाहिले तर एकंदर रोमननाट्य हे सुद्धा रूपांतरीत स्वरूपाचेच होते. प्लॉटस टेरेन्ससारख्या नाटककारात मात्र काही श्रेष्ठ नाट्यगूण असल्यामुळे त्यांनी रूपांतरीत नाट्यातही काही चैतन्य आणले. प्लॉटसने तर ग्रीक कथानकात रोमन रूप खेळविल्याचेही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

दिसते. तसेच काही देशी प्रहसनातही थोड्याफार प्रमाणात स्वतंत्र नाट्यगूण असावे असे दिसते. कदाचित यामुळे रंगभूमीचा उत्कर्ष होत गेलाही असता परंतु ग्रीक कलावंतांप्रमाणे रोममध्ये कलावंताला (एक रोशस (Roscius) नावाच्या गुलाम नटाचा अपवाद धरता) कधी प्रतिष्ठाच लाभली नाही. त्यातल्या त्यात सुरवातीस स्वतः नाटककाराच्याच संस्था असल्यामुळे गुलाम नटांना निदान कलाविष्काराचे तरी समाधान लाभत होते. पण पुढे निर्माते निर्माण झाले व त्यांनी गुलाम नटांना मन मानेल तसे वागविले, फोडून काढले. प्रसंगी थोड्याश्या करमणूकीसाठी हालहाल करून ठारही केले. रोम रंगभूमीवर अखेरच्या काळात नंगानाच घालणारे हे क्रूर करमणूकीचे पिशाच पुढे रोमराज्याच्या अस्ताबरोबर कायमचे गाडले गेले.

वाचकांचा पत्रव्यवहार —

‘ वेदांचा काल (उत्तरार्ध) ’

‘ नवभारत ’ मासिकाच्या नोव्हेंबर १९६३ च्या अंकात डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांचा वेदांचा काल (उत्तरार्ध) हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यासंबंधी पुढील मजकूर पाठवीत आहे.

शतपथ ब्राह्मणातील कृत्तिका नक्षत्रासंबंधी उल्लेखावरून श. ब्रा. चा काल खिस्तपूर्व ३००० असला पाहिजे हे कै. शं. बा. दीक्षितांनी ठरवले. याच्या विरुद्ध डॉ. दप्तरींनी घेतलेल्या आक्षेपांना उत्तर देताना डॉ. वऱ्हाडपांडे यांनी Survey of India च्या ज्योतिषशाखेकडून लिहून आलेली दोन वाक्ये तळटीपेत दिली आहेत. त्यातील पृ. ५८ वर दिलेले दुसरे वाक्य “ If a constellation does not deviate from the East–West line in its course, it must have risen exactly in the East and it would set exactly in the West. ” व त्याच्या आधाराने केलेली काही विधाने बरोबर वाटत नाहीत. यात East–West line म्हणजे पूर्वबिंदूपासून सरळ वर खमध्यातून जाऊन पश्चिम बिंदूला मिळणारी रेषा (किंवा वृत्त) असा अर्थ घेतलेला दिसतो. (पृ. ५७ वरील शेवटले वाक्य पहा.) हा अर्थ घेतला तर कोणतेही नक्षत्र भारतातील कोणत्याही भागातून या मार्गाने जाताना केव्हाही दिसणार नाही. म्हणून या विधानावर आधारलेला युक्तिवाद चुकीचा आहे. तसे पाहिले तर Survey of India च्या दुसऱ्या विधानालाच काही अर्थ नाही. म्हणून त्याचा आधार न घेणेच बरे. त्यापासून निष्कारण गोंधळ वाढतो. व तसे केल्याने कै. दीक्षितांच्या सिद्धांताला काही बाध येत नाही.

—का. रा. गुंजीकर

महाराष्ट्रांतील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना

लेखक–चा. अ. दाभोलकर

किं. २ रुपये

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई (सातारा)

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

श्री. बाबूराव चंदावार

व्यक्तीची वृत्ति हीच समष्टीची प्रवृत्ति

व्यक्ति आणि समाज

"आणि एकाद्या जुलमी राजाला तुम्ही पदच्युत करू इच्छित असाल, तर प्रथम आपल्या अंतःकरणात उभविलेले त्याचे सिंहासन नष्ट झाले आहे, हे बघा.

कारण जर प्रजेच्या स्वतःच्याच स्वातंत्र्याच्या कल्पनेत जुलमाला आणि स्वाभिमानात लज्जेला स्थान नसेल, तर अशा स्वतंत्र आणि स्वाभिमानी प्रजेवर राजा राज्य कसे करू शकेल ? "

– खलील जिब्रान.

कुटुंब व सामाजिक जीवन जगण्याची आकांक्षा माणसात निर्माण झाली तेव्हा, स्वातंत्र्याच्या रक्षणाचीच निकड त्याला अधिक वाटली असावी. कारण 'आदि मानव' स्थिती एकापरी स्वातंत्र्याचीच होती तरी कुटुंब व सामाजिक जीवन सुरक्षित करण्याकरिता जी मूल्ये जरूरीची होती ती 'आदि मानव' स्थितीतल्या स्वातंत्र्यातून निर्माण होऊ शकली नाहीत, सबब मनुष्य अथवा समाजाच्या विकासात स्वातंत्र्य सुरक्षित करणाऱ्या मूल्यांची आवश्यकता जाणवू लागली, तात्पर्य, विकासात स्वातंत्र्याचे स्थान व महत्त्व निश्चित करण्याची व टिकविण्याची जरूरी वाटू लागली.

मनुष्य, समाज व कुटुंब करून राहू लागला व प्रगतीची वाट धरली. पण, जसजशी प्रगती होऊ लागली तसतशी भौतिकतेमुळे लोभवृत्तीही वाढली. आणि जीवनात भौतिकतेचा प्रवेश अनियंत्रितपणे झाल्यामुळे मनुष्यजीवनाला अनियंत्रित भोगमयतेचा विकार जडला. याच भोगमयतेच्या विकारामुळे स्वातंत्र्याचे स्थान आणि महत्त्व मनुष्य व समाजाच्या जाणिवेतून निसटत चालल्याची स्थिति निर्माण होऊ लागली या स्थितीच्या परिणामातून माणसाला पारतंत्र्याचे जीवन जगणे क्रमप्राप्त झाले. मनुष्य शासनाधीन झाला. शास्ते निर्माण झाले. शास्त्यांच्या कल्पनाच जीवनविकासाच्या कल्पना ठरल्या. मानवी इतिहासात शास्त्यांचा काळच सर्वात मोठा काळ असावा असे वाटते. स्वातंत्र्याच्या उर्मि शास्त्यांनी दाबून टाकल्या म्हणण्यापेक्षा समाजाच्या भोगमय जीवनकल्पनेमुळेच त्या दाबल्या गेल्या हे म्हणणेच जास्त सयुक्तिक होईल.

शास्त्यांचा काळ कितीही मोठा प्रभावी ठरला म्हटले, तरी ज्या मूळ कल्पनेने मनुष्य समाजजीवनात प्रविष्ट झाला, ती मूळ कल्पना किंवा त्याची स्वातंत्र्याची आकांक्षा कोणत्याही भोगमयतेमुळे किंवा शासनपद्धतीमुळे पुसून जाणारी नव्हती. कारण स्वातंत्र्याची जाणीव अथवा उर्मि ही माणसाच्या वैचारिक वैशिष्ट्यांची देणगी आहे. मनुष्याची स्वातंत्र्याची जाणीव (माणसाचे) वैचारिक वैशिट्य आहे तोवर तरी नष्ट होणे शक्य नाही. याच कारणास्तव भोगमयतेच्या विकारामुळे शासन व शास्त्यांचा गुलाम झालेला माणूसही क्रांतिप्रवण झाला. पारतंत्र्याची बंधने तोडली. सुरुवातीला हिंसक स्वरूपातही पण स्वातंत्र्याकरिताच माणसाने धडपड सुरू केली. या धडपडीची राजकीय किंवा सामाजिक क्रांत्यांच्या रूपात इतिहासात नोंद झालेली आहे. व पुढेही ही धडपड हिंसक अथवा अहिंसक पद्धतीने होत राहील यात शंका नसावी.

स्वातंत्र्याचे संग्राम होत राहतील व ते स्वातंत्र्याच्या जाणीवेनेच होत राहतील. तरी समाजजीवनात स्वातंत्र्याचे स्थान अबाधित करण्याचा प्रश्न सदासर्वकाळ कायमच राहील असे वाटते. कारण, नव्या संदर्भात स्वातंत्र्याचे स्थान आणि महत्त्व टिकविण्याचा प्रश्न नव्या रूपात नेहमीच उभा राहील. अशा प्रश्नाच्या दृष्टीने नवी जाणीव सतत निर्माण होत राहावी लागेल. तरी स्वातंत्र्याची अभिव्यक्ति, स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति व स्वातंत्र्याचे रक्षण या सर्वसामान्य जाणीवेचा उद्‌भव समाजजीवनात निष्कलंकपणे होत राहणे अनिवार्य आहे. अर्थात या जाणिवेचा उद्‌भव कसा होईल हा खरोखरी चिंतनाचा विषय आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

स्वातंत्र्याची अभिव्यक्ति

स्वातंत्र्य हे अबाधित सत्य आहे. (माणसाला) स्वातंत्र्याचा हक्क हा एक पवित्र हक्क आहे. म्हणून तो माणसाला मिळावा या विषयी तर्काची जरूरी नाही. स्वातंत्र्य तर्कातीत आहे. अबाधित सत्य आहे. पण, अभिव्यक्तीचा प्रश्न जेव्हा निर्माण होतो, तेव्हा स्वातंत्र्याचे अबाधित सत्य व तर्कातीत स्वरूप आम्हाला हवे त्या प्रमाणात स्पष्ट झालेले नाही हेच सिद्ध होते. आणि ही स्थिती आजची नाही. अनंत काळापासून चालत आलेली आहे. शिवाय या स्थितिवार मनुष्य किंवा मानवी समाज होईल किंवा नाही हेही सांगणे कठीण आहे पण मानवी समाजाची आजवर झालेली प्रगती ही स्थिति पार करण्याच्या दृष्टीला थोडी तरी धरूनच आहे, हे नाकबूल करता येत नाही. (अर्थात या दृष्टीतली सर्वंकषता व परिणामकारकता निरीक्षिली पाहिजे.)

आजवरची प्रगति स्वातंत्र्याचे स्वरूप स्पष्ट करण्याच्या दृष्टीला धरून आहे हे जरी गृहित धरले तरी स्वातंत्र्याच्या निश्चित स्वरूपाकडे जाता येईल अशी गति या दृष्टीला होती किंवा आहेच असे निश्चयाने म्हणता येत नाही. म्हणून स्वातंत्र्याचे अबाधित आणि तर्कातीत सत्य स्वरूप स्पष्ट व्हावे अशा गतिमानतेची जाणीव यापुढे अनिवार्य होऊन बसलेली आहे. अर्थात ज्याला आपण प्रगति म्हणतो ती निश्चळ (काळाधीन) कालगति असून चालणार नाही. काळालाही धक्का देणारी ठरायला हवी. काळानुरूप होणारी प्रगति किंवा काळालाच गति दिल्याने होणारी प्रगति या दोहोत मूलभूत स्वरूपाचे अंतर आहे. हे अंतर लक्षात येण्याचे दृष्टीने किंवा स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून 'क्रांती' या शब्दाचा वापर केल्यास योग्य होईल. 'क्रांती' या शब्दाला राजकीय परिवर्तनाच्या क्षेत्रातच आजवर प्रामुख्याने उपयोगात आणले गेले म्हणून तो शब्दही अत्यंत मर्यादित अर्थाने बद्ध झाला. तरी पण 'जीवनक्रांती' वगैरे शब्दांचा अलिकडे वापर होऊ लागला आहे. म्हणून 'क्रांती' शब्द व्यापक अर्थानेही उपयोगात आणला जाणे सयुक्तिक मानले जाते, हे सिद्ध होत आहे. क्रांतीचा व्यापक व सर्वस्पर्शी अर्थ मूल्यपरिवर्तन असा करणे सर्व दृष्टीने योग्य होईल, म्हणून कालगति आणि काळालाच गति दिल्याने होणारी प्रगति यातला मूलभूत स्वरूपाचा फरक लक्षात घेण्याकरिता मूल्यपरिवर्तन असा व्यापक अर्थ असलेला 'क्रांती' शब्द वापरणेच योग्य आहे.

कालगति आणि क्रांती या दोन गोष्टी अनुक्रमे विकास आणि परिवर्तन यातला भेद उलगडणाऱ्या आहेत. विकास म्हणजे कालानुरूप होणारी जाणीवशून्य वाढ आणि परिवर्तन म्हणजे काळावर मात करून जाणीवयुक्त होणारी वाढ. मानवी जीवनात स्वातंत्र्याचे अबाधित आणि तर्कातीत सत्य स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून काळाला गति देणाऱ्या मूल्यपरिवर्तनाच्या क्रांतीचीच खरी गरज आहे.

तात्पर्य, स्वातंत्र्याची अभिव्यक्ति मूल्यपरिवर्तनाच्या क्रांतीतूनच शक्य आहे. कालबाधीत मूल्ये ही जीवनात स्वातंत्र्याच्या हक्कप्राप्तीकरिता कधीच उपयोगी ठरत नाहीत. कारण, कालबाधीत मूल्ये स्वातंत्र्याला मर्यादा पाडण्याच्या स्वभावाची असतात. अर्थात, स्वातंत्र्याची अभिव्यक्ति मूल्यपरिवर्तनाच्या क्रांतीतूनच शक्य आहे.

स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति

मनुष्याचे सामाजिक जीवन सुरक्षित करण्याकरिताच स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीची गरज असते. आणि ही गरज पुरी करण्याचे सातत्यही टिकवून धरावे लागते. समाजजीवन सहजीवनाने समृद्ध होते. अर्थात समाज–जीवनाची उपयुक्तता सहजीवनाच्या विशिष्ट पातळीतून सिद्ध केली जाते. तेव्हा, सहजीवनात व्यक्तीच्या स्वातंत्र्याची (समानतऱ्हेने व विकासशील) जपणूक होत असलेला मानवी व्यवहार चालावा लागतो. या व्यवहारातून समाजजीवनाची अशी पातळी निर्माण होईल की व्यक्तीच्या स्वातंत्र्याची योग्य तऱ्हेने जपणूक होत राहून समाजजीवनाची उपयुक्तताही पण सिद्ध होईल.

तात्पर्य व्यक्तीच्या स्वातंत्र्याची योग्य जपणूक होऊन, सहजीवनातून समाजजीवन समृद्ध करण्याच्या व्यवहारातून स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिती होत राहते आणि ही निर्मिति मंदावली की समाजजीवनात समृद्धीचा काल लांबणीवर पडतो. किंबहुना ही निर्मिति होणारच नसली तर समाजजीवनाच्या समृद्धीची आशाही करणे कठीण जाते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सहजीवनातून समाजजीवन समृद्ध करण्याचा व्यवहार पुष्कळ बाबतीत शिक्षणावर अवलंबून असतो. अर्थात शिक्षणाचा अर्थ या ठिकाणी जीवन-शिक्षण असा आहे. जीवनाची उपयुक्तता व सार्थकता कळण्या इतपत मनुष्य विचारशील झाला की सहजीवनाचा व्यवहार हा समाजजीवन समृद्ध करण्याकरिताच होतो. पण, अशा शिक्षणाला संधी असावी म्हणून मनुष्यजीवनाच्या भवितव्याविषयीची योग्य जाणीव बाळगणाऱ्या प्रभावी नेतृत्वाची नेहमीच गरज असते. अशा नेतृत्वाची निर्मिति होत राहावी लागते.

समाजजीवनाच्या समृद्धीची कल्पना ती हीच की, अधिकाधिक शांततामय सहजीवनाचा अनुभव प्रत्येक व्यक्तीला घेता येत आहे हे दिसावे. अर्थात शांततामय सहजीवनाचा अनुभव ज्ञानयुक्त जीवनव्यवहारातूनच शक्य होतो. शांति मनाचा स्वभाव झाला पाहिजे शिवाय माणसाची शांततेच्या दृष्टीने सक्रियताही वाढली पाहिजे. निष्क्रियताही शांततेचे लक्षण मानता येईल, पण याने समाजजीवनाच्या समृद्धीचा व स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीचा मार्ग चालता येणार नाही. शांति स्वतःकरिता उपयोगी व्हावीच, शिवाय ती दुसऱ्याला प्रेरणादायीही असावी. सहजीवनातून समाजजीवन समृद्ध करण्याचा व्यवहार जीवनात अधिकाधिक प्रेरक शांति आणू शकला की स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति अबाधीत रूपात होत आहे, व समाजजीवन अधिकाधिक सुरक्षित व समृद्ध होत आहे असे मानावे.

तात्पर्य, स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीचा प्रश्न व्यक्तीची मनोरचना य समाजरचना शांततामय सहजीवनाला अनुकूल करण्याचा प्रश्न आहे.

स्वातंत्र्याचे रक्षण

स्वातंत्र्याच्या मूल्यनिर्मितीतच स्वातंत्र्याच्या रक्षणांची बीजे आहेत, प्रेरक शांतीतून निर्माण झालेल्या सहजीवनाची अबाधितताच स्वातंत्र्याची प्रतिकारक्षमता आहे. तेव्हा, स्वातंत्र्याची सुरक्षितता ही स्वतंत्र प्रवृत्ति म्हणून मानली जाऊ शकत नाही. व्यक्ती अथवा समाज-जीवनात स्वातंत्र्य रक्षणाकरिता स्वतंत्रपणे योजना करण्याची जरूरी नसते. जेव्हा, तशी जरूरी वाटेल तेव्हा स्वातंत्र्याची उपासनाच सदोष पद्धतीची आहे असे मानावे लागते. स्वतःच्या अंतःकरणात जुलमाला स्थान नसेल तर कोणत्याही जुलमाचा परिणाम स्वातंत्र्याच्या उपासकावर होणार नाही. आवश्यक तेव्हा स्वातंत्र्याची वाट मृत्यूच्या दारातूनही जाईल. पण, त्यामुळे स्वातंत्र्याच्या उपासकाला जुलमाचे मूल्य वाटणार नाही. जुलमाचे अवमूल्यन करून ज्यांनी स्वातंत्र्याची ज्योत सदैव अंतःकरणात तेवत ठेवली त्या व्यक्ती मानवजातीचे भवितव्य उज्ज्वल करणाऱ्या होत्या. त्यांनी ज्या जुलमाचे अवमूल्यन केले तो जुलूम मात्र अप्रतिष्ठित व मूल्यरहित ठरला. तेव्हा, स्वातंत्र्याचे रक्षण जुलमाची अप्रतिष्ठा व अवमूल्यनात आजवर झालेले आहे व पुढेही होत राहील. जुलमाचे अवमूल्यन व अप्रतिष्ठा होत असल्याचे (प्रेरक शांतीतून निर्माण झालेल्या) सहजीवनातून ठरून त्याचा समाजजीवनावरहि परिणाम होत असल्याचे दिसू लागल्यास समाजजीवनात स्वातंत्र्याच्या रक्षणाच्या दृष्टीने प्रतिकार– क्षमता आलेली आहे, असे सहजच ठरून जाते.

उपसंहार

स्वातंत्र्याची अभिव्यक्ति, स्वातंत्र्याची मूल्यनिर्मिति व स्वातंत्र्याचे रक्षण या तीनही गोष्टी मनुष्याचे समाजजीवन सुरक्षित, प्रतिष्ठित व प्रेरक असावे या करिता जरूरीच्या आहेत. तेव्हा, ही जरूरी लक्षात घेता माणसाची वृत्ति त्या दृष्टीने अधिकाधिक अनुकूल व्हावी. एवढेच नव्हे तर तिची समरसताही वाढावी याचीच सदैव जागरूकता ठेवावी लागते. म्हणून अशा वृत्तीची निर्मिति हीच समाजजीवनाची प्रवृत्ति ठरते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सार-संकलन

अण्वस्त्रे आणि अमेरिकेतील लोकमत

१९४५ च्या ऑगस्टमध्ये हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकल्यापासून १९६३ पर्यंत अनेक वेळा अण्वस्त्रांबद्दल अमेरिकेतील सर्वसामान्य माणसाची प्रतिक्रिया काय आहे हे समजून घेण्याचे दृष्टीने लोकमताच्या ज्या धावत्या चाचण्या तेथे व इतरत्र घेण्यात आल्या त्यातून मिळणारे आकडे बरेच उद्बोधक आहेत.

अमेरिकेतील ६६ टक्के लोक अमेरिकेविरुद्ध अण्वस्त्रांचा उपयोग केला जाईल म्हणून भयभीत आहेत, पैकी ३७ टक्के हा धोका अगदी खरा व अतिशय गंभीर आहे असे मानतात. ८३ टक्के लोक अण्वस्त्रांनी जगातील सर्व शहरे उध्वस्त होणार अशा काळजीत असलेली दिसतात. ५९ टक्के लोक जागतिक महायुद्ध होणार आणि त्यात अण्वस्त्रे वापरली जाणार म्हणून चिंताग्रस्त आहेत. पैकी २२ टक्के फारच काळजीत आहेत. रशिया अमेरिकेविरुद्ध हैड्रोजन बॉम्बचा वापर करील अशी ८० टक्के लोकांची खात्री आहे. आणि अमेरिकेला लाल चीनशी युद्ध करण्याचा प्रसंग आला तर अमेरिका अण्वस्त्रे वापरील किंवा काय ह्यालाही ६३ टक्के लोक होय असेच उत्तर देतात. एका चाचणीत अगदी तुम्ही रहाता त्या ठिकाणीच अणुबॉम्ब पडण्याची शक्यता वाटते काय ह्याही प्रश्नावर ८२ टक्के लोकांनी शक्यता वाटते असेच सांगितले. आणि त्यापैकी ५३ टक्के लोकांना ती शक्यता फार मोठी वाटली. १९६१ सालच्या एका चाचणीत अणुयुद्ध पेटले तर व्यक्तिशः तुम्हाला जिवंत रहाण्याची आशा वाटते काय ह्यावर कॅनडात फक्त ६ टक्के, इंग्लंडमध्ये ३ टक्के तर अमेरिकेत ९ टक्के माणसांना तशी आशा वाटत असल्याचे दिसले. बाकी सर्वांनी ती सोडल्याचेच आढळून आले, एका चाचणीतील रशिया आणि अमेरिका ह्यांच्यात अणुयुद्ध झाले तर सबंध मनुष्यजात नष्ट होईल काय ह्या प्रश्नाला २७ टक्के लोकांनी 'होय' असे उत्तर दिले. १९५८ साली काही ठळक राष्ट्रातील लोकमत अजमावता असे दिसून आले की, अमेरिकेतील ७० टक्के, इंग्लंडमध्ये ७२ टक्के, भारतातील ७८ टक्के, फ्रान्समधील ८५ टक्के, जपानमधील ९१ टक्के व पश्चिम जर्मनीतील ९२ टक्के लोक अशा मताचे आहेत की, अमेरिका रशियासह सर्व राष्ट्रातील अण्वस्त्रांची निर्मिती बंद व्हावी व त्यासाठी तपासणीचा अधिकार असलेली एक आंतरराष्ट्रीय संघटनाही असावी.

("पब्लिक ओपिनियन" क्वार्टर्ली समर १९६३.)

अण्वस्त्रनिर्मितीचा अवाढव्य खर्च

वरील काही आकडेवारीवरून सुखासमाधाने जगू इच्छिणाऱ्या सर्वसामान्य माणसाने अण्वस्त्रांचा धसका किती घेतला आहे ह्याची कल्पना येईल. सर्वसंहारक अस्त्रांच्या निर्मितीसाठी किती अफाट खर्च होतो व ते किती मानवताविरोधी आहे हे सांगताना श्री. व्ही. ए. किरलिन म्हणतात :– अण्वस्त्रांची निर्मिती आणि त्या संबंधीची सर्व व्यवस्था यासाठी आज जगात होणारा खर्च चाळीस (४०) बिलियन डॉलर्सच्या (म्हणजे सुमारे २५,०००,०००,००० रुपये.) घरात जातो. ह्यासाठी लागणारे सर्व संपत्तीबळ, मनुष्यबळ, त्याचप्रमाणे आज लष्करी स्वरूपाच्या असलेल्या संशोधनसंस्था ह्यांचा मनुष्यजातीला अधिक सुखी व संपन्न करणाऱ्या विधायक स्वरूपाच्या कार्याकडे निश्चित उपयोग करता येईल.

आशिया, अफ्रिका आणि लॅटिन अमेरिका ह्यातील राष्ट्रांना तर हा प्रश्न फारच जिव्हाळ्याचा वाटेल. सध्या त्यांच्याकडे आपल्या प्राथमिक गरजा पुऱ्या करण्याइतकासुद्धां पैसा नाही. संयुक्त राष्ट्रांच्या तज्ञांच्या मते कोट्यावधि लोक आज तेथे उपासमार सोशीत आहेत. आणि तरी ह्या मागास प्रदेशातूनही ६ बिलियन डॉलर्स अण्वस्त्रनिर्मितीवर खर्च होतच आहेत. निःशस्त्रीकरणाने मागास राष्ट्रांचे स्वतःचे पैसे तर वाचतील आणि शिवाय त्यांना तशा तऱ्हेने पैसे वाचविणाऱ्या पुढारलेल्या औद्योगिक राष्ट्राकडून भरीव मदत मिळू शकेल.

(डिसआर्मामेंट अँड आर्म्स कंट्रोल व्हाल्यूम १, १९६३.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अण्वस्त्राबाबतची वास्तव भूमिका

अण्वस्त्रांबद्दल सर्वसामान्य माणसाने धसका घेतलेला असला आणि त्याच्या निर्मितीचा खर्च कितीही डोळ्यावर येणारा असला तरी त्या बाबत नुसते ध्येय-वादी किंवा भावनावश होऊन चालणार नाही. त्यातील व्यवहार लक्षात घेऊन काम केले पाहिजे हे सांगताना लुई जे. हॉल म्हणतात :–

" १९४५ नंतर अजूनही आंतरराष्ट्रीय वातावरणात स्थैर्य आलेले नाहीत. ते हळू हळू येत आहे. तथापि अशी काही नवीन प्रकरणे उद्भवतील की येत असलेले स्थैर्य पुन्हा जाईल. भारतात किंवा चीनमध्ये गोंधळ माजणे, आफ्रिकेत अराजक पसरणे, पूर्व युरोपमध्ये बंडाची लाट उसळणे, १९३० सालातल्यासारखी जगाची अर्थिक घडी विसकटणे किंवा मास्कोतील सत्ता-स्पर्धा हाताबाहेर जाणे, अशासारख्या कोणत्याही प्रकाराने हे स्थैर्य संपुष्टांत येईल. बेजबाबदार सर-कारांच्या हाती अण्वस्त्रे पडली तर कुठल्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल ते सांगता यायचे नाही. जीवनातला धोका संपलेला नाही. मात्र बरेचसे प्रश्न असे आहेत की, ते प्रत्यक्षात उद्भवल्याखेरीज त्यांच्याशी मुकाबला कसा करावयाचा हे ठरविता येणे शक्य नाही. म्हणूनच आज समोर जो काही प्रश्न असेल तो नीट पहाणे एवढेच आपल्याला उरलेले आहे."

" आजचा प्रश्न असा आहे की, अण्वस्त्रांची संहा-रक शक्ति एवढी आहे की ती अस्त्रे जवळ असणाऱ्या कोणत्याही राष्ट्राने त्याचा लष्करी उपयोग करणे समर्थ-नीय ठरणार नाही. परंतु ती जवळ असणारे कोणतेही राष्ट्र त्याचा केंव्हा ना केंव्हा उपयोग करावा लागणारच ह्या भीतीतून बाहेरही येऊ शकत नाही. कोणत्याही प्रसं-गात अमेरिकेने शत्रूच्या प्रदेशात अणुबॉंब फेकणे उचित होणार नाही. अगदी रशियाने अमेरिकेवर अण्वस्त्रे सोडली तरी सुद्धा अमेरिकेने जशास तसे उत्तर देण्या-पेक्षा वाटाघाटीच्या मार्गाणे जाणे अधिक चांगले हे खरेच. तथापि हेही खरेच की, अमेरिकेकडे अण्वस्त्रे आहेत आणि ती अमेरिका स्वःच्या किंवा आपल्या दोस्तांच्या रक्षणासाठी वापरील ह्याची तिच्या प्रति-स्पर्ध्याला जाणीव असावी.


म्हणून प्राप्त परिस्थितीत जगाच्या शांततेचा, स्थैर्याचा व्यवहारी भूमिका घेऊन विचार केला तर असेच म्हणावे लागेल की, अणुशक्तीचे अस्तित्व हे त्या शांतिस्थैर्याचा एक आवश्यक भाग आहे, म्हणू-नच आपण आज अण्वस्त्रासह कसे जगावे हे शिका-यला हवे आहे.

(सर्व्हायव्हल: मार्च–एप्रिल १९६४)

आणि माणूस अण्वस्त्रासह जगायला शिकेल अशी आशा वाटावी इतपत महत्त्वाची निवेदने अमिरिकेचे अध्यक्ष जॉनसन आणि रशियाचे पंतप्रधान क्रुश्चेव्ह ह्या दोघा बड्यांनी नुकतीच केली आहेत. संहारक अण्व-स्त्रांच्या उत्पादनात कपात करण्याचा निर्णय जॉनसन घोषित करतात आणि तसाच निर्णय जाहीर करीत असताना संहारक अणुशक्तीची निर्मिती कमी करून शेतीच्या विकासासाठी, उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी आणि खारट समुद्र गोड करण्यासारख्या मानवाच्या सुखसमृद्धीत भर टाकणाऱ्या विधायक, कल्याणकारी योजनांसाठी ती शक्ति उपलब्ध व्हावी व ती हळूहळू केली जाईल असा दिलासा क्रुश्चेव्ह देतात.


(२१ एप्रिल १९६४ च्या ' टाइम्स ऑफ इंडिया 'मध्ये ' टास ' वरून दिलेली बातमी)


अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई


शेतीचे उत्पादन वाढलेच पाहिजे





शेतीचे उत्पादन वाढणे ही आपल्या देशाची प्रमुख गरज आहे आणि त्यासाठी महाराष्ट्र सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करून शेतकऱ्यांना सहाय्य देत आहे.

तिसऱ्या योजनेच्या अखेरीस अन्नधान्याचे उत्पादन ७८.६ लाख टन होईल अशी अपेक्षा आहे, तर राज्याची अंदाजित गरज ९२.९ लाख टन आहे. अशा प्रकारें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर राज्यात १४.३ लाख टन अन्नधान्याची तूट पडेल. म्हणून शेतकऱ्यांनी नजीकच्या भविष्यकाळात अन्नधान्याच्या बाबतीत राज्य स्वयंपूर्ण करण्याकरिता अधिकाधिक प्रयत्न केले पाहिजेत.



ऊस, कापूस व तेलबिया या नगदी पिकांच्या उत्पादनाच्या कार्यक्रमात वाढ करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी सुधारलेले बीबियाणें, खते यांचे वाटप करणाऱ्या आणि शेतीसाठी कर्ज देणाऱ्या विकास संस्थांची भक्कम पायावर उभारणी करण्यात आली आहे.

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका